# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

सत्र–३ : पेपर क्रमांक SOE 026

# स्थलांतराचे समाजशास्त्र

**(Sociology of Migration)**

**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१७
**तृतीय आवृत्ती :** २०१८
सुधारित आवृत्ती : २०२२
एम. ए. भाग २ (सत्र ३ : स्थलांतराचे समाजशास्त्र) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : २००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-650-6

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**समाजशास्त्र अभ्यासमंडळ**

अध्यक्ष – **डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

एम. ए. भाग-२, सत्र ३ साठी 'स्थलांतराचे समाजशास्त्र' या ऐच्छिक पेपरची निवड करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो.

''स्थलांतराचे समाजशास्त्र'' या पेपरमध्ये चार घटकांचा समावेश केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्थलांतर काही मूलभूत संकल्पना, स्थलांतराचे सिद्धांत, स्थलांतराचा अंदाज लावण्याच्या प्रत्यक्ष पद्धती, स्थलांतराची कारणे आणि परिणाम या घटकांचा समावेश केला आहे.

शेवटी मी सर्वप्रथम मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ. मच्छिंद्र सकटे, हा पेपर पूर्ण करण्यासाठी घटक लिहणारे सहकारी प्राध्यापक आणि दूरशिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाले. वरील सर्वांना त्यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

■ **संपादक** ■

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

**प्रा. प्रकाश जगताप**
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय,
रहिमतपूर. जि. सातारा

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**स्थलांतराचे समाजशास्त्र**
**एम. ए. भाग–२ : समाजशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३ घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. प्रकाश जगताप**<br>सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय, रहिमतपूर, जि. सातारा | १ |
| **प्रा. आनंद गाडीवड्ड**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर | २ |
| **प्रा. बबन रणजित पाटोळे**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **प्रा. एस. एल. मोहिते**<br>एस. जी. एम. कॉलेज, कराड, जि. सातारा | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

**प्रा. प्रकाश जगताप**
सरदार बाबासाहेब माने महाविद्यालय,
रहिमतपूर. जि. सातारा

# अनुक्रमणिका



| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | स्थलांतर : कांही मूलभूत संकल्पना | १ |
| २. | स्थलांतराचे सिद्धांत | १८ |
| ३. | स्थलांतराचा अंदाज लावण्याच्या पद्धती | ३२ |
| ४. | स्थलांतराची कारणे आणि परिणाम | ६७ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१४-१५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## सत्र–३ : घटक १

# स्थलांतर : कांही मूलभूत संकल्पना

(Migration : Some Basic Concepts)

### अनुक्रमणिका

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्ट्ये

१.३ विषय विवेचन

१.४ स्थलांतराची संकल्पना (Concept of Migration)

१.५ अंतर्गत स्थलांतर व आंतरराष्ट्रीय स्थलांतर (Internal Migration and International Migration)

१.६ स्थलांतरांचे प्रवाह (Streams of Migration)

१.७ औद्योगिक पुर्व समाजातील स्थलांतर (Migration in Pre-Industrial Societies)

१.८ सरावासाठी प्रश्न

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ प्रस्तावना (Introduction)

स्थलांतराचे समाजशास्त्र या विषयाचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना मूलभूत प्रश्न असा पडतो की, स्थलांतर म्हणजे काय ? भारताच्या संर्दभात विचार केल्यास असे दिसून येते की, शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील लोकांच्या मध्ये स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे. स्थलांतर करताना लोक मुख्यत्वे आपल्या मूळ वास्तव्याच्या ठिकाणापासून अनेक कारणांसाठी दुसऱ्या ठिकाणी जात असतात. पुर्वी लोक मुख्यत्वे अन्नधान्याच्या शोधात स्थलांतर करत असत आणि आज लोक शिक्षण, नोकरी व व्यापारासाठी स्थलांतर करताना दिसून येतात. स्थलांतर करताना लोक मुख्यत्वे ज्या ठिकाणी जायचे आहे त्याचे अगोदर फायदा-तोटा याचा विचार करतात आणि मगच स्थलांतर करत असतात. या प्रकरणामध्ये आपण स्थलांतराची संकल्पना समजून घेणार आहोत.

मानवाचे पृथ्वी तलावावर अस्तित्व असल्या पासून तो आपल्या गरजांचे निराकरण व सुरक्षित निवारा शोधण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत राहिला. मानवाची विकसित अवस्था म्हणजे भटके

जीवन सोडून त्याने स्थिर जीवन जगण्यास प्रारंभ केला. परिणामी सुरक्षा व सत्ता आकर्षणामुळे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर होत असे. लहान गावातून मोठ्या गावाकडे व लहान ठिकाणाहून मोठ्या ठिकाणाकडे अधिक सोई आणि सुविधा, रोजगार, दळणवळणाच्या सोई उपलब्ध आहे अशा ठिकाणी स्थलांतर घडून आले.

प्रा. हॉले (Hawley) यांच्या मतानुसार, सुसंस्कृत व प्रगत लोकच अधिक प्रमाणात स्थलांतर करू शकतात स्थलांतर हे अल्पकालीन, दीर्घकालीन. तात्पुरते किंवा कायमस्वरूपाचे असते.

थोडक्यात, स्थलांतर प्रक्रियेमध्ये मुख्यत्वे आपल्या मूळ वास्तव्य ठिकाणापासून अनेक कारणासाठी दुसऱ्या ठिकाणी जावून वास्तव्य करतात. पुर्वी लोक भूक भागवण्यासाठी भटकंती करण्यातून स्थलांतर होत होते, आज शिक्षण, आरोग्याच्या सोई, रोजगार, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी स्थलांतरीत होतात.

## १.२ उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणाला –

१. स्तलांतराची संकल्पना काय आहे हे समजून घेता येईल.

२. अंतर्गत व बर्हिगत स्थलांतर म्हणजे काय हे समजून येईल.

३. स्थलांतराचे विविध प्रवाह समजण्यास मदत होईल.

४. औद्योगिक पुर्व समाजातील स्थलांतर याविषयी थोडक्यात जाणून घेता येईल.

## १.३ विषय विवेचन

मानवी उत्पतीपासून स्थलांतराची प्रक्रिया अव्याहतपणे सुरू आहे. स्थलांतराची प्रक्रिया ही नेहमीच उद्योग, व्यापार व शिक्षण असलेल्या मोठ्या शहरांच्याकडेच होताना दिसते. स्थलांतरामध्ये मुख्यत्वे आर्थिक उद्देश हा महत्त्वाचा भाग असलेला दिसतो. वरील कारणाप्रमाणेच निर्सगातील विविध कारणे स्थलांतराला कारणीभूत आहेत. स्थलांतराची तिव्रता आणि तिची व्याप्ती ही त्या त्या परिवेषातील राजकीय, सामाजिक, भौगोलिक प्रक्रियेशी मोठ्या प्रमाणात निगडीत असते.

## १.४ स्थलांतराची संकल्पना (Concept of Migration)

स्थलांतराची प्रक्रिया ही प्राचीन काळापासून चालू आहे. ही प्रक्रिया निरंतर चालू राहणारी सामाजिक प्रक्रिया आहे. प्राचीन काळात निसर्गातील अनाकालीन घटना, आकस्मित बद्दल, भूकंप, पाऊस, वादळ, महापूर या पर्यावरणातील घटकाशी समायोजन साधून आपली उपजिवीका भागवण्याच्या उद्देशाने आदिवासी आपल्या टोळीसह एका ठिकाणाहून जेथे पर्यावरण मानवी जीवनाचे अस्तित्व टिकवण्यास अनुकूल आहे अशा ठिकाणी ते नव्याने राहत असे. याचे मुख्य कारण नैसर्गिक साधन संपत्तीत असमानता असल्याने व दुसऱ्या प्रदेशात अधिक नैसर्गिक संपत्ती उपलब्ध असल्यास स्थलांतर घडून येते.

ज्या प्रदेशातून लोक दुसरीकडे जातात (Emigration-Out-Migration) तेथील प्रदेशातील लोकसंख्या कमी होते व लोकसंख्या ज्या प्रदेशात केंद्रित होते (Immigration In Migration) तेथे लोकसंख्या वाढते. विकसनशील देशात स्थलांतर हे मुख्यत: पुरूषाचे जास्त प्रमाणात होते. विकसनशील देशामध्ये देशांतर्गत व ग्रामीण भागातून शहराकडे होणारे स्थलांतर आर्थिक विकासाला उपयुक्त ठरते आहे.

स्थलांतर हे लोकसंख्येची रचना, आकार व सामाजिक परिवर्तनास गती प्राप्त करून देणारा महत्त्वाचा घटक आहे. ज्ञानाचा प्रसार वाढल्यामुळे, लोकशाहीची तत्वे रूजवली गेली. मानवाची कार्यक्षमता, विचारक्षमता, बुद्धीमता, उद्योग धंदे, व्यापार, रोजगार संधी तसेच वाहतूकीच्या साधनांमुळे इच्छित ठिकाणी लोक जाऊ शकतात. येऊ शकतात त्यामुळे स्थलांतर वेगाने घडून येत आहे.

भारतासारख्या देशामध्ये स्थलांतर व त्याची कारणे ही काळानुरूप बदलत गेली आहेत. स्थलांतराची प्रक्रिया ही सातत्याने घडणारी गोष्ट आहे. स्थलांतर एक नैसर्गिक प्रक्रिया असून ती सतत चालू राहते.

भारताच्या संर्दभात स्थलांतराची प्रक्रिया ही १९ व्या शतकाच्या पुर्वार्धानंतर मोठ्या प्रमाणात जाणवू लागली. औद्योगिक व शहरीकरणाची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर ग्रामीण भागाकडून शहरी भागांच्याकडे स्थलांतराच्या प्रक्रियेने वेग घेतला. शहरीकरणानंतर सुरू झालेल्या स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागाकडून शहरांकडे, तसेच एका शहराकडून दुसऱ्या शहरांकडे स्थलांतर होवू लागले. स्थलांतराचा नियम म्हणून किंवा ती एक स्वाभाविक प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये स्थलांतर करणारे सुरूवातीला आपल्या गावाहून / मूळ वस्तीस्थाना पासून जवळच्या छोट्या शहरांकडे व नंतर तिथून मोठ्या शहरांकडे स्थलांतर करतात.

स्थलांतराची प्रक्रिया ही वय, लिंग, शिक्षण या प्रमुख गोष्टीवर अवलंबून असते. शक्यतो ग्रामीण भागातील युवक शहरांकडे नोकरी-धंद्याच्या शोधात स्थलांतर करत असतात. कांही तरूण मात्र शहराकडे चंगळवादी दृष्टीने आकर्षित होवून स्थलांतर करत असतात. स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेने कमी असलेले दिसून येते.

शैक्षणिक दृष्ट्या प्रगतीपथावर असणाऱ्या शहरांमध्ये युवकांची शिक्षण घेण्यासाठी स्थलांतर होताना दिसते. तर दुसऱ्या बाजूला खेळ, मैदानी र्स्पधा व सांस्कृतिक दृष्ट्या विकसित झालेल्या शहरांमध्ये त्या दृष्टिची आवड असणारे लोक स्थलांतरित होताना दिसतात. व्यापार व उद्योगाच्या दृष्टिने विकसित झालेल्या शहरांमध्येही नोकरी धंद्याच्या शोधात असणारा युवकवर्ग मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होत असतो.

**व्याख्या :**

**१) प्रा. हॉले यांच्या मते,**

''लोक एका ठिकाणावरून दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी जाऊन अल्पकाळ, दिर्घकाळ व कायमचे वास्तव करतात त्यास स्थलांतर म्हणावे.''

## २) डॉ. एस. सी. दुबे

''स्तलांतर ही सामाजिक परिवर्तनाची अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे लोकसंख्येचे अंतर्गमन आणि बर्हिर्गमन होते.''

वरील व्याख्यांच्या आधारे हे स्पष्ट होते की, स्थलांतर होताना लोक नेहमी आपली सुरक्षितता, निवारा याला महत्त्व देतात यावरून लोकांच्यात अंतर्गत व बर्हिगत स्थलांतर घडून येते.

## १.५ स्थलांतराचे प्रकार

**प्रस्तावना :**

स्थलांतराची संकल्पना समजून घेतल्यानंतर असे लक्षात येते की, स्थलांतर हा लोकसंख्येच्या रचनेत व आकारात बदल घडविणारा महत्त्वाचा घटक आहे. जगात विज्ञान, तंत्रज्ञानाचा प्रसार झाला. तसतसे उद्योगधंद्याचे स्वरूप बदलले. लोक शेती व्यवसायाकडून अन्य क्षेत्राकडे वळले. मानवाची गतिक्षमता वाढली. दळणवळणाच्या साधनात झालेल्या प्रगती मुळे लोक इच्छित ठिकाणी रोजगारासाठी जाऊ लागले त्यामुळे जलद स्थलांतर होऊ लागले. या स्थलांतराचे स्थूल मानाने मुख्य दोन प्रकार पडतात.

स्थलांतराचे प्रामुख्याने दोन प्रकारात विभाजन करता येते त्यापैकी (१) अंतर्गत स्थलांतर व (२) बर्हिगत स्थलांतर होय.

## ब) अंतर्गत स्थलांतर आणि आंतरराष्ट्रीय स्थलांतर (Internal Migration and International Migration)

**प्रस्तावना :**

स्थलांतर हे अनादिकालापासून सुरू असलेले दिसून येते. प्राचीन कालखंडामध्ये स्थलांतर हे मर्यादित प्रमाणात होत होते. स्थलांतराची प्रक्रिया कांही अंतरापर्यंत होत होती. हे स्थलांतर घोडे, उंट, बैलगाडी, पायी अशा वेगवेगळ्या बार्गांनी केले जात होते. स्थलांतर हे हंगामी, कायम स्वरूपाचे, देशांन्तर्गत, आंतरराष्ट्रीय एका ग्रामीण भागातून दुसऱ्या ग्रामीण भागाकडे किंवा नगराकडे अगर नगराकडून ग्रामीण भागाकडे होत असते. स्थलांतर हे उदरनिर्वाह, व्यवसाय, नोकरी, युद्धजन्य परिस्थिती, फाळणी, अशा वेगवेगळ्या कारणांनी होत होते. थोडक्यात स्थालांतरामागे नैसर्गिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय घटक कारणीभूत असलेले दिसून येते. यावरूनच स्थलांतराचे दोन प्रमुख प्रकार पडतात ते खालीलप्रमाणे –

### १) **अंतर्गत स्थलांतर** (Internal Migration)

देशाच्या सीमेअंतर्गत होणाऱ्या स्थलांतरास अंतर्गत किंवा देशांतर्गत स्थलांतर असे म्हणतात. यामध्ये प्रत्येक राज्याच्या अंतर्गत भागात आणि राज्याबाहेर परंतु देशाच्या सीमेअंतर्गत होणाऱ्या स्थलांतराचा समावेश होतो. अंतर्गत स्थलांतराचे वेगवेगळ्या आधारावर त्याचे कांही प्रकार पडतात ते खालीलप्रमाणे –

**अ) तात्पुरते स्थलांतर** (Temporary Migration) हे स्थलांतर कांही तासांपासून एकदिवस, एक महिना, एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त असू शकते. या प्रकारचे स्थलांतर एका राज्यातून दुसऱ्या राज्यात व राज्यातून देशात होताना दिसून येते. उदा. नोकरी, व्यवसाय इ.

१) **दैनिक स्थलांतर** (Daily Migration) : या प्रकारच्या स्थलांतरात लोक आपल्या नोकरी, व्यवसाय, व्यापार व शिक्षणाच्या निमित्ताने सकाळी जाऊन संध्याकाळी परत येत असतात. अशा प्रकारच्या स्थलांतरात अंतर हे कमी प्रमाणात असते.

२) **निम्न स्थायी स्थलांतर** (Semi-Permanent Migration) : या स्थलांतरामध्ये लोक नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने दुसऱ्या ठिकाणी जात असतात. परंतु ते आपले मूळ ठिकाण किंवा घर यांच्याशी संबंध ठेवून असतात. त्याचबरोबर कालांतराने ते आपल्या मूळ गावी वास्तव्यास येतात. अशा स्थलांतरास निम्न स्थायी स्थलांतर म्हटले जाते.

३) **हंगामी किंवा ऋतुनुसार होणारे स्थलांतर** (Seasonal Migration) : या प्रकारच्या स्थलांतरामध्ये लोक विशिष्ठ हंगामात आपले गांव किंवा प्रदेश सोडून दुसरीकडे स्थलांतर करतात. यामध्ये प्रामुख्याने शिकार, मासेमारी, पशुपालन, कृषिक्षेत्रात राहणाऱ्या लोकांचा समावेश होतो.

ब) प्रदेशाच्या आधारावर होणारे स्थलांतर

या प्रकारचे स्थलांतर हे प्रामुख्याने खालील दोन प्रकारामध्ये मोडते.

१) एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात

२) एका राज्यातून दुसऱ्या राज्यात

क) सामाजिक व शैक्षणिक घटकांच्या आधारावर होणारे स्थलांतर.

या प्रकारचे स्थलांतर हे प्रामुख्याने दोन प्रकारामध्ये मोडते ते खालीलप्रमाणे–

**१) विवाहानिमित्ताने होणारे स्थलांतर**

महाराष्ट्र व भारतात होणारे स्थलांतर या प्रकारचे सर्वत्र दिसून येते. असे स्थलांतर हे कायमस्वरूपी असते. पितृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये मुलगी ही मुलाच्या घरी कायम वास्तव्यास येत असते. तर याउलट मातृसत्ताक कुटुंब पद्धतीमध्ये मुलगा हा मुलीच्या घरी कायम वास्तव्यास जात असतो.

**२) शैक्षणिक उद्देशाने होणारे स्थलांतर** (Education Migration) :

या प्रकारच्या स्थलांतरामध्ये उच्च शिक्षणाच्या निमित्ताने लोक खेड्यामधून शहराकडे स्थलांतर करत असतात. यामध्ये लोक एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, देशातून परदेशात स्थलांतर करत असतात.

**३) ठिकाणाच्या आधारावर**

या प्रकारच्या स्थलांतरामध्ये प्रामुख्याने चार प्रकारचे स्थलांतर आढळते ते खालीलप्रमाणे –

**१) ग्रामीण–नागरी स्थलांतर** (Rural Urban Migration) : या प्रकारामध्ये ग्रामीण भागातून लोक नोकरी, व्यवसाय, रोजगार, उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा विविध कारणामुळे स्थलांतर करत असतात. यामध्ये प्रामुख्याने गेल्या कांही वर्षांपासून शहरामध्ये औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात होवू लागल्यामुळे ग्रामीण युवा वर्ग नोकरी, रोजगाराच्या निमित्ताने शहराकडे आकर्षित होवू लागला आहे.

**२) नागरी–नागरी स्थलांतर** (Urban-Urban Migration) : एका शहराकडून दुसऱ्या शहराकडे होणाऱ्या स्थलांतरास नागरी–नागरी स्थलांतर असे म्हटले जाते. मुख्यतः यामध्ये अविकसित शहराकडून विकसित शहरांकडे किंवा लहान शहराकडून मोठ्या शहरांकडे स्थलांतराचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

**३) ग्रामीण–ग्रामीण स्थलांतर** (Rural-Urban Migration) : या प्रकाराच्या शहरात एका ग्रामीण क्षेत्रातील लोक दुसऱ्या ग्रामीण क्षेत्राकडे स्थलांतर करताना दिसून येतात. यामध्ये कृषिक्षेत्राबरोबरच खाणकाम व औद्योगिक क्षेत्रात मिळणाऱ्या रोजगाराच्या संधीचा समावेश होतो.

**४) नागरी–ग्रामीण स्थलांतर** (Urban-Rural Migration) : या प्रकारामध्ये शहराकडून–ग्रामीण भागाकडे होणाऱ्या स्थलांतरास नागरी–ग्रामीण स्थलांतर म्हटले जाते. आजच्या गुंतागुंतीच्या व वाढत्या औद्योगिकरणामुळे शहरी भागातील लोक ग्रामीण भागात राहनेच पसंत करू लागले आहेत. परंतु याचे प्रमाण इतर स्थलांतरापेक्षा कमी असलेले पहावयास मिळते.

**३) अंतराच्या आधारावर होणारे स्थलांतर :** या प्रकारामध्ये प्रामुख्याने जवळच्या ठिकाणी होणारे स्थलांतर व दुसऱ्या ठिकाणी होणारे स्थलांतर असे दोन प्रकार पहावयास मिळतात. यामध्ये पहिल्या प्रकारात शिक्षण, भाजी व दूध विक्रेते यांचा समावेश होतो. तर नोकरी व उद्योगांच्या निमित्ताने होणारे स्थलांतर हे दुसऱ्या प्रकारात मोडते.

**२) बहिर्गत स्थलांतर किंवा आंतरराष्ट्रीय स्थलांतर** (International Migration)

बहिर्गत स्थलांतरामध्ये दोन्ही देशाच्या लोकसंख्येच्या संरचनेवर फार मोठा परिणाम होत असतो. कारण यामुळे एका देशाची लोकसंख्या वाढत असते तर दुसऱ्या देशाची लोकसंख्या कमी होत असते. या पद्धतीच्या स्थलांतरामध्ये मोठ्या प्रमाणात विकसनशील देशातील लोक विकसित किंवा प्रगत देशामध्ये शैक्षणिक, व्यावसायिक किंवा नोकरीच्या निमित्ताने स्थलांतरित होत असतात. अशाच पद्धतीने या स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये प्रगत किंवा विकसित राष्ट्राकडून अप्रगत किंवा अविकसित राष्ट्रांच्या सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी अनेक उच्च विद्याविभूषित लोक किंवा स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी स्थलांतरित होत असतात.

या प्रकारच्या स्थलांतरामध्ये देशाच्या सीमेबाहेर होणाऱ्या स्थलांतरास बहिर्गत किंवा आंतरराष्ट्रीय स्थलांतर असे म्हटले जाते. अशा प्रकारच्या स्थलांतरामध्ये दोन्ही देशांच्या धोरणानुसार किंवा कायद्यानुसार स्थलांतर होताना आढळून येते. कांहीवेळेस अनेक लोक एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतर करतात त्यावेळेस असे स्थलांतर हे बेकायदेशीर ठरत असते आणि यातूनच दोन्ही देशामध्ये तणावाची किंवा संघर्षाची परिस्थिती उद्‌भवते उदा. युद्ध, देशाची फाळणी, नैसर्गिक आपत्ती इ.

एका राष्ट्राच्या राजकीय सीमा ओलांडून जेंव्हा व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह दुसऱ्या राष्ट्रात तात्पुरता किंवा कायमच्या वास्तव्यासाठी जात असतो तेव्हा त्या त्या आंतरराष्ट्रीय स्थलांतर असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय स्थलांतरामध्ये भौगोलिक अंतर हे जास्त असते. पर्यायाने ज्या देशाचा आर्थिक व सामाजिक विकास हा मोठ्या प्रमाणावर झालेला असतो अशा देशामध्ये रोजगारांची उपलब्धता ही मोठ्या प्रमाणावर असते. रोजगाराबरोबरच सामाजिक सुरक्षितता मिळत असते पर्यायाने लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतर करत असतात.

आर्थिक, सामाजिक व तांत्रिक प्रगतीच्या प्रभावाने मानव अन्य देशात स्थलांतर करताना आढळून येतात. यामुळे मानव तेथील लोकांशी जुळवून घेणे अवघड होत जाते. कारण प्रत्येक देशाची भाषा, भाषेतील उच्चार व समाजजीवन यामध्ये मोठ्या प्रमाणात फरक दिसून येतो. परंतु अलिकडील काळामध्ये शासकीय धोरण व वर्णद्वेष यामुळे लोकांना दुसऱ्या देशामध्ये स्थलांतर करणे कठीण झाले आहे. असे असूनही आंतरराष्ट्रीय स्थलांतर हे सर्वत्र पहावयास मिळतेच. परंतु याचे प्रमाण मात्र सर्वत्र सारखेच आढळेल असे नाही. म्हणून आंतरराष्ट्रीय स्थलांतर हे कांही खालील घटकांवर अवलंबून असलेले दिसून येते ते पुढीलप्रमाणे–

**आंतरराष्ट्रीय स्थलांतर निश्चित करणारे घटक :**

आंतरराष्ट्रीय स्थलांतरावर परिणाम करणारे पुढील पाच घटकांचा समावेश होतो ते खालीलप्रमाणे–

**१) आर्थिक विकासाची भिन्नता :**

दोन देशांच्या आर्थिक स्थितीचा आणि लोकांच्या राहणीमानाचा आंतरराष्ट्रीय स्थलांतरावर परिणाम होत असतो. ज्या ठिकाणी उद्योगधंद्याचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला असतो व नोकऱ्यांची संधी मोठ्या प्रमाणात असते अशा ठिकाणी मागासलेल्या देशातून लोकांचे स्थलांतर होत असते.

**२) तांत्रिक ज्ञानाचा अपुरा प्रसार :**

एखाद्या देशातील तांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळे आंतरराष्ट्रीय स्थलांतराला चालना मिळत असते.

**३) जागेची उपलब्धता :**

ज्या देशामध्ये जागा विपुल प्रमाणात उपलब्ध असते अशा देशात स्थलांतर करणे लोक पसंत करतात.

**४) अतिलोकसंख्या :**

अतिलोकसंख्या असलेल्या देशातून लोक अन्य देशाकडे स्थलांतर करत असतात. अलिकडील काळात लोक एका बेटावरून दुसऱ्या बेटावर स्थलांतर करताना पहावयास मिळतात.

**५) परदेशी धोरण**

आंतरराष्ट्रीय स्थलांतरामध्ये विविध देशांच्या धोरणांचा परिणाम स्थलांतरावर झालेला दिसून येतो. १९ व्या शतकापर्यंत आंतरराष्ट्रीय स्थलांतराला जेवढी मुभा होती तेवढी आता राहिलेली नाही. म्हणून पूर्वीपेक्षा

अलिकडील काळात आंतरराष्ट्रीय स्थलांतराचे प्रमाण कमी पहावयास मिळते. याला अपवाद हा कांही देशाचा पहावयास मिळतो. उदा. अरब देश, कारण अशा देशांचे स्थलांतराचे धोरण तेवढे कडक पहावयास मिळत नाही.

**दुसऱ्या महायुद्धानंतर झालेले जगातील स्थलांतर**

जगामध्ये लोकांचे स्थलांतर हे फार पुर्वीच्या काळापासून सुरू असले तरी विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर जगाच्या विविध भागामध्ये झालेले स्थलांतर हे अतिशय महत्त्वाचे आणि लक्षणीय आहे ते पुढीलप्रमाणे–

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपातील लोकांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालेले दिसून येते. कारण या युद्धामध्ये युरोपातील बहुतेक देशांना झळ पोहचली होती. त्यामुळे युरोपातील एका देशातून दुसऱ्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले होते. त्याबरोबरच आफ्रिकेतील देशामध्येसुद्धा मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालेले पहावयास मिळते. आफ्रिकेतील निरनिराळ्या राष्ट्रातील राजकीय घडामोडी स्थलांतरास कारणीभूत आहेत.

आशियातील लोकांमध्ये स्थलांतराची प्रवृत्ती कमी असलेमुळे आंतरराष्ट्रीय हे कमी झालेले पहावयास मिळते.

**जगातील महत्त्वाचे स्थलांतर :**

**१) ज्यू लोकांचे स्थलांतर :**

दुसऱ्या महायुद्धानंतर ज्यू लोकांचे इस्रायलकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालेले पहावयास मिळते. दुसऱ्या महायुद्धापूर्वी ज्यू लोक इतरत्र विखुरलेले होते. १९४८ रोजी ज्यू लोकांचे इस्रायल या नवीन राष्ट्राला उदय झाला व जगातील सर्व ज्यू लोक इस्रायलमध्ये स्थलांतर करू लागले.

**२) सिंधी लोकांचे स्थलांतर :**

हिंदुस्थानच्या फाळणीनंतर सिंधी लोकांचे पाकिस्तानातून भारताकडे झालेले स्थलांतर हे लक्षणय असे होते.

**३) दक्षिण व्हिएतनामियांचे स्थलांतर :**

१९७० मध्ये कम्युनिष्टांच्या विजयानंतर अनेक लोक व्हिएतनामधून स्थलांतरित झाले.

**४) निर्वासितांचे स्थलांतर :**

जगात एका देशातून दुसऱ्या देशात होणारे निर्वासितांचे स्थलांतर हे सुद्धा महत्त्वाचे आहे. कारण असे होणारे स्थलांतर हे बेकायदेशीर असते अशा स्थलांतरामुळे त्या देशावर साधनसंपत्तीवर ताण पडत असतो. पर्यायाने देशाच्या विकासावर त्याचा परिणाम होतो.

## १) अंतर्गत स्थलांतर (Internal Migration)

ज्यावेळी एखादी व्यक्ती किंवा समूह देशांर्तगत स्थलांतर करतो त्या प्रक्रियेला अंतर्गत स्थलांतर म्हटले जाते. उदा. ऊस तोडणीच्या कालखंडामध्ये स्थलांतरीत होणारे मजूर हे एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात किंवा एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतरीत होताना दिसतात.

अंतर्गत स्थलांतरामध्ये ग्रामीण भागातून ग्रामीण भागात, ग्रामीण भागातून शहरी भागात, शहरी भागातून शहरी भागात व एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतरीत होताना दिसतात. भारतासारख्या कृषिप्रधान व विकसनशील देशामध्ये अलिकडच्या काळात अंतर्गत स्थलांतराची प्रक्रिया गतीमान झाल्याचे दिसून येते.

१९९० नंतर भारताने स्विकारलेल्या मुक्त आर्थिक धोरणामुळे अंतर्गत स्थलांतराच्या प्रक्रियेला वेग आलेला आहे. यापूर्वी कांही ठराविक शहरांपुरतीच मर्यादित असणारी स्थलांतराची प्रक्रिया सर्वच थरापर्यंत येवून पोहचलेली आहे. गेल्या दोन दशकामध्ये देशांर्तगत होणाऱ्या अशा पद्धतीच्या अंतर्गत स्थलांतरामुळे शहरीकरणाची प्रक्रिया झपाट्याने वाढत आहे. मुख्यत्वे करून ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणाऱ्या स्थलांतराचा वेग वाढलेला आहे असे दिसून येते.

स्थलांतराच्या पाठीमागे कोणताना ना कोणता उद्देश असतो. उद्दिष्टाची पुर्तता होण्यासाठी लोक स्थलांतर करतात. तर काही वेळा लोकांची इच्छा नसतानाही बळजबरीने शासनाद्वारे लोकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर केले जाते. तर काहीवेळा आकस्मित नैसर्गिक संकटे उदा. महापूर, भूकंप, दुष्काळ अशा कारणांनी लोकांचे स्थलांतर होते. वेगवेगळ्या प्रदेशात केलेले लोकांचे स्थलांतर हे सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे मानले जाते. लोकांच्या गरजांचे योग्य पद्धतीने निवारण व्हावे किंबहुना होईल अशा ठिकाणी स्थलांतर घडून येते. देशातल्या देशातच अंतर्गत विभागात जेव्हा लोकसंख्येचे स्थलांतर होते तेव्हा त्यास अंतर्गत स्थलांतर म्हंटले जाते.

किंग्जले डेव्हिस यांच्या मते, आंतरराष्ट्रीय स्थलांतरापेक्षा अंतर्गत स्थलांतर हे फार महत्त्वाचे असते. अंतर्गत स्थलांतराला फारशी बंदने नसतात. मुक्तपणे व्यक्ती देशातील कोणत्याही भागात, राज्यात जाऊ शकते. आर्थिक उत्पन्न मिळवू शकते त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्थलांतरापेक्षा अंतर्गत स्थलांतराचे प्रमाण सर्वात जास्त सर्वत्र आढळते.

एखाद्या देशातील व्यक्ती किंवा व्यक्तीचा समूह त्याच देशातील एका ठिकाणाहून दुसरीकडे राहावयास जाते त्यास देशांतर्गत स्थलांतर म्हणतात. देशातील कोणत्याही जिल्ह्यात किंवा राज्यामध्ये होणारे स्थलांतर हे देशातल्या देशात असते. महाराष्ट्रातील कोयणा धरण प्रकल्पाकरीत लोकांचे कोल्हापूर, सांगली, सातारा अशा वेगवेगळ्या जिल्ह्यात स्थलांतर केले आहे. तर रोजगारासाठी केरळ, आंध्र, तामिळनाडूतील कारागीराचे, महाराष्ट्रातील सोनारकाम करणारे अनेक प्रकारचे कारागीर देशाच्या विविध राज्यात स्थलांतर झाले आहे. स्थलांतर प्रामुख्याने शहराकडे मोठ्या प्रमाणावर होते. मुंबई, कलकत्ता, चेन्नई, दिल्ली अशा प्रगत शहराकडे लोक स्थलांतर करतात.

भारतातील ग्रामीण भागातही वाढत्या लोकसंख्येमुळे जमीनीचे तुकडीकरण होऊ लागल्याने ग्रामीण शेतकरी भूमिहीन व अल्पभूधारक बनला, बेकारी वाढते त्यामुळे ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर मोठ्या प्रमाणात होत असलेचे दिसून येते. लोकांचा शहराकडे स्थलांतर करणेचा कल वाढल्याने शहरात झोपडपट्टी, बेकारी, दारिद्रय, घरांचा प्रश्न, प्रदूषण अशा अनेक समस्या नव्याने निर्माण झाल्या आहेत.

काहीवेळा देशांतर्गत ज्या ठिकाणी शेती उद्योगाच्या विकासाचा वेग जास्त आहे अशा साखर कारखान्याच्या क्षेत्रात आजूबाजूच्या परिसरातील ग्रामीण लोक व ऊसतोड करणारे मजूर ऊसाचा सिझन जोपर्यंत आहे तोपर्यंत साखर कारखान्याच्या परिसरात स्थलांतर करतात. ऊसाचा सिझन संपला की आपल्या गावी निघुन जातात.

अंतर्गत स्थलांतराच्या प्रक्रियेमुळे भारताची ३५% लोकसंख्या ही शहरामध्ये स्थलांतरीत झालेली दिसून येते.

### २) बर्हिगत स्थलांतर (External Migration)

ज्यावेळी एखादी व्यक्ती किंवा समूह देशाबाहेर स्थलांतर करतो त्या प्रक्रियेला बर्हिगत स्थलांतर म्हटले जाते. अशा स्वरूपाचे स्थलांतर हे तात्पुरते किंवा कायम अशा दोन्ही प्रकारचे असू शकते. या पद्धतीच्या स्थलांतरामध्ये मोठ्या प्रमाणात विकसनशिल देशातील लोक विकसित किंवा प्रगत देशामध्ये शैक्षणिक किंवा नोकरी-धंद्याच्या निमित्ताने स्थलांतरीत होत असतात. अशाच पद्धतीने या स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये प्रगत किंवा विकसित राष्ट्राकडून, अप्रगत किंवा अविकसित राष्ट्रांच्या सामाजिक समस्यांच्या सोडवणूकीसाठी अनेक उच्च विद्याविभूषित लोक तसेच स्वयंसेवा संस्थाचे प्रतिनिधी स्थलांतरीत होत असतात.

आजच्या आधुनिक युगामध्ये माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात अद्यावत ज्ञानाची सातत्याने भर पडत आहे. या अनुषंगाने या माहितीच्या प्रसार व प्रचार करण्यासाठी तसेच लोककल्याणासाठी त्याचा वापर व्हावा म्हणून मानवी समूह एका जागेहून दुसऱ्या जागी सतत स्थलांतर करताना दिसून येतो.

अंतर्गत स्थलांतरामध्ये लोक खेड्याकडून शहराकडे व शहराकडून महानगराकडे स्थलांतर होत असतात त्याप्रमाणेच बर्हिगत स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये अविकसित देशाकडून विकसनशिल देशाकडे व विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे स्थलांतर करताना दिसून येतात.

एका राष्ट्राच्या राजकीय सीमा ओलांडून जेव्हा व्यक्ती किंवा व्यक्तीचा समूह दुसऱ्या राष्ट्रात तात्पुरता किंवा कायमच्या वास्तव्यासाठी जातो तेव्हा त्याला आंतरराष्ट्रीय स्थलांतर असे म्हणतात.

आंतरराष्ट्रीय स्थलांतरावर एकोणिसाव्या शतकाच्या पुर्वार्धापर्यंत निर्बंध नव्हते. त्या काळात जगात खूप स्थलांतरे घडून आली. १९४२ ते १९६० या कालखंडात भारतातील हजारो लोक दक्षिण आफ्रिकेत कायमचे स्थलांतरीत झाले. तसेच नेपाळ, श्रीलंका, भूतान, बांगलादेश या देशातील लाखो लोक भारतात कायमचे स्थलांतरीत झालेले आढळून येतात.

आंतरराष्ट्रीय स्थलांतरात भौगोलिक अंतर जास्त असेत. ज्या देशाचा आर्थिक, सामाजिक विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे अशा देशात रोजगाराची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर असते व सामाजिक सुरक्षिता मिळते अशा देशात लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर स्थलांतरीत होतात. भारतातील युवक उच्चशिक्षणासाठी, उच्चपदस्थ नोकरीसाठी, अकुशल रोजगारासाठी ही अमेरीका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, डेन्मार्क, जपान, जर्मनी अशा प्रगत राष्ट्रात भारतीय लोकांनी स्थलांतर केले आहे. हे स्थलांतर स्थायी व अस्थाई अशा दोन्ही प्रकारचे आहे, तर काही वेळा देशाच्या सिमेलगतच्या देशाशी सतत होणारे युद्ध यामुळेही लोक आपला देश सोडून दुसऱ्या देशात स्थलांतर करतात. १९४७ मध्ये पाकिस्तान, भारतापासून स्वतंत्र झाला पण निर्वासितांचे लोंढे भारताकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत झाले. त्याचप्रमाणे बांगलादेशातील निर्वासीतही १९७१ मध्ये भारताच्या आश्रयाला पश्चिम बंगालमध्ये स्थलांतरीत झाले.

आर्थिक प्रगती, सामाजिक प्रगती व तांत्रिक प्रगतीच्या प्रभावाने मानव अन्य देशात स्थलांतर करतो तेव्हा त्या देशातील लोकांशी मिळते-जुळते होणे अवघड जाते. राष्ट्राराष्ट्रामध्ये समाजजीवन व भाषेमध्ये, भाषेच्या उच्चारात मोठ्या प्रमाणात फरक असतो. व्यक्ती उच्चशिक्षित, पुरेसे कौशल्य, तांत्रिक ज्ञान प्राप्त नसेल तर आंतरराष्ट्रीय स्थलांतराला आपोआपच मर्यादा येतात.

शिवाय स्वदेशातील सामाजिक जीवनाशी व्यक्ती एकरूप झालेली असते. आपला देश, राज्य, गांव यांच्याशी त्याची नाळ जोडली गेलेली असते. त्यामुळे स्वदेशात ज्याप्रमाणे मोकळ्या वातावरणात व्यक्तीला स्वातंत्र्य उपभोगता येते पण परदेशी कायदे व समाजव्यवस्थेतील बंधने यामुळे तात्पुरते आंतरराष्ट्रीय स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे पहावयास मिळते.

भारतासारख्या देशामधून आज मोठ्या प्रमाणात उच्चशिक्षित तरूण वर्ग या प्रकारचे स्थलांतर करत असून हे स्थलांतर सामाजिक प्रतिष्ठेचे बनले आहे.

## १.६ स्थलांतराचे प्रवाह (Streams of Migration)

स्थलांतराचे प्रकार समजून घेतल्यानंतर या स्थलांतरांना कारणीभूत असणारे विविध प्रवाह समजून घेणे गरजेचे आहे. प्रामुख्याने स्थलांतराच्या प्रक्रियेला चालना देणारे दोन प्रमुख प्रवाह अधोरेखित करावे लागतील. त्यापैकी (१) आकर्षित करणारे घटक (Pull Factor) आणि (२) अनिच्छेने होणारे स्थलांतर (Push Factor) हे होत. या दोनही प्रवाहामध्ये स्थलांतराची प्रक्रिया ही बहुतांशी अस्थायी स्वरूपाची असते.

### १) आकर्षित करणारे घटक (Pull Factor)

स्थलांतरासाठी आकर्षित करणाऱ्या घटकामध्ये प्रामुख्याने खालील कारणांचा समावेश करता येईल -

### अ) भौगोलिक कारण (Natural Factor)

भारत देशात विविध हवामान असलेले विभाग आहेत. काही विभागात अतिउष्ण, अतिथंड, अतिपाऊसाळी हवामान, नापीकमृदा, भूकंप, ज्वालामुखी, टोळधाड, महापूर, साथीचे आजार इ. नैसर्गिक

अपत्तीमुळे तेथील लोकांचे सक्तीने स्थलांतर करावे लागते. उदा. १९६१ मध्ये पुण्यातील पानशेत धरण फुटल्यामुळे अनेक गावे पाण्याखाली गेली. अशा पुरग्रस्त लोकांनी पुणे कायमचे सोडले. याशिवाय गुजरात व महाराष्ट्रात भूकंप, महापूर मोठ-मोठी धरण बांधली यामुळे हजारो लोकांचे स्थलांतर झाले आहे.

याउलट जेव्हा लोकांना आवश्यक असणारे हवामान, कार्यक्षमता वाढविणारे आरोग्यदायी पर्यावरण, सुपीकमृदा, मुबलक पाणी, वनस्पतीची मुबलकता, खनिजे, नैसर्गिक संपन्नता, समृद्धता अशा शहरात रोजगारांची उपलब्धता मोठ्या प्रमाणावर होते, नविन व्यवसायाला प्रोत्साहन मिळते अशा ठिकाणी लोक स्थलांतरीत होतात.

नैसर्गिकदृष्ट्या साधन संपत्तीने परिपूर्ण असणारे ठिकाण उद्योधंद्याच्या वाढीला चालना देते. अशा प्रकारच्या शहरांमध्ये नोकरी व व्यवसायानिमित्ताने लोक स्थलांतर करतात. उदा. खौण खनिजांच्या खाणी. जिथे मोठ्या प्रमाणातच उपलब्ध आहेत अशा ठिकाणी व्यवसाय व नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध असतात. या संधीला आकर्षित होवून मोठ्या प्रमाणात विविध प्रांतातील लोक स्थलांतर करतात.

### ब) सांस्कृतिक घटक

लोकांना स्थिर व समाधानी जीवन जगण्यास, व्यक्तीला स्वातंत्र्य, समता, न्याय, हक्क प्राप्त होणे गरजचे आहे. तसेच सामाजिक दर्जा हा जातीवर आधारित न होता व्यक्तीच्या गुणवत्तेनुसार मिळावा अशी धारणा असते. पण ग्रामीण भागात या उलट चित्र पहावयास मिळते. परिणामी लोक जातीयता, धर्म यावरून सतत संघर्ष, नव्या संधीचा अभाव, जातीय अत्याचार, अशा अस्वस्थ करणाऱ्या परिस्थितीला कंटाळून शहराकडे स्थलांतर करतात.

आधुनिक व उच्च शिक्षणाच्या व आरोग्याच्या सुविधाचा अभाव उच्च राहणीमान ठेवण्यास बंधने, गटबाजी, वैरभावना, दहशतवाद अशा स्थितीला कंटाळून लोक शहराकडे स्थलांतरीत होत आहेत. याच बरोबर मानसिक, शारीरिक, राजकीय, सामाजिक स्थैर्य, शास्त्रीय व सांस्कृतिक परंपराची समृद्धी, कर्तव्य भावना, परस्पर सहकार्याची भावना, सहिष्णुता, सर्वधर्म समभाव, शांततामय परिस्थिती, बौद्धिक, सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य असे घटक लोकसंख्या केंद्रित करते.

### क) आर्थिक कारण (Economical Factor)

२१ व्या शतकामध्ये माहिती व तंत्रज्ञानाच्या मदतीने उद्योगधंद्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पर्यायाने रोजगार निर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतर करू लागलेत.

ग्रामीण भागात परंपरागत शेती, परंपरागत व्यवसाय व शेतमजूरी यावर जीवनाचा उदरनिर्वाह आहे. यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या गरजा व रोजगार उपलब्धतेचा अभाव असल्याने लोक रोजगाराची सहज उपलब्धता, रोजगाराच्या भरपूर संधी, औद्योगिकरण, औद्योगिक प्रगती, जास्त वेतन दर, कायम नोकरीची हमी, कोणत्याही प्रकारचा व्यवसाय करण्यास स्वातंत्र्य, कोणत्याही प्रकारचे काम करण्याची संधी, आर्थिक

स्वास्थ्य, उच्च राहणीमानाचा दर्जा, संशोधनाच्या उत्तम सुविधा, पुरेसे उत्पादन, उत्तम नागरी जीवनाची ओढ, चांगले घर, उत्तम व भरपूर आरोग्याच्या सोई. असा अनेक आर्थिक घटकांनी लोकसंख्या आकर्षित होते.

**ड) शिक्षण (Education)**

आपल्या पाल्याच्या भवितव्याचा विचार करून मोठ्या प्रमाणात पालक ज्या शहरामध्ये चांगल्या शिक्षणाच्या संधी उपलब्ध आहेत अशा ठिकाणी आकर्षित होवून लोक स्थलांतर करत असतात.

**इ) चांगले राहणीमान (Better Living Standard)**

ज्या ठिकाणी मूलभूत सोयीसुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध आहेत तसेच विविध प्रकारच्या सेवा उदा. आरोग्य, शिक्षण, क्रिडा, सांस्कृतिक गरजा भागविणारी केंद्रे उपलब्ध असणाऱ्या ठिकाणी लोक आकर्षित होवून स्वइच्छेने स्थलांतर करतात.

**ई) सुरक्षितता (Security)**

राजकीय व धार्मिक कारणांसाठी लोक सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्याला सोयीस्कर असणाऱ्या प्रदेशामध्ये स्वइच्छेने स्थलांतर करत असतात.

**उ) इतर घटक**

व्यक्ती ज्या ठिकाणी राहते त्या ठिकाणी जीवनाला स्वास्थ्य लाभेल अशा प्रकारचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक वातावरण समानतेच्या किंबहुना मानवतावादातून सर्वांना समान हक्क, न्याय, स्वातंत्र्य मिळाले तरच व्यक्ती आपले आयुष्य अशा ठिकाणी व्यथित करतो. पण या उलट स्थिती असल्यास त्या आपले व आपल्या कुटुंबाची आस्तित्वही टिकवणे मुश्किलीचे होते. परिणामी समतावादी, धार्मिक वातावरण, आधुनिक शिक्षणाच्या सुविधा, जिथे श्रमाला महत्त्व देऊन योग्य वेतन, शैक्षणिक पात्रतेनुसार काम व सामाजिक दर्जा प्राप्त होतो अशा शहराच्या ठिकाणी लोक स्थलांतरीत होतात.

**i) दळणवळण, वाहतुक सुविधा**

शहराच्या ठिकाणी औद्योगिक वसाहत निर्माण झालेली असते. औद्योगिकरणामुळे नागरिकरणाचा वेग सतत वाढत असतो. त्यामुळे अशा शहराच्या ठिकाणी वाहतुकीच्या सोईमुळे शैक्षणिक सुविधांमुळे तांत्रिक वैज्ञानिक क्षेत्राकडे लोक येतात. दळणवळणाच्या सोई या लोकांच्या संपर्काला व लोकांच्या वाहतुकीला उपयुक्त ठरतात व स्थलांतराला त्याचा फायदा होता.

**ii) सुरक्षा तथा संरक्षण**

खेड्यात परस्परांची ओळख झालेली असते. प्रत्येकाला एकमेकाबदल सर्वकाही माहिती असते शिवाय पारंपारिक जातपंचायती द्वारे नियंत्रण त्यामुळे एक प्रकारे एकाधिकारशाही त्यामुळे एखाद्या व्यक्तीची सामाजिक व आर्थिक जोखिम घ्यावयास सहज कोण तयार होत नाही. त्यामुळे पारंपारिक व्यवसाय करावा

लागतो. या उलट शहरात दुय्यम स्वरूपाच्या नियंत्रण व्यवस्थेमुळे व्यक्तीला सर्वार्थाने संरक्षण मिळत असते. व्यक्तीला संरक्षणाची खात्री असते. पोलिस हे एक संरक्षणाचे साधन आहे. कारखाने, व्यापार, बँका, सोन्या-चांदीची दुकाने, मोठी कापडाची दुकाने यासारखे मौल्यवान नि जोखमीचे व्यवहार केले जातात. अशा प्रकारे व्यवहार करणारे खेड्यातून शहराकडे स्थलांतरीत करतात.

### २) अनिइच्छेने होणारे स्थलांतर (Push Factor)

अनिइच्छेने होणाऱ्या स्थलांतरामध्ये खालील कारणांचा समावेश करावा लागेल -

### अ) रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध न होणे (Lack of Employment Opportunities)

अनेक वेळा विविध कारणांच्यामुळे एखाद्या भुप्रदेशामध्ये पुरेश रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. अशा वेळेस बहुसंख्या लोक अनिच्छेने मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होत असतात.

### ब) दुष्काळ आणि आर्वषण (Femain and Drought)

निसर्गाच्या अवकृपेमुळे व मानवाच्या हस्तक्षेपामुळे निसर्गाचा समतोल बिघडू लागल्यामुळे दुष्काळ व आर्वषणासारखी परिस्थिती निर्माण होवून मानवाला आपल्या मूळ वस्ती स्थानापासून अनिइच्छेने स्थलांतरित व्हारे लागते.

### क) नैसर्गिक आपत्ती (Natural Calamities)

भूस्खलन, भूकंप, महापूर, त्सुनामी यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे मानवाला नाईलाजाने अनेक ठिकाणाहून स्थलांतर करणे भाग पडते.

### ड) युद्ध (War)

प्राचीन कळापासून ते आजपर्यंतच्या युद्धांच्या इतिहासाचा विचार केल्यास मानवाला मोठ्या प्रमाणात आपल्या मुळ वस्तीस्थानापासून अनिच्छेने स्थलांतर करावे लागले आहे.

### इ) विकास प्रक्रियेतील स्थलांतर (Migration Due to Development Processes)

माहिती व तंत्रज्ञानाच्या या युगामध्ये विकासाच्या नावाखाली मोठ-मोठे प्रकल्प राबविले जातात. उदा. धरणे, कालवे, रस्ते, औद्योगिक वसाहती, सेझ इ. यामुळे व्यक्तीला नाईलाजाने स्थलांतर करावे लागते.

**सारांश :**

आजच्या युगात स्थलांतरास वरील सर्व घटक कारणीभूत ठरतातच शिवाय उत्तमप्रतीचे कौशल्य तांत्रिक, वैज्ञानिक ज्ञान प्राप्त केलेल्या बुद्धिमान, गुणवान व्यक्ती आपल्या बुद्धिकौशल्याला वाव मिळेल व गलेलठ्ठ पगाराची नोकरी मिळेल अशा प्रगत देशाकडे स्थलांतर करतात. या ग्रामीण भागात धर्म किंवा जातीभेदाचा दीर्घकालीन प्रभाव पडत असतो. जातीय संघर्ष कधी केंव्हाही उद्भवेल याची शाश्वती नाही व

जेथे अशा गोष्टीस खतपाणी घातले जाते तेथे अस्थिर समाजजीवन निर्माण होते. जेथे समाज विकास होऊ शकत नाही. अशा ठिकाणाहून लोक अन्य ठिकाणी स्थलांतर करतात.

## १.७ औद्योगिक पूर्व समाजातील स्थलांतर (Migraton in Pre-Industrial Societies)

मानवाचा इतिहास असे सांगतो की, मानव भटकंती करून आपला उदरनिर्वाह करत असे. कालांतराने वेगवेगळ्या अनुभवाने तो स्थिर होण्याचा प्रयत्न करत होता. या प्रयत्नाचा भाग म्हणून भाकरीच्या शोधत राहणाऱ्या माणसाने निवाऱ्याची सोय लावण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नातून त्याने त्याचे घर व झोपडी उभी केली. झोपडीत दोन-चार माणसे राहू लागली. समूहजीवनाचा फायदा त्याच्या लक्षात आला. म्हणून त्याने चार-दोन लोकांना जवळ केले. प्रत्येकांचा निवारा ऐकमेकांशेजारी उभा केला. शेजारी-पाजारी राहणाऱ्या लोकांची नव्याने एक वस्ती आकाराला आली. त्यातूनच पुढे खेडे निर्माण झाले. लोकांची संख्या वाढू लागली म्हणून खेड्याचे एक मोठे गाव तयार झाले. त्याला कसबा म्हणतात. कसब्याचे नंतर एक छोटे शहर तयार झाले. घराची वस्ती, वस्तीचे खेडे, खेड्याचे गाव तथा कसबा आणि कसब्याचे रूपांतर शहर तथा नगरात झाले. अशा शहरात रोजगाराची उपलब्धता, शिक्षण, आरोग्य, मनोरंजनाच्या सोई सुविधा उपलब्ध होऊ लागल्याने औद्योगिकपुर्व कालखंडात ही शहराकडे स्थलांतर व होत असल्याचे अनेक अभ्यासकांच्या अभ्यासावरून दिसून येते.

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजांच्या पुर्ततेसाठी मानवाने सातत्याने एका जागेहून दुसऱ्या जागेवर स्थलांतराची प्रक्रिया सुरू ठेवलेली दिसते. शेतीचा शोध लागल्यानंतर कांही मानवी समूह एकाच ठिकाणी स्थाईक झाले. परंतु पशुपालन व इतर उद्योग करणारे लोक सातत्याने भटकंती करत होते. यातूनच आपण मानवी समूहांचे स्थाईक व भटके असा दोन भागामध्ये वर्गीकरण करतो.

औद्योगिक पुर्व स्थलांतराचा विचार करताना खालील मुद्यांचा प्रामुख्याने अभ्यास करावा लागेल.

### १) औद्योगिक पूर्व नगर (Pre-Industrial City)

मानवाच्या जीवन उपयोगी सर्व साधने तो पूर्वी पासूनच करत आलेला आह. वस्तूचे स्वरूप सुबक नसेल, परंतु जे होते ते उपयुक्त होते, बीन त्रासाचे होते, मानसिक ताण निर्माण करणारे नव्हते. काळाच्या ओघात खेड्याचे रूपांतर शहरात झाले. त्यालाच आपण कसबा म्हणतो.

### २) मूलभूत गरजांची पुर्तता (Fulfillness of Basic Needs)

अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांची पुर्तता करण्यासाठी मानव सातत्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करत आलेला आहे. या प्रकारचे स्थलांतर आदिम अवस्थेपासून सुरू असून ते आजही अख्याहतपणे सुरू असलेले दिसून येते.

### ३) आदिवासी स्थलांतर (Trimal Migration)

आदिवासीचे जीवन निसर्गावर अवलंबून असून सतत निसर्गाशी संघर्ष करून अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करावी लागते. खाद्यसंकलन, शिकार, स्थानांतरित शेती या आर्थिक गरजासाठी

आदिवासींना सतत भटकंती करावी लागते. अशा प्रकारे अन्न संकलनाच्या शोधात आदिवासी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी आपल्या टोळीसह स्थलांतर करत असत.

**४) शेती**

आदिम जमाती प्राचीन काळात झूम, दाह, बदलती कुऱ्हाड पद्धतीची शेती करत असत. एखाद्या तुकड्यावर वर्षभर शेती, दुसऱ्या वर्षी दुसऱ्या जमीनीच्या तुकड्यावर शेती करत, तसेच शिकार शोधण्यासाठी व अनुकूल पर्यावरण मिळणेसाठी सतत ते ठिकाण बदलत असत. अशा कारणांनी स्थलांतर केले जात असे.

**५) शत्रु पासून संरक्षण**

प्राचीन काळात लोक टोळी करून रहात असे. टोळी युद्धात एखाद्या प्रदेशावर वर्चस्व निर्माण करणे, दुसऱ्या टोळीला त्या ठिकाणावरून पळवून लावणे या कारणासाठी सतत टोळीयुद्ध होत असे. दुसऱ्या टोळीने आपल्या टोळीवर आक्रमण करू नये तसेच सुरक्षित रहावे म्हणून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करावे लागत असे.

**६) साम्राज्य प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने**

प्राचनी काळात आसपासच्या सर्व भागावर आपली सत्ता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने स्थलांतर केले जात असे. दुसऱ्या प्रदेशावर चाल करून तेथील सत्ता आपल्या हाती घेऊन आपली सत्ता साम्राज्याचा विस्तार करणे हा जीवन पद्धतीचा एक भाग होता या उद्देशाने एखाद्या प्रदेशावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी दुसऱ्या प्रदेशात कायमचे स्थलांतर करावे लागत असे तर काही वेळा गुलामांचा व्यापार केल्याने गुलामांचे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात स्थलांतर होत असे.

मानवाने आपले अस्तित्व राखण्यासाठी व आपलय वंशाचे श्रेष्ठत्व ठिकविण्यासाठी आदिम अवस्थेपासून एक समूह दुसऱ्या समूहाबरोबर नेहमी संघर्ष करत आलेला दिसून येतो. यातूनच त्याने आपले साम्राज्य वाआढवून तो दुसऱ्या समूहावर वर्चस्व प्रस्थापित करत गेला. यातूनच कांही समूह स्थलांतरित होत गेले.

**७) धार्मिक प्रचार व प्रसार (For Religious Preaching and Practise)**

प्राचीन काळापासून मानवाने आपल्या धार्मिक विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सातत्याने मोठ्या प्रमाणात देशांतर्गत व देशाबाहेर मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालेले दिसून येते.

**८) साम्राज्यवाद व विस्तार (Expansion of Kingdom)**

मांवाने आपले अस्तित्व राखण्यासाठी व आपल्या वंशाचे श्रेयतत्त्व टिकविण्यासाठी आविय अवस्थेपासून एक समूह दुसऱ्या समुहाबरोबर नेहमी संघर्ष करत आलेला दिसून येतो. यातूनच त्याने आपले साम्राज्य वाढवून तो दुसऱ्या समूहावर वर्चस्व प्रस्थापित करत गेला. यातूनच कांही समूह स्थलांतरित होत गेले.

**मूल्यमापन**

स्थलांतराचे समाजशास्त्र या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. या घटकामध्ये आपण स्थलांतराची संकल्पना, प्रकार, प्रवाह या घटकांचा समावेश केलेला आहे. थोडक्यात स्थलांतराची प्रक्रिया ही मानवाने आपल्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी अव्याहतपणे चालू ठेवलेली एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे कांही प्रमाणात मानवी समूहांना सुख व समाधान मिळाले असले तरी त्याचे आजच्या झपाट्याने वाढणाऱ्या शहरीकरणांमध्ये कांही दृष्परिणाम दिसून येवू लागले आहेत. याचा परिणाम म्हणून सामाजिक विसंघटनाची (Social Disorganization) प्रक्रिया निर्माण होवू लागली आहे. ज्यामुळे सामाजिक अस्थिरता उदयाला येवू लागली आहे. अशी परिस्थिती टाळण्यासाठी व स्थलांतराचा प्रवाह रोखण्यासाठी शासकीय पातळीवरून कांही सकारात्मक धोरणांची व कार्यक्रमांची निर्मिती होणे गरजेचे आहे.

## १.८ सरावासाठी प्रश्न

१. स्थलांतराची संकल्पना स्पष्ट करा.

२. स्थलांतराचे प्रवाह विशद करा.

३. अंतर्गत व बहिस्थ स्थलांतर स्पष्ट करा.

४. पुर्व औद्योगिक स्थलांतरासंबंधी थोडक्यात माहिती द्या.

## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


1. Lee Everett (1968). A Theory of Migration in Heer D.M. (eds) Readings on Population.
2. Castels Stephen and Miller, Mark J. (1990). The Age of Migration : International Population Migrate in the Modern World 2nd edu. New York.
3. Kaul, Ravendrakumar : Migration and Society. Jaipur, Rawat Publication.


❑❑❑

## सत्र–३ : घटक २

# स्थलांतराचे सिद्धांत

(Theories of Migration)

## अनुक्रमणिका

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्ट्ये

२.३ विषय विवेचन

२.३.१ स्थलांतराच्या सर्वसामान्य तत्वानवरील सिद्धांत : (अ) इ. जी. रवेन्स्तेन आणि (ब) एवेरेटट् ली.

(Theories on general principles of Migration : E. G. Ravestein and Everett Lee)

२.३.२ प्रवाह आणि विरूद्ध प्रवाहाशी संबंधीत सिद्धांत

(Laws Relating to Stream and Counter Stream)

२.३.३ शास्त्रीय आणि नवशास्त्रीय सिद्धांत : तोदरो आणि लेविस

(Classical and Neo-Classical Models : Todaro and Lewis)

२.४ सरावासाठी प्रश्न

२.५ सविस्तर उत्तरे लिहा

२.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ प्रस्तावना (Introduction)

स्थलांतराचे समाजशास्त्र (Sociology of Migration) या विषयाचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना बहुधा मुलभूत प्रश्न असा पडतो की, लोक स्थलांतर का करतात? स्थलांतराचे फायदे व तोटे काय असतात? अशा अनेक प्रकारच्या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेण्यासाठी स्थलांतराच्या संदर्भात सिद्धांत मांडणारे तज्ज्ञ सिद्धांतकारानी सिद्धांत व नियम मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आणि या सिद्धांतामध्येच आपल्याला उत्तर सापडते की लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर का करतात व अशा प्रकारे केल्या जाणाऱ्या स्थलांतराचे फायदे व तोटे आपल्या लक्षात येतात. आणखीन एक सततचा पडणारा प्रश्न असा असतो की, सिद्धांतामध्ये नेमकी मांडणी कशांची केली जाते? तर सिद्धांतामध्ये नेहमी तथ्याची मांडणी

केली जाते व तथ्यांची पडताळणी करण्याचे काम केले जाते. तथ्यांच्या आधारावर मांडलेले सिद्धांत स्थलांतराच्या अभ्यासासाठी व संशोधनासाठी मूलभूत गोष्टी पुरवित असतात. म्हणून प्रत्येक क्षेत्रात सिद्धांताला अनन्य साधारण महत्त्व देण्यात आलेले आहे. सर्वसाधारणपणे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वास्तव्य करणे म्हणजे स्थलांतर होय, किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे म्हणजे स्थलांतर होय. स्थलांतर दोन प्रकारचे असते. एक म्हणजे देशाअंतर्गत व दुसरे म्हणजे देशा बाहेर. थोडक्यात स्थलांतर करण्याची प्रक्रिया ही एक प्रकारची चळवळ मानली गेली आहे, या चळवळीच्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक स्थलांतरीत व्यक्ती ही यशस्वी वाटचाल करण्यासाठी स्थलांतर करत असते. पण शंभर टक्के यश प्रत्येकाच्या वाट्याला येईल हे सांगता येत नाही. या सर्व गोष्टी सिद्धांतकारांनी शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

## २.२ उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला –

१. इ. जी. रवेन्स्तेन व एवेरेटट्र ली यांचा स्थलांतराबद्दलचे सर्वसामान्य सिद्धांत/तत्व काय आहे हे समजून घेता येईल.

२. लेविस व तोदरो यांचे स्थलांतरासंदर्भातील शास्त्रीय व नव-शास्त्रीय (Classical and Neo-Classical) पद्धती समजुन घेता येतील.

## २.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

अ) स्थलांतर करताना लोक मुख्यत्वे आपण वास्तव्यात असलेल्या ठिकाणावरून ज्या ठिकाणी आपल्याला जायचे आहे याचे आगोदर गणित घालतात आणि मगच त्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या फायद्यांचा व तोट्यांचा विचार करून स्थलांतर करतात.

ब) भारताच्या संदर्भात विचार केल्यास सिद्धांतकारानी मांडलेल्या सिद्धांतानुसार असे दिसून येते की, शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील लोकांच्यामध्ये स्थलांतर करण्याचे प्रमाण जास्त आहे, याचे स्पष्टीकरण केलेले दिसते.

क) एकूणच जागतिक पातळीवरील विचार करता विकसनशील देशामध्ये स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे.

### २.३.१ स्थलांतराच्या सर्वसामान्य तत्वानंवरील सिद्धांत : अ) इ. जी. रवेन्स्तेन आणि (ब) एवेरेटट्र ली.

### (Theories on General Principles of Migration : E. G. Ravenstin and Everett Lee)

१९ व्या शतकाच्या पुर्वार्धात इ. जी. रवेन्स्तेन यांनी २० देशांच्या माहिती संकलनावर आधारित अनेक प्रकारच्या सिद्धांताचा दावा केला आहे. इ.जी. रवेन्स्तेन यांचे स्थलांतर संदर्भातील दोन लेख 'स्थलांतराचा सिद्धांत' (Laws of Migration) हे जून १८८५ व जून १८८९ या कालावधीत 'Journal of The

Royal Stastical Society या नियतकालीका मध्ये प्रसिद्ध झाले होते. हे दोन्हीही पेपर्स अनुभव आणि सैद्धांतिक पातळीवर आधारित असल्याने आजसुद्धा स्थलांतराच्या मांडल्या जाणाऱ्या सिद्धांतामध्ये प्रचलित आहेत. रवेन्स्तेन यांचा सिद्धांत खालील प्रमाणे.

**स्थलांतराचे नियम (The Laws of Migration)**

**१) स्थलांतर आणि अंतर (Migraton and Distance)**

बरेच स्थलांतर हे कमी अंतराचे असतात, म्हणजेच केंद्रभागी वाढत जाणारे स्थलांतर कमी अंतरामुळे दररोजचे येणे जाणे शक्य असते, त्यामुळे स्थलांतर करणाऱ्यांची संख्या कमी असते, पण स्थलांतर करणारे जेंव्हा लांबच्या पल्ल्यावर किंवा अंतरावर स्थलांतर करत असतात. तेंव्हा ते मोठी केंद्रे व जिथे व्यापार आणि उद्योग आहे अशा ठिकाणाला प्राधान्य देत असतात.

**२) टप्यानुसार स्थलांतर (Migration by Stages)**

वैश्विक स्थलांतराची प्रक्रिया ही नेहमीच व्यापार आणि उद्योग असणाऱ्या मोठ्या केंद्राच्या दिशेनेच होत असते. अशा केंद्राच्या दिशेने होणारे स्थलांतर व याला कारणीभूत असणारे घटक म्हणजे ग्रामीण भागातील रहिवाशी, वाढत जाणारे शहराचे क्षेत्र आणि सभोवताली असणारा दुर्गम परिसर जोपर्यंत व्यापला जात नाही तोपर्यंत स्थलांतर घडत असते. आणि दुर्गम परिसर हा स्थलांतर करणाऱ्या लोकांमुळेच व्यापून जात असतो. वाढत जाणाऱ्या शहरांचा प्रभाव जोपर्यंत अपयशी ठरत नाही तोपर्यंत स्थलांतर हे वाढतच जात असते.

**३) प्रवाह आणि उप प्रवाह (Stream and Counter Stream)**

प्रत्येक स्थलांतराचा मुख्य प्रवाह हा उप प्रवाहाची भरपाई करून देत असतो.

**४) स्थलांतर करणाऱ्यांमध्ये ग्रामीण आणि नागरी वृत्ती**

**(Urban Rural Differences in Propensity to Migrate)**

भारतातील स्थलांतरासंदर्भात पाहिल्यास असे दिसून येते की शहरी भागातील लोकांच्या तुलनेत ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात.

**५) कमी अंतराच्या स्थलांतरामध्ये महिलांचे प्रमाण जास्त असते.**

**(Predominance of Females among short distance Migrants)**

पुरूषांच्या तुलनेत कमी अंतराच्या स्थलांतरामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.

**६) तंत्रज्ञान आणि स्थलांतर (Technology and Migration)**

व्यापार आणि उत्पादनाच्या तंत्रामध्ये वाढ होवून विकास वेगाने पसरतो व स्थलांतराचे प्रमाण वाढते.

### ७) स्थलांतरामध्ये आर्थिक उद्देशांचा जास्त प्रभाव असते (Dominance of economic motive)

दडपून टाकणारे व वाईट कायदे, अधिक कर, सुट न होणारे वातावरण, बिघडलेले सामाजिक वातावरण अशा अनेक गोष्टी स्थलांतराचे उपप्रवाह निर्माण करत असतात.

### रवेन्स्तेन यांच्या सिद्धांताचे मुल्यमापन (Evaluation of Ravenstein's Law)

रवेन्स्तेनच्या सिद्धांताने शंभर वर्षापेक्षा अधिक कालावधीचे अस्तित्व निर्माण करून आद्य कर्तव्य पार पाडले आहे. हा सिद्धांत अतिशय साध्या पद्धतीचा आहे, यामध्ये जास्त वास्तव रेखाटलेले दिसत नाही. तसेच स्थलांतरच्या प्रक्रियेला जबाबदार असणारे सामाजिक, आर्थिक व राजकीय घटकांच्या जास्त खोलवर गेलेले आढळत नाही. या सिद्धांतामधील असणाऱ्या कमतरता खालील प्रमाणे –

अ) व्यापार आणि उद्योगाची मोठी केंद्रे इतर छोट्या केंद्राची वृद्धी व विकास टाळण्यासाठी किंवा खुंटीत करण्यासाठी का निर्माण केली आहेत ?

ब) विकसनशील देशामध्ये असे दिसून आले आहे की, स्थलांतर करणारे मोठ्या शहरामध्ये विशिष्ठ अशी झेप घेतात. (उदा. भारताच्या संदर्भात पाहिले गेल्यास मोठी शहरे दिल्ली, मुंबई, कोलकत्ता, चेन्नई इत्यादी) म्हणून या ठिकाणी टप्यानुसार स्थलांतराचा सिद्धांताचे (Stage-wise Migration) वर्णन विकसित देशांच्या संदर्भात करायला हवे. कारण भारतात होणाऱ्या स्थलांतराची प्रक्रिया ही थेट मोठ्या शहरामध्ये (Metropolies) न होता छोट्या शहरांना अनुसरूनच स्थलांतर होत असते.

ड) ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात ते म्हणजे नैसर्गिक दृष्ट्या (Natural Tendancy) केले जाणारे स्थलांतर नव्हे, तर या पाठीमागे असणारे ग्रामीण दारिद्रय स्थलांतराच्या प्रक्रियेसाठी जबाबदार आहे की ज्यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे मोठ्या प्रमाणात शहरी भागामध्ये स्थलांतर होत असते.

इ) कमी अंतराच्या स्थलांतरामध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण जास्त असते हे खरे आहे, पण कामगारांच्या स्थलांतराच्या संदर्भात हे सत्य आहे असे दिसून येत नाही.

ई) स्थलांतर आणि तंत्रज्ञान यामध्ये असणारे संबंध हे वास्तव आहे पण त्यामध्ये औद्योगिक क्षेत्र व दळणवळणाच्या साधनांच्या विकासाची वैशिष्ट्ये यांचा यामध्ये संबंध येत नाही आणि त्यामुळेच स्थलांतर होत नाही. वसाहतवादाच्या काळापासून पाहिल्यास भारतातील मोठी शहरे (Metropolies) ही तेंव्हापासून निर्माण झालेली आहेत. जेंव्हापासून इतर शहरांच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले आहे.

इ) स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये आर्थिक हेतू हा महत्त्वाचा भाग आहे, पण जी पद्धत या सिद्धांतामध्ये मांडण्यात आलेली आहे, त्यामध्ये स्थलांतर होण्यामागची कारणे नमुद केलेली दिसत नाहीत. उदा. दारिद्रय, उपासमार, बेकारी, अविकसीतपणा आणि ग्रामीण भागामध्ये न झालेला विकास.

### ब) एव्हेरेटट् ली यांचा स्थलांतराचा सिद्धांत (Everett Lee's Theory of Migration)

एव्हेरेटट् ली यांनी १९६५ मध्ये "Mississippi Valley Historical Association" इथे वार्षीक सभेमध्ये स्थलांतराचा सिद्धांतासंबंधी लेख मांडला त्यामध्ये त्यांनी स्थलांतरासाठी कोणते घटक कारणीभूत आहेत याची मांडणी खालील प्रमाणे केली आहे -

१) उत्पत्तीस्थानाशी संबंधीत असणारे घटक उदा. जास्त वेतन व नोकरीच्या अधिक संधी.

२) मुक्कामाच्या भागाशी संबंधीत असणारे घटक उदा. धोका, अनिश्चितता.

३) उत्पत्तीस्थान आणि मुक्काम यामध्ये असणारे अडथळे. उदा. अंतर, किंमत, प्रतिबंधात्मक नियम (restrictive laws).

४) वैयक्तिक घटक उदा. वय, लिंग, वर्ग, शिक्षण, कौशल्य इ.

स्थलांतराशी संबंधीत विचार केल्यास वर नमूद केलेल्या घटकांनी जी भूमिका पार पाडली आहे ती अधिक, शुन्य आणि वजा अशा मुल्यांच्या स्वरूपात आहेत. यामध्ये फक्त एवढेच वर नमूद केलेले घटक नसून स्थलांतराच्या प्रक्रियेतील या गोष्टींचे आकलन ली यांच्या मते, स्थलांतराच्या निर्णयामध्ये महत्त्वाचे आहेत.

प्रत्येक भागामध्ये दोन किंवा तीन गोष्टी अशा असतात की, ज्यामुळे स्थलांतर करणारे स्थलांतरीत होण्यासाठी प्रभावित होत असतात. त्यामध्ये स्थलांतरीत होण्यासाठी एखाद्या घटकाला एखादी गोष्ट आकर्षित करत असते, तर दुसऱ्या घटकाला इतर दुसरी गोष्ट आकर्षित करत असते आणि प्रत्येकाला आकर्षित करणाऱ्या गोष्टीच स्थलांतर करण्यास भाग पाडत असतात.

**स्थलांतराच्या तीव्रतेशी संबंधीत असणारे घटक**

**(Laws Relating to the Volume of Migration)**

अ) स्थलांतराची तीव्रता त्या ठिकाणी असलेल्या भागाच्या विविधतेनुसार व विविधतेच्या प्रमाणानुसार (degree of diversity) बदलत असते. ली असे म्हणतात की, अमेरिकेत ज्यांचे स्थलांतर झाले त्यांनी स्थलांतर करण्याचे कारण म्हणजे त्या ठिकाणी लागलेल्या सोन्याच्या खाणींचा शोध, म्हणून अमेरिकेमध्ये गतीशील अर्थव्यवस्था निर्माण होऊन मोठा बदल घडून आला आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्याने कामगारांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले.

ब) स्थलांतराची तीव्रता लोकांच्या विविधतेनुसार बदलत असते. ली यांच्या मते, लोकांची विविधता असणे म्हणजेच विशिष्ट गट असल्याचे सुचित करतो. मुख्यत्वे दिलेल्या किंवा मिळालेल्या कामाशी त्यांची जुळणी किंवा बांधणी झालेली असते आणि यामुळेच स्थलांतरामध्ये वाढ होत असते. उदा. उच्च कौशल्य आत्मसात असलेले लोक, त्यांना मागणी असते म्हणून स्थलांतरीत होत असतात.

क) स्थलांतराची तीव्रता कठीण परिस्थिती पार करण्यासंबंधी व अडथळे दूर करण्याशी संबंधीत असते.

ड) आर्थिक चढ-उतारामुळे स्थलांतराची तीव्रता बदलत असते.

इ) स्थलांतराची तीव्रता आणि स्थलांतराचा दर कालावधीनुसार वाढत असतो. ली यांचे असे मत आहे की, विकसीत तंत्रज्ञान हे स्थलांतरामध्ये येणाऱ्या अडथळ्यांना दूर करते, त्यामुळे दळणवळण स्वस्त होऊन स्थलांतराचे प्रमाण वाढते.

ई) स्थलांतराची तीव्रता देशातील प्रगतीच्या परिस्थितीनुसार बदलत असते. ली यांनी सांगितले आहे की, अधिक प्रमाणात होत जाणारा विकास हा लोकांना गतिशिलतेच्या दिशेने जाण्यास भाग पाडतो, जेणेकरून यामध्ये अधिक शिकलेले, बुध्दिवान व कौशल्य आत्मसात असलेले लोक सहभागी होत असतात.

**प्रवाह आणि विरूद्ध प्रवाहाशी संबंधीत सिद्धांत**

**(Laws Relating to Stream and Counter Stream)**

अ) स्थलांतराची प्रक्रिया जेणेकरून निश्चित अशा प्रवाहामध्ये नेण्यास भाग पाडते. म्हणून ली असे म्हणतात की, संधी ह्या विशिष्ठ स्थानापुरत्या मर्यादित असतात व स्थलांतर करणाऱ्यांनी त्यांचे दळणवळणाचे मार्ग निश्चित केलेले असतात, तसेच स्थलांतर करणाऱ्यांना आपले मुक्कामाचे ठिकाण व आपल्या मुळ ठिकाणी परत येण्याच्या माहितीमुळे स्थलांतर हे विकसित अशा प्रवाहामध्ये होत असते.

ब) प्रत्येक मोठ्या स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये उपप्रवाह निर्माण होत असतात. ली यांनी असे दृष्टिक्षेपात आणले आहे की, जे लोक स्वत:ची ध्येये व उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यामध्ये अपयशी ठरत असतात ते लोक माघारी किंवा आपल्या मुळ ठिकाणी पुन्हा स्थलांतरीत होत असतात.

क) स्थलांतर करण्याची तीव्रता जर जास्त असेल तर स्थलांतराच्या ठिकाणी विकासाचे मार्ग देखील जास्त असतात आणि साहजिकच स्थलांतर करणाऱ्या लोकांच्या मुळ ठिकाणी उदरनिर्वाहाची साधने ही नक्कीच कमी असतात.

ड) जर मुळ ठिकाण व स्थलांतराचे ठिकाण सारखेच असेल तर प्रवाह व उपप्रवाहाची स्थलांतराची क्षमता कमी होण्याची शक्यता असते.

इ) स्थलांतराची तीव्रता आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. म्हणजेच आर्थिक तेजीमध्ये स्थलांतराचे प्रमाण अधिक असते तर मंदीमध्ये स्थलांतराचे प्रमाण कमी असते.

**स्थलांतराच्या वैशिष्ठ्यांशी संबंधीत सिद्धांत**

**(Laws Relating to Characteristics of Migration)**

**अ) स्थलांतर हे निवडक असते –**

स्थलांतर हे नेहमी निवडक असते, मुळ ठिकाणी आणि स्थलांतराच्या ठिकाणी कमी अधिक घटकांच्या आकलनाने लोकांमध्ये बदल होत असतो. आणि त्या कमी अधिक घटकांना त्यांच्याकडे

असणाऱ्या क्षमतेनुसार स्थलांतर करणारे प्रतिसाद देत असतात व स्थलांतराच्या प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडथळ्यांवर मात करत असतात. स्थलांतराच्या ठिकाणाच्या प्रक्रिया कधी सकारात्मक तर कधी नकारात्मक स्वरूपाची असते. सकारात्मक निवड म्हणजे स्थलांतर करणारे उच्च दर्जाचे, गुणवत्तेचे व कौशल्य असणारे असतात तर नकारात्मक निवड म्हणजे स्थलांतर करणारे कनिष्ट दर्जाचे, कमी गुणवत्तेचे व अंगी कौशल्य नसणारे असतात. सकारात्मक स्थलांतर करणारे मुक्कामाच्या ठिकाणी अधिक व सकारात्मक दृष्ट्या निवडलेल्या घटकांना मुख्यत्वे प्रतिसाद देतात. सकारात्मक स्थलांतरामध्ये व्यावसाईक लोक वरचेवर स्थलांतरीत होत असतात आणि त्यांच्या मते, स्थलांतर करणे म्हणजे प्रगतीच्या दिशेने पुढे जाणे होय.

कमी गुणवत्ता, कौशल्य व शिक्षण असणारे लोक प्रतिकुल परिस्थितीमुळे जास्त करून स्थलांतर करतात, पण असे स्थलांतरीत लोक त्यांनी निवडलेल्या क्षेत्राला सकारात्मक दृष्ट्या प्रतिसाद न देता नकारात्मक दृष्ट्या प्रतिसाद देतात, म्हणजेच अशा लोकांची परिस्थितीशी मिळते जुळते घेण्याची प्रक्रिया मंदावते.

**एवेरेटट ली यांच्या सिद्धांताचे मुल्यमापन (Evaluation of Everett Lee's Theory)**

स्थलांतराच्या संशोधनामध्ये ली यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. पण खाली नमुद केलेल्या कारणासाठी या सिद्धांतावर टिका करण्यात आल्या आहेत.

अ) या सिद्धांताला आधार देत असताना अनुभवाधिष्टित घटनांची कमतरता यामध्ये जाणवते. तसेच या सिद्धांतातील पडताळणी गणितीय किंवा इतर शास्त्रीय दृष्टिकोनातून करण्यात आलेली नाही. म्हणजेच अगदी ढोबळ मानाने हा सिद्धांत ली यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

ब) स्थलांतर करत असताना कमी अधिक प्रमाणात येणारे अडथळे, उगम (Origin) स्थानाच्या ठिकाणी व मुक्कामाच्या (destination) ठिकाणी निश्चित अशा स्वरूपाचे नसतात, अंतिमत: अशा अनिश्चित गोष्टी स्थलांतराच्या नियोजनामध्ये मदत करू शकत नाहीत.

क) ली यांचे स्थलांतराचे सिद्धांत विकसनशील देशासाठी उपयोगित नाही, कारण विकसनशील देशामध्ये आर्थिक परिस्थिती, स्थलांतराच्या पद्धती आणि स्थलांतर करणाऱ्यांची वैशिष्ट्ये ही पूर्णत: वेगळी आहेत, पाश्चात्य देशामध्ये स्थलांतराची जी वास्तव परिस्थिती आहे त्याचे वर्णन करण्यामध्ये ली यशस्वी झाल्याचे दिसतात.

## २.३.२ शास्त्रीय आणि नव–शास्त्रीय पद्धती : लेविस आणि तोदरे

## (Classical Ane Neo-Classical Models : Lewis and Todaro)

**तोदरो (Todaro):**

१९६० च्या दशकामध्ये बऱ्याच विकसनशील देशामध्ये वाढत जाणारी नागरी बेरोजगारी व त्याच काळामध्ये ग्रामीण भागातील लोकांचे शहरी भागामध्ये स्थलांतर करण्याचे प्रमाण जास्त होते. अशा पद्धतीने

वाढलेल्या स्थलांतरामुळे कामगारांना ने आण करण्यासाठी दळणवळणाची पारंपारिक साधने आणि आर्थिक विकास असे अनेक प्रश्न वाढू लागले. स्थलांतराच्या सिद्धांतामधील दरी भरून काढण्यासाठी तोदरो व इतर विचारवंतानी व सिद्धांतकारांनी ग्रामीण नागरी स्थलांतराचा सिद्धांत विकसीत केला की, ज्यामध्ये ग्रामीण शहरी स्थलांतर व शहरामध्ये वाढत जाणारी बेरोजगारी यामध्ये स्पष्ट विरोधात्मक (Apparently Paradoxical) संबंध असल्याचे मत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**तोदरोच्या सिद्धांताची महत्त्वाची वैशिष्ट्ये :**

**(Essential Features of the Model)**

अ) स्थलांतर करणारे लोक आर्थिक फायद्याच्या उद्देशाने प्रेरित झालेले असतात आणि आर्थिक फायद्यासोबतच ते मानसिक दृष्ट्या स्थलांतर करण्यासाठी सक्षम झालेले असतात.

ब) स्थलांतर करण्याचा निर्णय हा अपेक्षेवर अवलंबून असतो किंवा कांही प्रमाणात ग्रामीण-नागरी भागात किती मजुरी उपलब्ध आहे यावर स्थलांतराची प्रक्रिया विसंबून असते. याबरोबरच अपेक्षित मजुरीमधील भेद दोन गोष्टींच्या आंतरक्रियानुसार ठरवले जाते, एक म्हणजे प्रत्यक्ष ग्रामीण-नागरी मजूरी व दुसरे म्हणजे आधुनिक नागरी क्षेत्रामध्ये योग्य प्रकारचा रोजगार मिळवणे .

क) शहरी किंवा नागारी भागामध्ये रोजगार मिळवण्याची संभाव्यता किंवा शक्यतो उलटपक्षी शहरी बेरोजगारातील दराशी संबंधीत असते.

ड) स्थलांतर फक्त शहरी भागात मिळणाऱ्या नोकरीच्या संधीमुळे वाढत नसून संमजस व सकारात्मक शहरी-ग्रामीण अपेक्षित उत्पन्नातील भेदावर अवलंबून असते म्हणून शहरी भागातील अधिक प्रमाणातील बेरोजगारीचे चित्र अविकसित देशामध्ये आर्थिक संधी निर्माण करण्यामध्ये असमतोलपणा साधत असल्याचे दिसतात.

**तोदरोच्या सिद्धांताचे गणितीय सुत्रीकरण**

**(Mathematical Formulation of Model)**

तोदरो असे मानतो की, ग्रामीण-नागरी स्थलांतराचा दर $\left(M \frac{M}{L_R}\right)$म्हणजे,

अशी शक्यता किंवा संभाव्यता आहे की, नागरी भागातील कामगार यशस्वीरित्या आधुनिक क्षेत्रामध्ये नोकरी मिळवतात, ज्याला सकारात्मक, वास्तव नागरी रोजगारीचा दर मानले जाते.

$\frac{E_u}{L_u}$ Or $\frac{L_u - E_u}{L_u}$

नागरी बेरोजगारीच्या दराचे नकारात्मक कार्य.

$\frac{Y_u}{Y_R}$ (1 पेक्षा मोठा W)

याच्यापलिकडे, स्थलांतर हे खालील घटकांशी संबंधीत असते.

इतर घटक (Z), जसे की अंतर, व्यक्तिगत संपर्क, नागरी सुविधा इत्यादी.

जिथे m = ग्रामीण ते नागरी भागातील स्थलांतराचा दर.

M = ग्रामीण नागरी स्थलांतराची तीव्रता.

$L_R$ = ग्रामीण मजुर स्थलांतराचा जोर (Force).

$E_U$ = नागरी रोजगाराची पातळी.

$L_U$ = नागरी मजुर स्थलांतराचा जोर (Force).

$Y_U$ = नागरी वास्तव उत्पन्न / कमाई.

$Y_R$ = ग्रामीण वास्तव उत्पन्न / कमाई.

W = ग्रामीण व नागरी उत्पन्नामधील प्रमाण (Ratio).

Z = व्यक्तिगत घटक.

म्हणून तोदरो यांचा स्थलांतराचा सिद्धांत असे दर्शवितो की, (ग्रामीण नागरी स्थलांतर) m = Function of (नागरी रोजगारीचा वास्तव दर, ग्रामीण-नादरी वास्तव उत्पन्नातील भेद (differential) आणि व्यक्तिगत घटक) यांचे कार्य.

अशा प्रकारे (ग्रामीण नागरी स्थलांतराचा दर)

$$m = f\left(\frac{E_u}{Y_u}, w, z\right)$$

$$= f\left(\frac{E_u}{Y_u}\right) \text{ (Holding W and Z constant)}$$

= शहरी रोजगार व कामगारांच्या स्थलांतराचा जोर ही दराच्या कार्यातील पातळी आहे.

(Function of ratio between level of Urban employment and Urban labour force)

जिथे, $f\left(\frac{E_u}{Y_u}\right)$ हा शुन्यापेक्षा मोठा आहे.

*f* (W) हा शुन्यापेक्षा मोठा आहे, आणि

*f* (Z) ची किंमत अधिक किंवा वजा असू शकते.

(अनुक्रमे तीन्ही घटकांचा *f* हे परिस्थिती साधक आहे.)

(Were f's are time derivatives of respective three elements.)

स्थलांतराचा दर हा, नागरी रोजगाराची पातळी आणि नागरी मजुरांच्या स्थलांतराचा जोर यांच्या कार्याचा दर आहे किंवा आधुनिक शहरी भागामध्ये नोकरी मिळवण्याची संभाव्यता.

**तोदरोच्या सिद्धांताचे मुल्यमापन (Evaluation of Todaros' Model)**

तोदरोच्या सिद्धांतामध्ये नागरी भागात पूर्ण स्वरूपामध्ये उपलब्ध होणारा रोजगार गृहित धरलेला नाही, तसेच विकसनशील देशामध्ये मोठ्या प्रमाणात बेरोजगारीचे चित्र आहे. तरी देखील ग्रामीण भागातील लोक शहरी भागामध्ये स्थलांतर का करतात?

तरी देखील हे सांगणे फार कठीण आहे की, स्थलांतर करणारे सर्व ग्रामीण नागरी भागातील लोक हे समंजस किंवा तर्कसंगत निर्णयाचा परिणाम आहे आणि हे सर्व संभवनीय सिद्धांताच्या उपयोगिततेवर आधारित आहे. बऱ्याचदा अज्ञान वृत्तीमुळे शहरामध्ये स्थलांतराचे प्रमाण वाढून बेरोजगारीचे प्रमाण वाढते. मोठ्या प्रमाणातील स्थलांतराची उलाढाल किंवा घडामोडी 'पुश बॅक फॅक्टर' (Push back factor) च्या कारणाने घडत असतात. तिसऱ्या जगातील शहरे ही अशा प्रकारच्या घटनांचे जाहीर प्रकटीकरण करतात. १९६१-७१ मध्ये भारतातील स्थलांतराच्या संदर्भात पाहिल्यास या काळात ग्रामीण शहरी स्थलांतराचे प्रमाण खूप कमी दिसते कारण या काळात दवळवळणाच्या मार्गामधील वाढ.

ग्रामीण भागातील लोक शहरामध्ये स्थलांतर केल्यानंतर तेथील निराशाजनक आर्थिक अपेक्षा त्यांना पुन्हा स्थलांतरीत होण्यासाठी उदासिन करत असे. अशा प्रकारे स्थलांतरामधील मंद गती तोदरोच्या अनुमानाचे संभाव्य आधार मानले गेले आहेत. दवळवळणाच्या साधना अभावी स्थलांतरामधील जास्त दर आणि स्थलांतरामधील जास्त उलाढाल असे दर्शविते की, शहरामध्ये सतत स्थलांतर करणे म्हणजे तिथे सतत बेरोजगारीच्या परिणामाला सामोरे जावे लागत नाही.

अशा पद्धतीने तोदरोचा स्थलांतराचा सिद्धांत फक्त आर्थिक घटकावरच आधारित आहे. आर्थिक घटकाव्यतिरिक्त इतर कोणत्याही घटकांचा समावेश यामध्ये केलेला नाही. एक गोष्ट खरी आहे की, स्थलांतर करण्यामध्ये आर्थिक घटक हा महत्त्वाचा भाग आहे, आर्थिक घटकाव्यतिरिक्त इतर गोष्टी सुद्धा ग्रामीण-नागरी स्थलांतरामध्ये आपली महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**आर्थर लेविस (Arthur Lewis)**

प्रसिद्ध अर्थशास्त्रचे प्राध्यापक आर्थर लेविस यांनी १९५४ मध्ये कामगारांच्या स्थलांतराचे (Labour transfer) द्विघटकीय सिद्धांत मांडला. ग्रामीण भागातून शहरी औद्योगिक भागात कामगारांचे स्थलांतर कसे घडून येते हे मांडण्याचा प्रयत्न केला.

लेविस यांचा सिद्धांत म्हणजे कामगारांचे ग्रामीण भागातील पारंपारिक कमी उत्पादकतेकडून शहरी औद्योगिक भागातील जास्त उत्पादकतेकडे होणारे स्थलांतर होय. अशा प्रकारचे स्थलांतर करण्यामागचा उद्देश म्हणजे आर्थिक उत्पन्नाच्या कृतीला गती देणे आणि गुंतवणूक वाढवणे होय. अशा प्रकारे हा सिद्धांत अशी कल्पना करतो की, अविकसित आर्थिक क्षेत्रामध्ये दोन घटकांचा समावेश होतो. एक म्हणजे पारंपरिक

शेती हेच उपजिविकेचे साधन यामध्ये कमी उत्पादन व अधिक मजूर आणि दुसरे म्हणजे उच्च उत्पादन असणारे आधुनिक शहरी औद्योगिक घटक होय.

लेविस यांचा सिद्धांत नर्किसियन यांच्या प्रबंधातील गोष्टीला असे मानतो की, अविकसित आर्थिक क्षेत्रामधील कृषी घटक म्हणजे उत्पादनापेक्षा लेविस असे म्हणतात की, बऱ्याच आर्थिक घटकामध्ये कमी पगारावर व मजुरीवर कामगारांचा अमार्यादीत पुरवठा होत असतो व कमी मजूरीवर कामगारांचे उपजीविकेचे साधन उपलब्ध होत असते. आर्थिक विकास पुढे नेण्यासाठी कामगार ज्या मुख्य साधनामार्फत उपलब्ध झालेले असतात ते म्हणजे शेती हेच उपजिविकेचे साधन, कंत्राटी कामगार, किरकोळ व्यापार, घरगुती सुविधा, घरातील पत्नी व मुली आणि वाढती लोकसंख्या. बऱ्याच देशामध्ये असे आढळते की, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या तुलनेत लोकसंख्या जर जास्त प्रमणात असेल तर मजुरांची तुटपुंजी किंवा अपुरी उत्पादकता ही शुन्य किंवा नकारात्मक असते. अधिक मोठ्या प्रमाणात कामगार उपलब्ध असतील तर त्यांना दिली जाणारी मजूरी ही कमीच असते.

या सिद्धांतानुसार आधुनिक शहरी औद्योगिक क्षेत्र हे गतिशील अर्थव्यवस्थेचे आहे. आधुनिक शहरी औद्योगिक क्षेत्राची गुंतवणूक व गुंतवणूक करून अधिक फायदा मिळवणे हे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे आणि त्या सोबतच रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे होय. रोजगारीचे प्रमाण वाढवणे व वेतन वाढवणे म्हणजे ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतराचे प्रमाण वाढवणे होय. शहरी भागामध्ये किती प्रमाणात गुंतवणूक केली जाते यावरून शहराची रोजगारी वाढत जाऊन पुन्हा ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतराचे प्रमाण वाढत असते. गुंतवणूक करणे म्हणजे नफा मिळवण्याची प्रक्रिया होय. यामध्ये महत्त्वाचे असे आहे की, भांडवलदार हे नेहमी त्यांना होणारा नफा पुन्हा व्यवसायामध्ये गुंतवत असतात. लेविस पुढे असे म्हणतो की, भांडवलाची निर्मिती व तंत्रज्ञानामधील प्रगती म्हणजे फक्त वेतनामधील वाढ नसून राष्ट्रीय उत्पन्नातील नफ्याचा हिस्सा वाढवणे होय. राष्ट्रीय उत्पन्नातील तुलनेत पाहता अविकसित देशामध्ये गुंतवणूक ही कमी दिसते याचे कारण म्हणजे लेविस यांच्या मते, या देशातील लोक गरिब आहेत असे नसून राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत भांडवलदारांचा नफा हा फार कमी आहे. भांडवलदारांचे क्षेत्र वाढल्यामुळे तुलनात्मकरित्या नफा वाढतो व वाढलेल्या नफ्याची पुन्हा गुंतवणूक करणे शक्य होते. या ठिकाणी लेविस असे नमूद करतो की, भांडवलाची निर्मिती ही फक्त नफ्यासाठी केली नसून प्रतिष्ठा निर्माण करण्यासाठी केलेली आहे.

ग्रामीण भागातून शहरी भागात कामगारांचे स्थलांतर करण्यासाठी व त्यांची स्थलांतरासाठी मानसिकता वळवण्यासाठी ग्रामीण भागातील मजुरीचा दर योग्य प्रमाणात असायला हवा, सर्वसाधारणपणे शहराच्या तुलनेत ग्रामीण भागातील मजूरीचा दर कमी असतो म्हणून ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात शहराकडे पैशाच्या दृष्टिकोणातून धाव घेतात आणि याला अनुसरून ग्रामीण भागातील मजूरीचा दर जर समप्रमाणात ठेवणे शक्य झाले तर ग्रामीण भागातील लोक शहरामध्ये जास्त स्थलांतर करणार नाहीत. शहरी व ग्रामीण भागातील मजुरीच्या दरातील तुलना केल्यास असे दिसते की ग्रामीण भागापेक्षा औद्योगिक शहरी भागामध्ये तीस टक्के व त्यापेक्षा अधिक मजुरी असल्याचे दिसते. पण हा मजुरीचा भाग म्हणजे फसवा असल्याचा वाटतो. कारण शहरामध्ये तुलनात्मक दृष्ट्या महागाईचा दर हा जास्त असतो. पण प्रत्यक्षात मात्र हा दर

महागाईच्या तुलनेत शहरी औद्योगिक क्षेत्रात राहाणाऱ्यांना मिळत नाही असे चित्र दिसते. शहरी औद्योगिक क्षेत्रामध्ये वास्तव्य करत असणारे कामगार जेणेकरून स्वत:ला कामगार संघटनेमध्ये सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करतात आणि स्वत:ला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करत असतात. पण कांही क्षेत्रातल्या कामगार क्षेत्रामध्ये असेही दिसून येते की जिथे अजून कामगार संघटना दिसत नाहीत. कामगार संघटनांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून कामगारांना त्यांच्या सुविधा मिळवून घेणे शक्य होते, पण त्यासाठी संघटित स्वरूपात संघर्ष करावा लागतो. पण जिथे संघटन नाही अशा असंघटित क्षेत्रामध्ये मजुरांचे फार हाल होतात व त्यांची भांडवलदाराकडून पिळवणूक होत असते व तुलनात्मक रित्या त्यांना संघटित क्षेत्रातील कामगाराप्रमाणे मजुरी योग्य प्रमाणात मिळत नाही.

लेविस यांचा विकासाचा सिद्धांत असे मानतो की, औद्योगिक क्षेत्रातील मजुरीचा दर हा पारंपरिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या कृषी क्षेत्रामध्ये सुद्धा सारखाच असायला हवा.

ग्रामीण भागातून शहरी भागात कामगारांच्या पुरवठ्यामध्ये सतत लवचिकता असते. आधुनिक क्षेत्राच्या प्रक्रियेची आणि रोजगाराची वाढ ही ग्रामीण भागातील कामगारांचे प्रमाण अधिक होण्यापर्यंत वाढत असते. अधिक व मोठ्या प्रमाणात कामगारांचे स्थलांतर होण्यापर्यंत सर्वांना सामावून घेण्याची क्षमता शहरी क्षेत्रामध्ये असते.

### लेविसच्या सिद्धांताचे मुल्यमापन (Evaluation of Lewis Model)

मायकेल तोदरो असे म्हणतो की, लेविस यांचा स्थलांतरातील विकासाचा सिद्धांत हा फार साधा व सरळ आहे. सिद्धांत पाश्चात देशातील ऐतिहासिक अनुभवाच्या आर्थिक वाढीच्या गोष्टीवर विसंबुन आहे. यामध्ये तीन महत्त्वाच्या गोष्टी आहेत की, ज्या तिसऱ्या जगातील अविकसीतेशी संबंधीत आहेत.

१) हा सिद्धांत पूर्णपणे असे मानतो की, कामगारांच्या स्थलांतराचा दर आणि रोजगार निर्मिती ही भांडवलाच्या सध्याच्या दराच्या प्रमाणात असते. अतिशय वेगाने भांडवलाचा साठा म्हणजे मोठ्या प्रमाणात आधुनिक क्षेत्राची निर्मिती व रोजगार निर्मिती होय. साहजिकच या गोष्टी शक्य होतील जर सारख्याच तंत्रज्ञानाने आर्थिक वृद्धी झाली तर. आर्थिक विकास पुढे नेण्यासाठी नविन तंत्रज्ञानरहीत कामगार असणे गरजेचे आहे. पण अधिक तंत्रज्ञानाचा वापर करून काम करणारे कामगार असतील तर इतर कामगारांच्यावर बेकारीची वेळ कोसळते. बऱ्याच आर्थिक क्षेत्रामध्ये कामगारांच्या समावेशाचा दर हा घटत चालला आहे. औद्योगिक नोकरशाहीतील रोजगार वाढीचा दर हा औद्योगिक क्षेत्रातील परताव्याच्या निम्मा असतो. भारतामध्ये १९६१ आणि १९७६ च्या कालावधीमध्ये आधुनिक औद्योगिक क्षेत्रामध्ये गुंतवणूक ही १३९ टक्क्याने वाढली होती आणि परतावा १६१ टक्के होता पण याच कालावधीमध्ये रोजगारीचे प्रमाण फक्त ७१ टक्क्यांनी वाढले होते. म्हणून रोजगारामध्ये एकूण परताव्याच्या (Gross output) ३४ टक्क्यांनी कमी झाला आणि एकूण भांडवलाच्या २८ टक्के रोजगारी कमी झाली होती. अशाच चढ उताराची अवस्था प्रत्येक विकसनशील देशामध्ये दिसत होती.

२) सर्वसाधारणपणे या सिद्धांतात असे मानले गेले आहे की, ग्रामीण भागामध्ये अधिक प्रमाणात मजूर असतात व शहरी भागात जास्त प्रमाणात रोजगार उपलब्ध असतो, असे मांडणे चूकीचे आहे. कृषी क्षेत्रामध्ये अधिक प्रमाणात मजूर उपलब्ध असतात या विधानाशी कांही अर्थतज्ज्ञ सहमत नाहीत. विकसनशील देशातील अर्थव्यवस्थेमध्ये शेती क्षेत्रात जास्त प्रमाणात मजूर असणे म्हणजे वादाचे ठरेल. बऱ्याचशा अविकसीत अर्थव्यवस्थेमधील देशामध्ये शहरी भागातील मजूरी मोठ्या प्रमाणात असते असे मानने म्हणजे चुकीचे आहे. अर्थात, बऱ्याच विकसनशील देशामध्ये ग्रामीण भागातील बेरोजगारीपेक्षा शहरी भागातील बेरोजगारी फार गंभीर आहे. उदा. भारतामध्ये नियोजन मंडळाने सादर केलेल्या अहवालानुसार १९७८ मध्ये भारतातील शहरीभागात असणारी बेरोजगारी एकूण कामगारांच्या ५ टक्के होती, तर हेच प्रमाण ग्रामीण भागामध्ये एका टक्यापेक्षाही कमी होते.

अशा प्रकारे बऱ्याचशा चुकीच्या गोष्टीवर लेविस यांचा सिद्धांत आधारित आहे.

## २.४ सरावासाठी प्रश्न

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. इ. जी. रवेन्स्तेन यांचा स्थलांतराचा सिद्धांत स्पष्ट करा?

२. एवेरेटट्र ली यांचा स्थलांतराचा सिद्धांत स्पष्ट करा?

३. प्रवाह आणि उपप्रवाहाशी संबंधीत सिद्धांत स्पष्ट करा?

४. लेविस आर्थर यांचा स्थलांतराचा सिद्धांत स्पष्ट करा?

**ब) रिकाम्या भरा.**

१. टप्यानुसार स्थलांतराचा प्रकार कोणी मांडला?

अ) इ.जी. रवेन्स्तेन ब) एवेरेट्ट ली क) लेविस ड) तोदरो

२. स्थलांतर करण्यामध्ये कोणता घटक जास्त प्रभावी असतो.

अ) शैक्षणिक ब) राजकीय क) आर्थिक ड) सामाजिक

३. स्थलांतर करणारे लोक आर्थिक हेतुने प्रेरित झालेले असतात, असे मत कोणी मांडले आहे?

अ) एवेरेटट् ली ब) इ.जी. रवेन्स्तेन क) लेविस ड) तोदरो

४. कामगारांच्या स्थलांतराचा सिद्धांत कोणी मांडला?

अ) इ.जी. रवेन्स्तेन ब) तोदरो क) एवेरेटट् ली ड) लेविस

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. इ. जी. रवेन्स्तेन यांचा प्रसिद्ध लेख कोणता?

२. कमी अंतराच्या स्थलांतरामध्ये महिलांचे प्रमाण जास्त असते असे कोणाचे मत आहे?

३. स्थलांतराची तीव्रता कशामुळे बदलते?

४. कामगारांच्या स्थलांतराचा सिद्धांत लेविस यांनी कधी मांडला?

**ड) टिपा लिहा.**

१. टप्यानुसार स्थलांतर.

२. प्रवाह आणि उपप्रवाह.

**२.५ स्वंय अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**ब) बहुपर्यायी प्रश्न (Multiple Choice Question)**

१) अ २) क ३) ड ४) ड

**क) एका वाक्यात उत्तरे.**

१. स्थलांतराचा सिद्धांत (Laws of Migration)

२. इ. जी. रवेन्स्तेन

३. आर्थिक चढ उतारामुळे

४. १९५४ मध्ये.

## २.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


1. Lee, Everett (1968). A Theory of Migration, in Heer D. M. (eds) Readings on Population.
2. Ravenstein, E. G. (1969). The Law of Migration, Journal of Royal Statsical Society. pp 11-59.


❑❑❑

## सत्र–३ : घटक ३

# स्थलांतराचा अंदाज लावण्याच्या प्रत्यक्ष पद्धती

**घटक संरचना:**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ जन्मस्थान (Place of Birth)

३.२.२ राहण्याचा कालावधी (Duration of Residence)

३.२.३ शेवटच्या निवासाचे ठिकाण आणि (Place of last Residence; and)

३.२.४ निश्चित आधीच्या तारखेला राहण्याचे ठिकाण (Place of Residence at a fixed Prior date)

३.४ सारांश

३.५ स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न

३.६ सरावासाठीचे प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये :

सदर घटकाचे अध्ययन केल्यास आपणास –

१. स्थलांतराचा अंदाज लावण्याच्या प्रत्यक्ष पद्धतीतील जन्मस्थानाचे महत्व समजून घेता येईल.

२. स्थलांतराचा अंदाज लावण्याच्या प्रत्यक्ष पद्धतीतील राहण्याचा कालावधी समजून घेता येईल.

३. स्थलांतराचा अंदाज लावण्याच्या प्रत्यक्ष पद्धतीतील शेवटच्या निवासाचे ठिकाण समजून घेता येईल.

४. स्थलांतराचा अंदाज लावण्याच्या प्रत्यक्ष पद्धतीतील निश्चित आधीच्या तारखेला राहण्याचे ठिकाण समजून घेता येईल.

## ३.२ विषय विवेचन

या पूर्वीच्या प्रकरणामध्ये स्थलांतराचे विविध प्रकार मूलभूत संकल्पना स्थलांतर माहितीचे भिन्न स्रोत आणि अंतर्गत स्थलांतराचे निर्धारक आणि परिणाम याचे विवेचन केलेले आहे. अंतर्गत स्थलांतराचा अंदाज लावण्याच्या विविध पद्धतींबद्दल. या युनिटमधून गेल्यानंतर आपण ऑन स्टॅटिक्सवरून स्थलांतराच्या अंदाजाविषयी जाणून घेणे अपेक्षित आहे.

स्थलांतर हा तिसरा लोकसंख्याशास्त्रीय घटक आहे, जो मानवाच्या क्षणाचे वर्णन करतो भिन्नता आणि गतिशीलतेची कारणे अभ्यासतो त्याच बरोबर या मधील सर्व वयोगटातील आणि लोकसंख्येवर प्रभाव टाकत असल्याने सर्व काळ प्रजनन आणि मृत्युदरापेक्षा भिन्न असतो. एक व्यक्ती म्हणून, स्थलांतर वर्तमान प्रभावित करते वय आणि लिंग रचना, रोजगार, प्रजनन क्षमता आणि कुटुंब आकार या सर्व बाबींचा समावेश स्थलांतर प्रकारामध्ये होतो. सदर घटकामध्ये आपण जन्मस्थान Place of Birth, राहण्याचा कालावधी: : (Duration of Residence), शेवटच्या निवासाचे ठिकाण आणि (Place of last Residence; and), निश्चित आधीच्या तारखेला राहण्याचे ठिकाण या सर्व बाबीची चर्चा येथे आपण केली आहे.

## ३.१ प्रस्तावना

अनेक विकसनशील देशात नव्हे तर विकसित देशात जनगणना स्थलांतराच्या अभ्यासासाठी सामग्री मिळवण्याचे एकमेव साधन आहे. जनगणनेमध्ये स्थलांतरा विषयी प्रत्यक्ष प्रश्न विचारून माहिती प्राप्त केलेली असते. नाहीतर दुसऱ्या उद्देशासाठी जी इतर माहिती गोळा केलेली असते, त्यावरून काही विशिष्ट पद्धतीने अप्रत्यक्षपणे स्थलांतराचा अंदाज करता येतो. या पद्धती कोणत्या याचे विवेचन पुढे करणारच आहोत. मुख्यत: दोन लागोपाठच्या जनगणना मधील लोकसंख्येचे वय लिंगवार विभाजन उपलब्ध असते त्यावर या पद्धती आधारलेल्या आसतात. स्थलांतर विषयी विचारलेले प्रत्यक्ष प्रश्न हे पुढील गोष्टी संबंधित असतात, जन्मस्थान, सध्याचे जे वास्तव्याचे ठिकाण आहे तिथे येण्यापूर्वीचे शेवटचे वास्तव्याचे ठिकाण. सध्याच्या ठिकाणी किती वर्षे वास्तव्य आहे. जनगणनेच्या आधी विशिष्ट काळापूर्वी उदा. १ वा ५ वर्षा पूर्वी त्या व्यक्तीचे वास्तव्य कोणत्या ठिकाणी होते. या प्रश्नांची उत्तरे मिळतात त्यानुसार एकूण लोकसंख्येचे दोन भाग पाडता येतात. स्थलांतरी (Migrants) व रहिवासी (Residents). हे भाग पाडण्यासाठी काय निकष वापरावा हे मात्र जनगणनेत काय प्रश्न विचारला आहे यावर अवलंबून राहील. उदा. स्थलांतरित व्यक्ती म्हणजे पुढील प्रमाणे.

१) ज्याचे जनगणनेच्या वेळी सांगितलेले राहण्याचे नेहमीचे ठिकाण व जन्मस्थान भिन्न आहे त्या व्यक्ती किंवा

२) ज्याचे वास्तव्याचे शेवटचे ठिकाण ज्याची गणना झाली आहे त्या ठिकाणी पेक्षा भिन्न आहे अशा व्यक्ती किंवा

३) ज्याच्या बाबतीत सध्याच्या ठिकाणी वास्तव्य काळ (Duration of Residence) किती या प्रश्नाचे उत्तर म्हणून सांगितलेला काळ त्याच्या वयापेक्षा कमी आहे अशा व्यक्ती. याशिवाय जनगणनेत स्थलांतराविषयी प्रत्यक्ष प्रश्न विचारलेला नसला तरीही अप्रत्यक्षपणे स्थलांतराचा अंदाज करण्यासाठी साधन म्हणूनही जनगणनेचा उपयोग होतो. देशातील सर्व घटक प्रदेशांची दोन लागोपाठच्या जनगणनेनुसार लोकसंख्या व जन्म-मृत्यू नोंदणीनुसार त्या प्रदेशातील जन्म मृत्यूची आकडेवारी उपलब्ध असेल तर त्यावरून अंदाज करता येतो. कारण लोकसंख्येत झालेल्या एकूण बदलांमधून नैसर्गिक वाढ वजा केले असता जी संख्या होते तो निव्वळ स्थलांतराचा अंदाज असतो. त्याचप्रमाणे दोन लागोपाठच्या जनगणना नुसार प्रत्येक प्रदेशातील लोकसंख्येची वय, लिंगवार विभाजन असेल तर त्यावरूनही अंदाज करता येतो.

**१) नमुना सर्वेक्षण:**

विशिष्ट कालावधीनंतर वारंवार घेतले जाणारे नमुना सर्वेक्षण पद्धती ही देखील पुष्कळ देशातून स्थलांतराच्या अत्यंत महत्त्वाचे सामग्रीचे साधन आहे. जनगणना फक्त दर दहा वर्षांनी एकदा होते. पण नमुना संरक्षणाच्या साह्याने जनगणनेमध्ये विचारलेली माहिती पुन्हा विचारून दोन जनगणनाच्या मधल्या काळात ही माहिती गोळा करता येते. शिवाय जनगणने मधील माहिती पूरक असे अधिक प्रश्नही विचारता येतात. कारण नमुना सर्वेक्षणाचे क्षेत्र जगण्यापेक्षा मर्यादित असते व अशा पाहण्या नियमित कालावधीत सातत्याने करीत राहिल्यास. आकडेवारीची एक कालश्रेणी (Time Series) मिळते व त्यातील कल पाहून व सुसंगती तपासून तिची विश्वसनीयता ही आजमावता येते. तसेच स्थलांतर विषयक बदल आणि इतर राजकीय, आर्थिक सामाजिक परिस्थितीतील बदल याचा परस्पर संबंध आहे का हेही तपासता येते. प्रथम लोकसंख्या सर्वेक्षण आताच काही प्रश्न विचारून लोकसंख्येतील स्थलांतरातील व्यक्ती निश्चित करणे आणि नंतर तेवढ्याच व्यक्तींना पुन्हा भेट देऊन किंवा प्रश्नावली पोस्टाने पाठवून स्थलांतरास संबंधी विस्तृत व सखोल माहिती गोळा करणे असाही एक मार्ग उपयोगात आणता येतो. उदाहरणार्थ, अमेरिकेतील ब्यूरो ऑफ लेबर statistics या संस्थेने १९६३ च्या मार्चमध्ये त्यांच्या लोकसंख्या सर्वेक्षणाच प्रश्न विचारून १८ ते ६४ या वयोमर्यादेतील स्थलांतरित पुरुष निश्चित करून घेतले व त्यांना एक पुरवणी प्रश्नावली दिली. त्यात त्यांचा स्थलांतर पूर्व स्थलांतर, उत्तर व्यवसाय, दर्जा प्राप्ति इत्यादी सर्व तपशील विचारला होता. जनगणना किंवा सातत्याने ठेवली जाणारी लोकसंख्या नोंदणी पुस्तके यांच्या आधाराने नमुना चौकट. (Sampling frame) ठरवून घेऊन त्या मर्यादित भागासाठी तपशिलवार स्थलांतर-घेणे हा ही एक महत्त्वाचा मार्ग आहे. अशा पाहण्या रिपब्लिक ऑफ कोरिया (१९६६) व स्वीडन (१९६४) मध्ये केल्या आहेत. परंतु जनगणना व नमुना पाहण्या या दोन्ही साधनांमधील मुख्य दोष म्हणजे स्थलांतर मापनाचा मार्ग हा पाश्चातदर्शी (Retrospective) असतो त्यामुळे त्यापूर्वी मृत्यू पावलेल्या व्यक्तीचा त्यात समावेश होत नाही. त्यामुळे स्थलांतर आतील सातत्य कल्पनेच्या दृष्टीने लोकसंख्या नोंदनी पुस्तके हे महत्त्वाचे साधन आहे.

**२) सातत्याने ठेवले जाणारे लोकसंख्या अनुदान पुस्तक:**

हे साधन ज्या देशांमध्ये अस्तित्वात आहे तिथे अशी व्यवस्था असते की, त्या व्यक्तीसंबंधी नोंदणी पुस्तकात नमूद केलेला सर्व तपशील स्थलांतरानंतर ती व्यक्ती जेथे गेली असेल त्या ठिकाणच्या स्थानिक-नोंदणी कार्यालयाकडे पाठवावा लागतो त्यानंतरचा त्या व्यक्ती संबंधीचा आवश्यक तपशील नवीन कार्यालयातील नोंदणी -जमा होतो. अशा नोंदणी पुस्तकावरून सहाजीकच प्रत्येक व्यक्तीचा स्थानांतर पूर्व व स्थलांतरोत्तर तपशील व्यवसाय, वय, प्राप्ती, पूर्वीच्या स्थलांतर घटना इत्यादी सर्व मिळू शकते. इतकेच नव्हे तर मृत व्यक्तीच्या बाबतीत ही सर्व तपशील मिळू शकतो. या नोंदणी पुस्तकावरून तयार केलेली स्थलांतर विषयक आकडेवारी स्कॅंडीनेव्हीयन देशातून व काही पश्चिम युरोपीय देशातून अनेक वर्षे प्रसिद्ध केली जात आहे व काही पूर्व युरोपीय देशातून ही अलीकडे अशी आकडेवारी प्रसिद्ध केली जाते. इतकेच नव्हे तर काही अगदी मोजक्या पूर्व आशियाई देशातूनही अशी नोंदणी पुस्तके ठेवण्यास सुरुवात झाली आहे. खालील देश अशा नोंदणी पुस्तकाच्या आधारे स्थलांतराला विषयक आकडेवारी प्रसिद्ध करतात. डेन्मार्क, फिनलंड, आइसलॅंड, नार्वे, स्वीडन, बेल्जियम, नेदरलांड, पश्चिम जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, पोलांड, रशिया, इटली, स्पेन, इस्रायल, जपान, सिंगापूर, तैवान या देशांमध्ये लोकसंख्या दोन्ही पुस्तके ठेवण्याच्या पद्धतीस १९ व्या शतकात प्रारंभ करण्यात आला. पण संपूर्ण राष्ट्राची स्थलांतर विषयक आकडेवारी मात्र १९ व्या शतकाच्या अखेरीस उपलब्ध होऊ लागली. जपानमध्ये १९५४ सालापासून स्थलांतराची मासिक आकडेवारी ७ शहरासाठी आणि सर्व प्रीफेक्चर्स साठी प्रसिद्ध केली जाते.

**इतर साधने:**

इतर उद्दिष्टासाठी गोळा केलेल्या माहितीचा उपयोग करून पाश्चात्य देशातील संशोधकाने स्थलांतराचा अभ्यास केल्याची अनेक उदाहरणे दाखवता येतील. उदाहरणार्थ, अमेरिकेत सामाजिक सुरक्षा शासन (Social Security Administration) या योजनेखाली येणाऱ्या श्रमिक पैकी एक टक्का श्रमिकांच्या बाबतीत त्यांनी आतापर्यंत कुठे कुठे काम केले आहे. यांचा संपूर्ण इतिहास नोंदवला जातो. सहाजिकच त्यांच्या स्थलांतराची ही नोंद त्यात होते. अशाच माहितीचा उपयोग करून श्रमिकांच्या स्थलांतराचा अभ्यास केला जातो. तसेच मतदारांच्या याद्या वरून क्रोझ या संशोधकाने १९५०-५२ या काळातील फ्रान्समधील देशांतर्गत स्थलांतराचा अंदाज काढला आहे. अमेरिकेत काही व्यापारी कंपन्या त्यांच्याच धंद्याच्या दृष्टीने, दरवर्षी मोठ्या शहरात राहणाऱ्या १८ वर्षावरील व्यक्तींच्या याद्या व पत्ते संग्रहित प्रसिद्ध करतात. अशाच याद्या वरून गोल्ड स्टाईन यांनी पेन्सिलव्हानिया मधील एका स्थलांतराचा अभ्यास केला आहे. परंतु अशा विश्वसनीय याद्या व सातत्याने ठेवली जाणारी नोंदणी पुस्तके फक्त प्रगत देशांमध्ये उपलब्ध असल्याने अविकसित देशांमध्ये जनगणना हे प्रमुख साधन राहिलेले आहे. आर्थिक कारणामुळे खर्च कमी व्हावा या दृष्टीने जनगणनेत मोजकेच प्रश्न विचारावे लागतात. व त्यात ही जनता अशिक्षित अडाणी असेल तर अनेक प्रश्न विचारण्यापेक्षा एखादा सोपा प्रश्न विचारणे थोडी पण विश्वसनीय माहिती मिळवणे श्रेयस्कर ठरते. या दृष्टीने जन्मस्थान कोणते हाच प्रश्न पुष्कळ देशातून विचारला जातो. ही माहिती मिळविण्याच्या पद्धतीत सुधारणा व्हावी या दृष्टीने युनायटेड नेशनने १९७० च्या जनगणने पूर्वी पुरस्कृत विषयांची यादी प्रसिद्ध केली

आहे व जन्मस्थान सध्याच्या वास्तव्य स्थाना पूर्वीचे राहण्यास ठिकाण (Place of last Residence) व सध्याच्या ठिकाणाचा वास्तव काल (Duration of Residence) या तिन्ही गोष्टी विषयी माहिती गोळा करावी अशी शिफारस केली च्या सुमारास जनगणना झाल्या, त्यात सुमारे १०० देश आणि जन्मस्थान कोणते यावर माहिती गोळा केली आहे.

**भारतीय स्थलांतर विषयक उपलब्ध माहितीचे स्वरूप:**

भारतीय जनगणना मध्ये उपलब्ध असलेली स्थलांतर विषयक माहितीही मुख्यता जन्मस्थान कोणते या प्रश्नावर आधारलेली असते. सहाजिकच १९६१ पूर्वीची माहिती जीवनावर की स्थलांतराबद्दल पूर्वीच्या जनगणना मधून प्रत्येक व्यक्तीकडून जन्म कोणत्या जिल्ह्यात झाला आणि तेथे त्या व्यक्तीची गणना झाली त्या राज्या बाहेर जन्म झाला असेल तर ते ठिकाण कोणत्या राज्यातील कोणत्या जिल्ह्यात आहे एवढीच माहिती विचारली जात असे. या माहितीच्या आधारे जनगणनेच्या वेळी कोणत्याही जिल्ह्यामध्ये गणती झालेल्या व्यक्तीचे खालील वर्गीकरण उपलब्ध आहे.

१) त्याच जिल्ह्यात जन्मलेले लोक

२) त्याच राज्यातील दुसऱ्या प्रत्येक जिल्ह्यात जन्मलेले लोक (जिल्हावार).

३) भारतातील दुसऱ्या राज्यांमध्ये जन्मलेले लोक (राज्यवार)

४) भारताबाहेरील देशात जन्मलेले लोक (देशवार).

ही माहिती स्त्री–पुरुषांसाठी वेग वेगळी उपलब्ध आहे. परंतु या माहितीवरून एक तर एकाच जिल्ह्यातील एकाच गावाहून दुसऱ्या गावी स्थलांतर करण्याची माहिती मिळत नाही. तसेच स्थलांतरी व्यक्तीचा सामाजिक, आर्थिक व लोकसंख्या शास्त्रीय तपशील मिळत नाही. शिवाय खेड्यातून शहरात स्थलांतर करण्याचीही माहिती मिळत नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी १९६१ च्या जनगणनेत प्रत्येक व्यक्तीला पुढील चार प्रश्न विचारण्यात आले.

१) जन्मस्थान

२) जन्मस्थान ग्रामीण की नागरी विभागात

३) वास्तव्यकाल (जिथे गणना झाली त्या ठिकाणचा)

४) राष्ट्रीयत्व

यावरून मिळालेली माहिती १९६१ च्या जनगणनेत D-I, D-II, D-III, D-IV, D-V, D-VI, या सहा तक्त्यामध्ये प्रसिद्ध केलेली आहे. त्यापैकी D-I, या तक्त्या मध्ये परदेशांत जन्माला आलेल्या लोकांची म्हणजेच आंतरराष्ट्रीय स्थलांतराची आकडेवारी मिळते. D-II या तक्त्यामध्ये गणनास्थान व जन्मस्थान या दोन्हींच्या साहाय्याने केलेला दुहेरी तक्ता आहे. त्यांच्या साहाय्याने भारतात जन्माला आलेल्या लोकांची चार प्रकारांमध्ये विभागणी मिळते. जेथे गणना झाली त्याच गावी जन्मलेले लोक (हि रहिवासी लोकसंख्या

होय). जिल्ह्यातच दुसऱ्या गावी जन्मलेले लोक, त्याच राज्यातील दुसऱ्या जिल्ह्यात जन्मलेले लोक, भारतातील दुसऱ्या राज्यात वा केंद्रशासित प्रदेशात जन्मलेले लोक, यातील प्रत्येक ठिकाणी स्त्री-पुरुषांसाठी व ग्रामीण नागरी विभागासाठी आकडेवारी स्वतंत्र दिली आहे. वास्तव्य काळाबद्दल जो प्रश्न विचारला आहे, त्याचा उपयोग करून D-III हा तक्ता दिला आहे. एका बाजूला जन्मस्थान व दुसऱ्या बाजूला गणनास्थानातील वास्तव्य काल. (१ वर्षाहून कमी, १-५ वर्षे, ६-१० वर्षे, १० वर्षाहून जास्त इत्यादी). असा हा दुहेरी तक्ता आहे. D-IV, व D-V हे तक्ते १ लाखापेक्षा जास्त वस्ती असलेल्या शहरांमधील स्थलांतरी संबंधी आहेत. D-VI मध्ये त्या स्थलांतराचे लिंग, वयोगट, शैक्षणिक पातळी व्यवसायासंबंधी आकडेवारी मिळते. D-V मध्ये अशा शहरांमधील लोकसंख्येचे तीन गटात वर्गीकरण केले आहे. या शहरांमध्येच जन्मलेले लोक, ग्रामीण भागातील आलेले आणि नागरी विभागातून, इतर लहान शहरातून आलेले लोक D-VI या तक्त्यामध्ये श्रमिक लोकसंख्या व इतर लोकसंख्या याचे त्यांच्या जन्मस्थानाप्रमाणे वर्गीकरण केले आहे. याशिवाय १० लाखापेक्षा ज्यांची लोकसंख्या अधिक आहे, अशा शहरासाठी स्थलांतरितची अधिक तपशीलवार आकडेवारी देणारे आणखीन ६ तक्ते आहेत. १९७१ च्या जनगणनेने केलेली सुधारणा म्हणजे १९६१ मधील चार प्रश्न शिवाय आणखी एक महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे, तो म्हणजे सध्याची वास्तव आहे व जेथे गणना झाली आहे त्यांच्या आधी कोठे राहत होता? या प्रश्नामुळे मोठी सुधारणा म्हणजे १९७१ च्या आकडेवारीवरून जीवनावरती स्थलांतरित प्रमाणेच विशिष्ट कालावधी स्थलांतरीची माहिती मिळू शकते. जनगणनेची प्रश्नावली करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अशा सूचनाही दिल्या होत्या की, आधीचे वास्तवता स्थान स्थान याचा अर्थ तात्पुरते काही काळासाठी एखाद्या ठिकाणी जाऊन येणे असा असून ते त्या व्यक्तीचे त्या काळातील नेहमीचे राहण्याचे ठिकाण होते, याची खात्री करून घ्यावी. तसेच हे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात, राज्यात, देशात आहे की ग्रामीण भागात आहे, की नागरी भागात आहे हा तपशील ही त्याचबरोबर गोळा केल्याच्या जनगणनेच्या सारणी योजनेवरून (Tabulation Plan) असे दिसून येते की, १९६१ प्रमाणेच आताही D-I....D-VI अशा तक्त्यामध्ये ही आकडेवारी उपलब्ध होणार असून, याआधीचे वास्तव स्थान या नव्या प्रश्नांचा पूर्ण उपयोग करून हे तक्ते तयार केले जाणार आहेत. D-VI या तक्त्यात तर या पूर्वीची वास्तव स्थान व सध्याच्या ठिकाणचा वास्तविक या दोन्ही तक्ता तयार करून त्यात स्थलांतरिची वैवाहिक स्थिती आणि वयोगट याचीही माहिती दिली जाईल. D-III या तक्त्यात मोठ्या शहरातील स्थलांतरीचे पूर्वीचे वास्तवस्थान, शैक्षणिक पातळी, वयोगट व व्यवसाय यानुसार वर्गीकरण दिले जाईल. अशा प्रकारच्या आकडेवारीमुळे भारतातील एकूण अंतर्गत स्थलांतराचा अधिक अचूक अंदाज करणे यापुढे शक्य होणार आहे. परंतु या अर्धा अंदाजाचा तंतोतंत पण नाही अर्थातच या प्रश्नांची उत्तरे कितीशी अचूक मिळतात यावर अवलंबून आहे. पुष्कळशी ग्रामीण जनता अशिक्षित, अडाणी असल्यामुळे आणि कुटुंब प्रमुखाकडून कुटुंबातील सर्व व्यक्ती विषयी माहिती घेतली जात असल्याने मिळेल आणि कुटुंब प्रमुखाकडून कुटुंबातील सर्व व्यक्ती विषयी माहिती घेतली जात असल्यामुळे जन्मस्थान, पूर्वीचे वास्तव स्थान, वास्तव्य काल हे सांगण्यात हि चूक होणे शक्य आहे. स्वतःच्या मुला-मुलीचे जन्मस्थान व पूर्वीचे वास्तव स्थान जरी कुटुंब प्रमुखाला बरोबर सांगता आले तरी सुना व इतर नातेवाईक यांच्या बाबतीत त्याने

दिलेली माहिती अचुक असेलच असे नाही. या शिवाय भारतातील राज्याच्या सीमा अनेकवार बदलल्यामुळे चूक होऊ शकेल. कारण बदललेल्या सीमेबद्दल अज्ञात असेल तर जन्मस्थान व पूर्वीचे वास्तव स्थान ज्या राज्यात आहे, असे नोंदवले जाईल उदाहरणार्थ. नागपूर हे भाषावार प्रांत रचनेचे पूर्वी मध्यप्रदेशात होते. त्यामुळे नागपूरला १९६० पूर्वी जन्मलेल्या व १९७१ च्या जनगणनेच्या वेळी मुंबईत असलेल्या व्यक्तीने जन्म स्थान दुसऱ्या राज्यात सांगितले तर ते आचूक ठरेल. (स्थलांतराचा अंदाज करण्याच्या प्रत्यक्ष व प्रत्यक्ष पद्धतीचे विवेचन करताना जन्मस्थान विषयक आकडेवारीतील उनिवांची सविस्तर चर्चा केली आहे). जनगणनेशिवाय नमुना पाहण्याद्वारे गोळा केलेली फारच थोडी स्थलांतर विषयक माहिती भारतात उपलब्ध आहे. नॅशनल सॅम्पल सर्व्हे ९,११,१२,१३ या फेऱ्यांमध्ये मे १९५५-१९५८ या काळासाठी भारतातील अंतर्गत स्थलांतराची माहिती गोळा केलेली आहे. केवळ स्थलांतराच्या अभ्यासासाठी स्वतंत्रपणे केलेल्या पाहण्या फार थोड्या आहेत.

**देशांतर्गत स्थलांतर मापनाच्या पद्धती:**

जन्म मृत्यू नोंदणी पद्धतीप्रमाणे स्थलांतर घटना नोंदणी पद्धतीने सामान्यता अस्तित्वात नसल्यामुळे अंतर्गत स्थलांतर घटनांचा अंदाज करणे हा स्थलांतर विश्लेषणातील पहिला आवश्यक टप्पा आहे. त्यानंतर ज्या प्रमाणे जन्मदर, मृत्यूदर ही परिमाणे निश्चित केली जातात, तशाच पद्धतीने स्थलांतर परिमाणे निश्चित करता येतात. वरील पहिला टप्पाच अधिक गुंतागुंतीचा असल्याने त्याचा सविस्तर विचार या पुढे केला आहे. जनगणनेवरून स्थलांतर घटनांचा अंदाज करण्याच्या पद्धतीचे दोन प्रकार आहेत.

**१) प्रत्यक्ष पद्धती:**

जर जनगणनेत जन्मस्थान किंवा गणनास्थानातील वास्तव्य काल (Duration of Residence of Enumeration) किंवा गणनास्थानापूर्वीचे शेवटचे वास्तव्य स्थान या संबंधी प्रश्न विचारले असतील तर ते स्थलांतर प्रत्यक्ष प्रश्न होत. अशा प्रश्नांना मिळालेल्या उत्तराच्या सहाय्याने अंदाज करण्याच्या पद्धती या प्रत्यक्ष पद्धती होत.

**२) अप्रत्यक्ष पद्धती:**

स्थलांतरासंबंधी वरीलपैकी कोणताही प्रश्न विचारला नसून ही दोन जनगणनामधील लोकसंख्येचा आकडा व जन्म मृत्यू नोंदणीनुसार जन्म मृत्यूचा आकडा यांच्या सहाय्याने किंवा दोन लागोपाठच्या जनगणना वरून मिळणाऱ्या लिंगवयोगट वाचनाच्या सहाय्याने अप्रत्यक्षपणे एकूण स्थलांतर घटनांचा अंदाज करण्याच्या पद्धती.

**प्रत्यक्ष पद्धती:**

**३.२.१ जन्मस्थान:** (Place of Birth) जन्मस्थान विषयक प्रश्नावर आधारलेली पद्धती:

जन्मस्थान कोणते? या प्रश्नाचे उत्तर जनगणनेत काय नोंदवले स्थलांतर विषय किती तपशील गोळा करण्याचा उद्देश आहे, यावर अवलंबून राहील. उदा. जिथे जन्म झाला ते खेडे वा शहर नोंदवायचे की त्या जिल्ह्याचे राज्यात ते ठिकाण आहे, त्याचे नाव नोंदवायचे हे सर्व जनगणनेद्वारा स्थलांतर विषयक आकडेवारी किती तपशीलवार, लहानात लहान कोणत्या घटक प्रदेशापर्यंत उपलब्ध करावयाची आहे यावर अवलंबून राहील. तसेच त्या उपलब्ध माहितीवरून विश्लेषण करणाऱ्यालाही आंतरराज्य स्थलांतराचा अंदाज करायचा आहे की, आंतरजिल्हा की अंतर तालुका स्थलांतराचा अंदाज करायचा आहे. यानुसार तो घटक प्रदेशाची निवड करील. त्यामुळे या ठिकाणी गणनास्थान व जन्मस्थान म्हणजे विशिष्ट खेडे वा शहर असे नसून त्याने घेतलेल्या घटक प्रदेशानुसार ज्या जिल्ह्यात वा तालुक्यात वा राज्यात व्यक्तीचा जन्म झाला तो, असा अर्थ घ्यावा लागेल. ही गोष्ट पुढील विवेचनात येथे जन्मस्थान व गणनास्थान हे शब्द उपयोगात आणले आहेत. तेथे लक्षात ठेवायला हवे. यातील पहिला टप्पा म्हणजे ज्याचे जन्मस्थान भारताबाहेरील परदेशात आहे असे नोंदवले गेले आहे आंतरराष्ट्रीय स्थलांतर म्हणून वेगळ्या काढून उरलेल्या व्यक्तीचे पुढीप्रमाणे विश्लेषण करावे.

**जन्मस्थान विषयक माहितीवरून जीवनावधी स्थलांतरीचे वर्गीकरण:**

एकाच जनगणनेची आकडेवारी उपलब्ध असेल तर जन्मस्थानविषयक माहितीवरून विशिष्ट कालावधीतील (उदाहरणार्थ, गेल्या १० वर्षातील) स्थलांतरासंबंधी काहीही माहिती मिळत नाही. मात्र जीवनावधी स्थलांतरची एकूण संख्या निश्चित करता येते व त्याची अनेक घटक प्रदेशामधील प्रवाहामध्ये विभागणी करता येते. यासाठी प्रथम देशातच ज्याचा जन्म झाला आहे त्या लोकसंख्येचे दोन विभाग पाडले जातात.

**१) रहिवासी लोकसंख्या–** ज्यांचे जन्मस्थान व गणना स्थान एकच आहे असे लोक.

**२) जीवनावधी स्थलांतरी :** ज्याचे गणनास्थान व जन्मस्थान भिन्न आहे ते लोक.

नंतर उभ्यास्थंभानी गणना स्थान व आडव्या पंक्तीनी जन्मस्थान दर्शवून एक दुहेरी तक्ता तयार करता येतो. भारतासाठी राज्य हा एक घटक प्रदेश धरून १९६१ च्या जनगणनेनुसार प्रत्येक राज्यातील रहिवासी लोकसंख्या व जीवनावधी स्थलांतरित दर्शवणारा असा दुहेरी तक्ता (९.१) पुढील पानावर दिला आहे. अधोरेखित आकडे त्या-त्या राज्यातील रहिवासी लोक आहेत. तसेच प्रत्येक राज्यातील गणना झालेले किती जीवनावधी स्थलांतरित दुसऱ्या कोणत्या राज्यातून आले होते हेही तक्त्यावरून स्पष्ट केले होते. म्हणजेच स्थलांतर प्रवाह ही स्पष्ट होतात. उदाहरणार्थ, गुजरात मधील एकूण लोकसंख्यापैकी १९,९३२,८४८ एवढी लोकसंख्या रहिवासी असून, उरलेल्या पैकी १८,५७,५२ महाराष्ट्रातून आलेले जीवनावधी स्थलांतरी होते. याउलट गुजरातेतून महाराष्ट्रात गेलेले जिवनावधी स्थलांतरित यापेक्षा पुष्कळच

अधिक म्हणजे ५७,३०,०६ इतके होते. तसेच या तक्त्यातील पहिला स्तंभ हे दर्शवतो की, आंध्र प्रदेशातील १९६१ च्या एकूण लोकसंख्या पैकी ३५३७६८२३ हे आंध्र प्रदेशात जन्माला आलेले असून, उरलेल्या पैकी आसाम मधून आलेले जीवनावधी स्थलांतरी ९४३, बिहार मधून आलेले २९६५, गुजरात मधून ६५५५ या प्रमाणे होते. तसेच येतात त्यातील पहिली पंक्ती असे दर्शवते की, आंध्रप्रदेशात जन्म झालेल्या एकूण लोकसंख्येपैकी ३,५३,७६,८२३ लोकं आंध्रप्रदेशातच राहत असून, १९६१ साली उरलेल्या पैकी ४३२६ आसाममध्ये आहेत. १३,०२४ बिहार मध्ये, ८८४८ गुजरातमध्ये राहत होते. अशा रीतीने सर्व स्तंभ व पंक्ती याचा अर्थ लावता येतो. असाच अर्थ लावून या तक्त्यावरून तयार केलेला तक्ता ९.२ प्रत्येक राज्यातील

तक्ता ९:१

**भारतातील जीवनावधी स्थलांतरीचे आंतरराज्य प्रवाह**

| **जन्म स्थान राज्य** | **आंध्र प्रदेश** | **आसाम** | **बिहार** | **गुजरात** | **जम्मू काश्मीर** | **केरळ** | **मध्य प्रदेश** | **तमिळनाडू** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ३५३७ ६८२३ | ४३२६ | १३०२४ | ८८४८ | ११४ | १९३८ | ३९७४३ | १२५४३२ |
| आसाम | ९४३ | १०५१ ९१९१ | ८९६० | २७२ | ५८ | ११४ | १०४७९ | २६९ |
| बिहार | २९६५ | २५७२८८ | ४५३५८५६९ | २६०८ | ३०६ | ३९४ | ५७४७७ | ९५८ |
| गुजरात | ६५५५ | ९२८ | ९८२५ | १९९३ २८४८ | ९० | ३१३६ | ४८१९८ | ७४२७ |
| ज.काश्मीर | ९२३ | ४६३ | ८१८ | ४९२ | ३४७० ४५६ | १११ | २५९५ | ४१७ |
| केरळ | २४८४९ | २१६९ | ७१२३ | ७८४१ | १९४ | १६६४ ४०१० | १८२१३ | २७६३०६ |
| मध्य प्रदेश | १०१९३ | १११५१ | ४५०७९ | ३३९९७ | २८० | ६४३ | ३०६८९ ३६४ | २५३८ |
| तमिळनाडू | १७१५ ५२ | ७६१७ | १११६१ | ११७५८ | ५४२ | १९१६२८ | १९६३० | ३२९९५ ३९३ |
| महाराष्ट्र | ९८५८० | १५४४ | ६६२० | १८५७७२ | ३९० | ५६६४ | ३००१७२ | ११९३७ |
| कर्नाटक | १८३००८ | ७२३ | १८६८ | ६२०५ | २४२ | २१२३ | ५४१२ | ८८५८० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ओरिसा | ४२६५७ | ५१११७ | ६०४६३ | ७७७ | ६२ | १५७ | ११४८९४ | ७८० |
| पंजाब | ८२७० | १२३९३ | ३९३२६ | १२२९८ | २२१९७ | ११४५ | ६६२५८ | ३००६ |
| राजस्थान | १२१०७ | २२१५४ | ३०३३० | १५१५१६ | ५८५ | २२५ | २८०३०० | ९८७७ |
| उ. प्रदेश | १११३६ | ४०६७२ | ३०३११५ | ८३२६० | ३८०३ | १०२४ | ४७८४५८ | ४०७३ |
| पं. बंगाल | ६९७२ | ५४८४४ | ५३९१ | ५३९१ | ३७१ | ८७९२६ | ५०२२३३५०३९८७ | ३९८७३९८७ |

| जन्मस्थान | महाराष्ट्र | कर्नाटक | ओरिसा | पंजाब | राजस्थान | उ. प्रदेश | पं. बंगाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | २८३९७८ | २९०५९२ | ५३०६४ | ३३२२ | २२१४ | ५८१५ | २५०८९ |
| आसाम | २६१६ | २६६ | ५५०९ | २९४७ | १३१९ | ७४६२ | ४७८०९ |
| बिहार | ११३८८ | ७१४ | ९५३४३ | ८६६८ | ३३६४ | २२६८७९ | १३४८८९५ |
| गुजरात | ५७३००६ | ६८६१ | २५१७ | २३८७ | २९८८६ | १०९४० | १८३६४ |
| ज.काश्मीर | ३७१० | २४४ | ५९२ | ४०४१३ | २०१८ | ८७४४ | २१८० |
| केरळ | ९७८७२ | १३७००९ | ४२५९ | ५६४३ | १९९४ | ५६५६ | १२४१० |
| मध्य प्रदेश | २६९२७१ | १७०९ | ५६०९६ | ७८६६ | १२८२५०२ | २२३०७७ | ४९८४० |
| तमिळनाडू | १२०९०४ | ३९५९०३ | ८५५२ | ७३८७ | ३८६४ | १०६७३ | ३८८२१ |
| महाराष्ट्र | ३६६४२५०१ | १६८९११ | ३६२२ | ११२९३ | १२५६६ | २३७६९ | १४९१७ |
| कर्नाटक | ४७७५०४ | २२४८४४८८ | ११०२ | २२१५ | ११३६ | ३१२६ | ४०८१ |
| ओरिसा | ४३५२ | ३२२ | १७१६६९७७ | १५५२ | ४२१ | २५९१ | १८७११३ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पंजाब | ६४३३४ | ४०९९ | ११०३९ | १७४२६३८९ | २५५१०४ | ३२२१७३ | ५३७३० |
| राजस्थान | ११६७३८ | १२८८७ | ५२३१ | २०३८९६ | १९१६८०५२ | १२४०६४ | ६३७८२ |
| उ. प्रदेश | ४२०६८६ | ४८५७ | १०२५६ | २६६५८१ | १४४९१४ | ७२०९४८४७ | ३४६९२० |
| पं. बंगाल | २२३१३ | २३३९ | ७२६४३ | १०४२९ | ६४९१ | ६०१०३ | २९४४१४०० |

टीप –आधार – (१) अधोरेखित आकड्यासाठी census of India 1961, Vol. India Part II-C (III) Migration tables, D-II, pp-18-46

२) इतर आकड्यासाठी G.B. Saxena, Indian population in transition, Delhi : commercial publications bureau, 1971, pp. 154-153

एकूण जीवनावधी स्थलांतराची आप्रवासी व उत्प्रावसी अशी विभागणी दर्शवितो व निव्वळ स्थलांतरही दर्शवतो. या टाक्यात स्तंभ दोन मध्ये प्रत्येक राज्यापुढे त्यातील जीवनावधी आप्रवासी (Life time in-migrant) म्हणजेच दुसऱ्या राज्यात जन्म झालेले पण या राज्यात १९६१ साली गणना झालेले लोक दर्शवले आहेत. स्तंभ ३ मध्ये जीवनावधी उत्प्रवासी म्हणजे या राज्यांमध्ये जन्म झालेले पण साली १९६१ इतर राज्यात गणना झालेले लोक दर्शवले आहेत. स्तंभ ४ मधील निव्वळ स्थलांतराची संख्यांच्या राज्यासाठी (+) आहे तिथे अप्रवासी संख्या उत्प्रवासी पेक्षा जास्त आहे. उलट जेथे निव्वळ जीवनावधी स्थलांतर ऋण (–) आहे तेथे उत्प्रवासीची संख्या अप्रवासी पेक्षा जास्त आहे. उदा. आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, उत्तर प्रदेश इत्यादी राज्यातील निवड जीवनावरती स्थलांतर ऋण (–) आहे ती निव्वळ उत्प्रवासी राज्ये आहेत. (Net out-migration States) तर मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मैसूर, बंगाल निव्वळ अप्रवासी राज्ये (Net in-migration States) आहेत. (निव्वळ जीवनावधी स्थलांतर यालाच जन्म वास्तव्य निर्देशांक (Birth residence Index) असे नांव आहे. या तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, अप्रवासीची एकूण संख्या व उत्प्रवासीची एकूण संख्या या दोन्ही सारख्याच (म्हणजे १२,९२८,६७३) आहेत. कारण प्रत्येक राज्यातील आप्रवसी हा दुसऱ्या कोणत्यातरी राज्यांचा उत्प्रवासी असणारच सहाजिकच सर्व १५ राज्यांच्या दृष्टीने विचार केल्यास निव्वळ स्थलांतर शून्यच येणार. या ठिकाणी फक्त या पंधरा राज्यातील परस्पर स्थलांतराचा समावेश केला आहे. दिल्ली, हिमाचल प्रदेश इत्यादी केंद्रशासित प्रदेशात जन्मलेल्या व या १५ राज्यात गणना झालेल्या किंवा केंद्रशासीत प्रदेशात गणना झालेल्या व १५ राज्यात जन्मलेल्या स्थलांतरिचा समावेश यात येत नाही. एकूण आंतरराज्य अप्रवासी वा उत्प्रावासी संख्या (१२,९२८,६७२) ही या १५ राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या फक्त २.९ टक्के इतकी आहे. जन्मस्थानविषयक माहिती एकाच जनगणने वरून उपलब्ध असेल तर फक्त जीवनावधी स्थलांतरितची संख्या व प्रवाह कसे निश्चित करतात ते

आपण आतापर्यंत पाहिले आहे. आता लागोपाठच्या दोन जणगणना मध्ये जन्मस्थान विषयक माहिती उपलब्ध असेल तर त्या दोन जण गणामधील काळातील एकूण स्थलांतर घटनाचा अंदाज कसा करायचा आहे ते पुढे स्पष्ट केले आहे.

**जन्मस्थान विषयक माहितीवरून दोन जनगणना मधील काळातील स्थलांतराचा अंदाज:**

दोन लागोपाठच्या जनगणना मध्ये त्याच घटक प्रदेशासाठी जन्मस्थानविषयक आकडेवारी उपलब्ध असेल तर त्या दोन्ही वरून प्रथम तक्ता ९.२ प्रमाणे प्रत्येक घटक

**तक्ता ९.२**

**भारतातील विविध राज्यांमधील जीवनावधी, अप्रवासी, उत्प्रवासी व निव्वळ अंतर्गत जीवनावधी स्थलांतर १९६१.**

| राज्य (१) | जीवनावधी अप्रवासी (२) | जीवनावधी उत्प्रवासी (३) | निव्वळ जीवनावधी स्थलांतर (४) |
|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ५८०७१० | ८५७४९९ | -२७६७८९ |
| आसाम | ४६७३८९ | ८९०४१ | +३७८३४८ |
| बिहार | ८४५८८१ | २०१७२४७ | -११७१३६६ |
| गुजरात | ५११०१५ | ७२०१९० | -२०९१७५ |
| जम्मु काश्मीर | २९२३४ | ६३७२० | -३४४८६ |
| केरळ | २२८२८८ | ६०१५३८ | -३७३२५० |
| मध्य प्रदेश | १४६८१९७ | ८०९९४२ | +६५८२५५ |
| तमिळनाडू | ५३५६२३ | ९९९९९२ | -४६४३६९ |
| महाराष्ट्र | २४२८६७२ | ८४५७७३ | +१५८२८९९ |
| कर्नाटक | १०२६७२३ | ७८६४३२ | +२४०२९१ |
| ओरिसा | ३२८९२५ | ४६७२६८ | -१३७४४३ |
| पंजाब | ५९४५९९ | ९१५३७२ | -३२०७७३ |
| राजस्थान | ६३३४९३ | १०३३६९२ | -४००१९९ |
| उ. प्रदेश | १०३५०७२ | २१३९७५५ | -११०४६८३ |
| पश्चिम बंगाल | २२१३९५१ | ५८१२११ | +१६३२७४० |
| | १२९२८६७२ | १२९२८६७२ | |

आधार तक्ता ९.१

प्रदेशातील जीवनावधी आप्रवसी व उत्प्रवसी व निव्वळ जीवनावधी स्थलांतर दर्शवणारे २ तक्ते तयार करता येतील. म्हणजेच प्रत्येक जनगणनेवरून तक्ता ९.२ सारखा एक एक तक्ता तयार होईल व त्यावरून

खालील प्रमाणे अप्रत्यक्षपणे त्या दोन्हीच्या मधल्या काळातील स्थलांतराचा अंदाज काढता येईल. उदा. समजा, पहिल्या जनगणनेनंतर n वर्षांनी दुसरी जनगणना घेतली आहे व देशाचा अनेक विभागांपैकी प्रत्येक विभागात त्या n वर्षात निव्वळ स्थलांतर किती झाले पहावयाचे आहे. म्हणून तो विभाग (उदा. राज्य) हा घटक प्रदेश घेतला आहे. वरील विवेचनावरून हे उघड आहे की त्या n वर्षातील त्या प्रदेशातील निव्वळ स्थलांतर म्हणजे दुसऱ्या जनगणनेच्या वेळची निव्वळ जीवनावधी स्थलांतरीची संख्या यातील फरक. परंतु पहिल्या जनगणनेच्या वेळीच्या जीवनावधी स्थलांतर यापैकी आपल्या मधल्या काळात कित्येकजण मृत्यूही पावले असतील. म्हणून पहिल्या जनगणनेच्या वेळेच्या आप्रवसी व उत्प्रवासी पैकी n वर्षानंतर किती जिवंत राहिले असतील तेवढेच म्हणजे फक्त उत्तरजीवी असतील तेवढेच विचारात घ्यावयास हवेत. कारण समजा दुसऱ्या जनगणनेच्या वेळीची म्हणजे १९७१ ची निव्वळ जीवनावधी स्थलांतरितांची संख्या १००० आहे व १९६१ ची म्हणजे पहिल्या जनगणनेच्या वेळेची निव्वळ जीवनावधी स्थलांतरित संख्या ८०० आहे. कारण १९६१-७१ या १० वर्षातील निव्वळ स्थलांतर फक्त २०० आहे. कारण १९६१ मधील जीवनावधी आप्रवसी व उत्प्रवासी एकूण २५ जण जर मधल्या काळात मृत्यू पावले असतील तर त्याचा अर्थ असा आहे की, १० वर्षातील निव्वळ स्थलांतर २०० नसून २२५ आहे. या दृष्टीने पहिल्या जनगणनेच्या वेळेच्या जीवनावधी स्थलांतरीची मृत्यूची शक्यता गृहीत धरून खालील प्रकारे समीकरण मांडले पाहिजे. म्हणजे हे समीकरण.

Net M={It+n-Ot+n}-(It-Ot) असे न मांडता ते,

Net M={It+n-Ot+n}-(SL It-So Ot) असे मांडले पाहिजे या ठिकाणी.

M ने t व t+n या दोन्ही मधील n वर्षाच्या काळातील निव्वळ स्थलांतर दर्शवले आहे. It ने पहिल्या जनगणनेच्या वेळी एका विशिष्ट घटक प्रदेशातील जीवनावधी आप्रवसीची संख्या दर्शवली आहे.

It+n ने पहिल्या जनगणनेच्या वेळी एका विशिष्ट घटक प्रदेशातील जीवनावधी आप्रवाशीची संख्या दर्शवले आहे.

Ot ने पहिल्या जनगणनेच्या वेळेची त्या घटक प्रदेशातील जीवनावधी उत्तप्रवासीची संख्या दर्शवले आहे.

Ot+n ने दुसऱ्या जनगणनेच्या वेळेची त्या घटक प्रदेशातील जीवनावधीची उत्प्रसीची संख्या दर्शवली आहे.

आणि-Sl ने आप्रवसीसाठी त्या n वर्षाच्या काळातील उत्तरजीवीचे गुणोत्तर (Survival Ratio) दर्शविले आहे. (म्हणजेच आप्रवासीपैकी किती n वर्षानंतर हयात असतील याचे प्रमाण).

So ने उत्प्रवासाठी त्या n वर्षाच्या काळातील उत्तरजीवीचे गुणोत्तर दर्शविले आहे. या पद्धतीचा फायदा म्हणजे तिचा उपयोग केला असता आता दोन जनगणना मधील काळासाठी एकूण निव्वळ स्थलांतर तर मिळतेच पण त्याची दोन भागातील विभागणी सुद्धा करता येते.

Net M={It- n-SL It}+S0 Ot-Ot+n

=M1+M2

येथे M2 हा भाग या घटक प्रदेशा बाहेर जन्माला आलेल्या लोकांमधील निव्वळ स्थलांतर दर्शवतो. या पद्धतीतील महत्त्वाची अडचण म्हणजे आप्रवसी व उत्प्रवासी यांच्यासाठी उत्तरजीवीची गुणोत्तरे प्रत्यक्ष उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा अंदाज काढावा लागतो व त्यासाठी पुष्कळच आकडेवारी असावी लागते. बरीच आकडेमोड करावी लागते. मुख्य म्हणजे स्थलांतराचे वयोविभाजन दोन्ही जनगणना मध्ये उपलब्ध नसेल तर उत्तरजीवीची अचुक गुणोत्तरे मिळणे अशक्य आहे. यातून मार्ग काढण्यासाठी एक पद्धत म्हणजे आप्रवसी उत्तरजीविचे गुणोत्तर हे उत्प्रंवासी उत्तरजिवीच्या गुणोत्तर आहे इतकेच आहे. असे गृहीत धरणे म्हणजे SI=So असे गृहीत धरणे. असे गृहीत धरून ही दुसरा प्रश्न म्हणजे हे गुणोत्तर किती आहे, असे गृहीत धरावे? कारण एकूण स्थलांतरासाठी देखील असे वेगळे गुणोत्तर सामान्यता उपलब्ध नसते. या दृष्टीने या ठिकाणी जनगणना उत्तर जीववीचे गुणोत्तर (Overall Census Survival Ratio) किंवा आयुर्मान सारणी उत्तरजीवी गुणोत्तर (Overall life table survival Ratio) यापैकी एकाचा उपयोग केला जातो. दोन जनगणना मधील अंतर सामान्यता १० वर्षे असल्यामुळे येथे उपयोगात आणले जाणारे जनगणना उत्तरजिवीचे गुणोत्तर खालील प्रमाणे असते.

move) आहे, तर जन्मस्थानविषयक माहितीच्या आधारे जे जीवनावधी स्थलांतर दर्शवले जाते त्यात मधल्या स्थलांतर घटना काढून जन्मस्थान ते सध्याचे वास्तव स्थान अशी एकच स्थलांतर घटना दर्शवली जाते. माहितीच्या अचुकतेच्या दृष्टीने पाहायची तर जन्मस्थान व शेवटचे वास्तव्य स्थान या दोन्ही पैकी कोणती माहिती अधिक काटेकोरपणे दिली जाते यासंबंधी निश्चित पुरावा नाही. परंतु या प्रश्नासाठी मोठी उणीव म्हणजे विशिष्ट काळाचा संदर्भ याही प्रश्नाला नाही त्यामुळे १ वर्षापूर्वी शेवटचे स्थलांतर केलेल्या व्यक्ती, तसेच १० वर्षापूर्वी वा ५० वर्षापूर्वी शेवटचे स्थानांतर केलेल्या व्यक्ती अशा सर्वच एका गटात घातल्या जातात. ही उणीव पाण्यासाठी लॅटिन अमेरिकेतील काही देश व यूगोस्लाव्हिया यांच्या जनगणनेमध्ये वरील माहिती बरोबरच सध्याच्या ठिकाणच्या वास्तव्य काळ ही माहितीही विचारली जाते. परंतु या दृष्टीने सोपा उपाय म्हणजे वरील प्रश्नाऐवजी एका विशिष्ट वेळी (म्हणजे १ वर्षापूर्वी १ जानेवारीला वा ५ वर्षांपूर्वी विशिष्ट तारखेला) तुम्ही कोठे राहत होता, असाच प्रश्न सर्वांना विचारणे. जन्म स्थान व शेवटचे वास्तव्य स्थान कोणते? या प्रश्नापेक्षा याचा फायदा म्हणजे एका निश्चित कालखंडाचा विचार करता येतो व त्या कालखंडातपूर्वीच्या सर्व स्थलांतर घटना गाळता येतात. परंतु उनिव म्हणजे ५ वर्षापूर्वी ''अ'' या ठिकाणी राहणारी व्यक्ती ५ वर्षाच्या काळात अनेक ठिकाणी स्थलांतर करून ''ब'' येथे स्थायिक झाली असेल तर त्या घटना विचार करता येत नाहीत. अर्थात प्रश्न विचारताना आज हा कालखंड जवळचा म्हणजेच पुरेसा छोटा (१ वर्ष किंवा ५ वर्षाच्या आत) दिला असेल तर अशा मधल्या काळातील घटना कमी असण्याची शक्यता असते व माहितीही अधिक विश्वसनीय मिळू शकते. अमेरिकेच्या १९४० व १९६० च्या, ग्रीसच्या १९६० च्या जनगणनेमध्ये ५ वर्षापूर्वीचे वास्तव्य स्थान विचारले आहे, तर अमेरिकेच्या १९५० च्या जनगणनेत व जपानच्या १९६० च्या जनगणनेत १ वर्षांपूर्वीचे विचारले आहे. हा कालखंड फारच छोटा असेल तर अगदी तात्पुरत्या करण्यासाठी केलेल्या स्थलांतराचाही त्यात चुकीने समावेश होण्याची शक्यता असते व फारच मोठा असेल तर न आठवल्यामुळे किंवा अनेक वेळा स्थलांतर केले असल्यामुळे अचूक मिळण्यामध्ये अडचणी येतात. या माहितीच्याही सहाय्याने तक्ता ९.१ व तक्ता ९.२ प्रमाणे दुहेरी तक्ते तयार करून विशिष्ट कालावधी स्थलांतर (period migration) मोजता येते. याच निर्गमन स्थान, आगमन स्थान व कालावधी सुस्पष्ट असतो. जीवनावधी स्थलांतरापेक्षा फारच थोडा कालावधी असल्यामुळे स्थलांतरीच्या मर्त्यतेचा विचार केला नाहीतरी अंदाजात मोठी चूक होत नाही. परंतु दोन जनगणनामधील स्थलांतर, या प्रश्नांच्या साहाय्याने मोजणे कठीण आहे. कारण हा प्रश्न विचारताना अचूक माहिती मिळण्याच्या दृष्टीने १० वर्षाचा कालखंड फार मोठा आहे.

## ३.४ सारांश :

स्थलांतराच्या प्रत्यक्ष पद्धती मध्ये एकूण दोन प्रकार आहेत. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष या लोकसंख्येचे संख्याशास्त्रीय मापनाचे विश्लेषण करतात. स्थलांतर मापनाच्या या पद्धतीमध्ये विस्तृती विवेचन केले आहे. जननस्थान, राहण्याचा कालावधी, शेवटच्या निवासाचे स्थान, त्याच बरोबर निश्चित आधीच्या तारखेला राहण्याचे ठिकाण याचे सविस्तर विश्लेषण केलेले आहे. स्थलांतर मापनासाठी विविध राज्याच्या लोकसंख्येच्या स्थलांतराचे आकडेवारीसह आणि आलेखासह सखोल विश्लेषण केले आहे.

**३.५ अ) स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न** (एका वाक्यात उत्तरे लिहा )

१. विशिष्ट कालावधीनंतर वारंवार घेतली जाणारी कोणती पद्धती ही देखील पुष्कळ देशातून स्थलांतराच्या अत्यंत महत्त्वाचे सामग्रीचे साधन आहे.

२. कोणत्या देशांमध्ये लोकसंख्या दोन्ही पुस्तके ठेवण्याच्या पद्धतीस १९ व्या शतकात प्रारंभ करण्यात आला.

३. कोणती आकडेवारी ही जनगणनेपूर्वी कोणत्याही वेळी प्राप्त झालेले स्थलांतर दर्शवते.

४. जनगणनेची माहिती विचारत असताना बहुदा कोणाला सामान्यता विषयी प्रश्न विचारले जातात?

५. स्थलांतर विश्लेषणासाठी जन्मस्थानाचा अंदाज घेण्यासाठी कोणत्या या फार मोठ्या समस्या आहेत.

६. जनगणना व राष्ट्रीय नमुना पाहणीने स्थलांतरणाची किती कारणे मांडली आहेत.

७. कोणत्या राज्यांमधून अनेक दशके अधिक प्रमाणात स्थलांतरण झाले आहे.

८. १९६१ च्या जनगणनेत प्रत्येक व्यक्तीला कोणते चार प्रश्न विचारण्यात आले.

९. अविकसित देशांमध्ये स्थलांतर नोंदणीचे प्रमुख साधन कोणते राहिलेले आहे?

१०. सातत्याने ठेवली जाणारी नोंदणी पुस्तके हे कोठे उपलब्ध असते?

**३.५ ब) स्वयंअध्ययनासाठीची उत्तरे** (एका वाक्यात उत्तरे लिहा )

१. नमुना सर्वेक्षण

२. डेन्मार्क, फिनलंड, आइसलँड, नार्वे, स्वीडन, बेल्जियम, नेदरलांड, पश्चिम जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, पोलांड, रशिया, इटली, स्पेन, इस्रायल, जपान, सिंगापूर, तैवान या

३. जन्मस्थानाची मिळालेली आकडेवारी या वरून .

४. बहुदा कुटुंब प्रमुखाला किंवा घरातील इतर जबाबदार सदस्याला.

५. या जन्मलेली वेळ माहित असणे.

६. सात

७. उत्तर प्रदेश, बिहार, छत्तीसगड, उत्तराखंड .

८. १) जन्मस्थान, २) जन्मस्थान ग्रामीण की नागरी विभागात, ३) वास्तव्यकाल (जिथे गणना झाली त्या ठिकाणचा), ४) राष्ट्रीयत्व या वरून एकूण चार प्रश्न विचारण्यात आले.

९. जनगणना

१०. फक्त प्रगत देशांमध्ये उपलब्ध असते.

## ३.६ सरावासाठीचे प्रश्न : दीर्घ उत्तरे लिहा

१. स्थलांतराचा अंदाज लावण्याच्या पद्धती मधील जन्मस्थान: (Place of Birth) या घटकाची चर्चा करा.

२. स्थलांतराचा अंदाजा तील राहण्याचा कालावधी: (Duration of Residence) या प्रत्यक्ष मापन पद्धतीची चर्चा करा.

३. शेवटच्या निवासाचे ठिकाण आणि (Place of last Residence; and) सविस्तर लिहा

४. स्थलांतराच्या प्रत्यक्ष मापन पद्धती मध्ये निश्चित आधीच्या तारखेला राहण्याचे ठिकाण या विषयी विवेचन करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


Bhide, Asha and Kanitkar Principles of Population Studies. Bombay, Himalaya Tara. 2000 : Publishing House, pp 346-380.

Sekher, T.V: Migration and Social Change

Kaul, Ravender Kumar, Migration and Society, Jaipur, Rawat Publication. 2005: 325. 09546 KU-251993 pp1-26.

Sivaramkrishnan, K.C, Oxford Handbook of Urbanisation in India, New Delhi.

Kundu mitabh and Singh, Oxford University Press. 301.360954 SIV 250035 Pp.28 to B.N. 2005: 32.

Rao, M.S.. 1981: Some aspects of Sociology of Migration, Sociological Bulletin, 30(1), pp, 30-35.

Lee, Everett. 1968: Theory of Migration, in Heer D.M² (eds.) Readings on Population p, 184.

Ravenstein, E.G. 1969: The Law of Migration, Journal of Royal Statistical Society, pp, 11-59.

Datta, mal. 2003: Human Migration: Social Phenomenon. New Delhi. Mittal Publications 325 DT-250233.

Mukherji, Shekhar. 1981: Mechanisms of Underdevelopment Labour Migration and Planning Strategies in India. Calcutta. Prajna.331.6254 MUK 158103

Cherunilam, Francis. 1987: Migration: Causes, Correlates, Consequences, Trends Policies. Bombay. Himalaya Publishing. 325 CHE 177634

Jorden and Duvell 2003: Migration, Polity Publication, London


❑❑❑

## सत्र–३ : घटक ४

# स्थलांतराची कारणे आणि परिणाम

(Causes and Effects of Migration)

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ स्थलांतर प्रक्रियेत ढकलणारे आणि या प्रक्रियेतून ओढणारे घटक (प्रेरक व प्रेषक घटक)

४.२.२ स्थलांतर आणि सामाजिक परिवर्तन

४.२.३ स्थलांतर प्रवृत्ती आणि योजना

४.२.४ स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन

४.२.५ स्थलांतर आणि नागरीकरण

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक संज्ञा

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्ट्ये

स्थलांतराची कारणे आणि परिणाम या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील गोष्टी साध्य होणार आहेत.

- स्थलांतर प्रक्रियेला प्रेरक आणि प्रेषक ठरणारे घटक जाणून घेता येतील.
- स्थलांतर आणि सामाजिक परिवर्तन यातील संबंध समजून येतील.
- स्थलांतर प्रक्रियेचे प्रवाह किंवा कल आणि पार्श्वभूमी समजून घेता येईल.
- स्थलांतर प्रक्रियेची योजना या संदर्भातील माहिती समजून घेता येईल.
- स्थलांतर आणि नागरीकरण यातील संबंध जाणून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना

स्थलांतराची कारणे आणि परिणाम या घटकाचा अभ्यास करताना प्रथमत: स्थलांतर म्हणजे काय? अथवा स्थलांतर प्रक्रियेचा अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे. स्थूलमानाने असे निदर्शनास येते की, स्थलांतर करणे म्हणजे आपले मूळ निवास स्थान अथवा आपले मूळ गांव सोडून अन्य ठिकाणी राहण्यासाठी जाणे होय. स्थलांतर करणाऱ्या व्यक्ती दुसऱ्या गावांत, शहरात, राज्यात अथवा देशामध्ये राहण्यासाठी जातात. त्यामुळे अशा ठिकाणाची लोकसंख्या वाढत जाते. बहुतांशी प्रमाणात स्थलांतर हे खेड्यातून शहराकडे म्हणजेच ग्राम-नगर स्थलांतर स्वीकारले जाते. अशा स्थलांतराचे सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक असे व्यापक स्वरूपाचे परिणाम दिसून येतात. उदा. खेड्यातून अनेक व्यक्ती मोठ्या शहरात स्थलांतर करतात की, ज्यामुळे अशा शहरामध्ये गलिच्छ वस्ती अथवा झोपड्या ही समस्या वाढत जाते. वाहतूक व दळणवळणाचे ज्वलंत प्रश्न उद्भवतो, नागरी सुविधा अपुऱ्या पडू लागतात.

या पार्श्वभूमीवर आपणास याठिकाणी स्थलांतर प्रक्रियेच्या ठळक व्याख्या समजावून घेणे आवश्यक आहे.

**स्थलांतर प्रक्रियेचा अर्थ अथवा प्रमुख व्याख्या :**

समाजशास्त्रामध्ये स्थलांतरांचा अभ्यास एक सामाजिक प्रक्रिया या दृष्टीने केला जातो. त्यामुळे या संदर्भात स्थलांतर प्रक्रियेच्या ठळक व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येतील -

**१) डॉ. एस. सी. दुबे**

''स्थलांतर ही सामाजिक परिवर्तनाची अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे लोकसंख्येचे अंतर्गमन आणि बहिर्गमन होते.''

**२) बर्गल**

बर्गल यांच्या मते, ''लोकसंख्येच्या स्थानांतरासाठी दिलेले नाव म्हणजे स्थलांतर होय.''

स्थलांतर प्रक्रियेच्या वरील ठळक व प्रमुख व्याख्या विचारात घेता असे दिसून येते की, विकसीत व प्रगत देशापेक्षा विकसनशील देशांमध्ये ग्रामीण-नागरी स्थलांतराचे प्रमाण अधिक आढळते. उदा. भारत देशात ग्राम-नगर स्थलांतर सातत्याने होत असल्याचे दिसून येते. असे स्थलांतर ही सतत सुरू असणारी प्रक्रिया आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मात्र यामुळे औद्योगिक व शैक्षणिक प्रगती झालेल्या शहरामध्ये तसेच महानगरामध्ये अनेक नागरी समस्या बिकट बनल्याचे दिसून येते, शहरवासियांना सातत्याने अशा स्थलांतर प्रवृत्तीचा अनेक क्षेत्रामध्ये गंभीर परिणाम होत असल्याचे निदर्शनास येते, एकूणच स्थलांतर प्रक्रिया म्हणजे ''अनेक गंभीर सामाजिक समस्यांची जननी म्हणून ओळखली जाते.

## ४.२ विषय विवेचन

स्थलंतराचे समाजशास्त्र या पेपरमधील 'स्थलांतराची कारणे आणि परिणाम' हे चौथे युनिट समजावून घेत असताना त्यामध्ये आपणास अनेक बाबींचा विस्तृत अभ्यास करावा लागणार आहे.

उदा. स्थलांतर प्रक्रियेतील प्रेरक आणि प्रेषक घटक स्थलांतर आणि सामाजिक परिवर्तन, स्थलांतर प्रवृत्ती व योजना, स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन आणि स्थलांतर व नागरीकरण इ. अर्थात यासंदर्भातील विस्तृत विवेचन करण्यापूर्वी आपणास स्थलांतराची कारणे आणि विविध परिणाम माहित करून घेणे खूप आवश्यक आहे.

### स्थलांतर प्रक्रियेची कारणे किंवा घटक (Factors or Causes of Migration Process)

स्थलांतर प्रक्रियेचे स्पष्टीकरण करणारे जरी निश्चित असे नियम (Laws) आढळत नसले तरी खेड्यातून व्यक्ती शहराकडे अथवा महानगरामध्ये स्थलांतरीत होतात या अनुभवाधिष्ठीत तथ्यांच्या आधारे आपणास स्थलांतर प्रक्रियेला जबाबदार ठरणारे काही घटक किंवा कारणे खालीलप्रमाणे आढळून येतात.

**१) व्यक्तीचे वय**

समाजशास्त्रीय दृष्ट्या विचार करता असे दिसून येते की, ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर करणाऱ्या व्यक्ती या साधारणत: १८ ते ४५ या वयोगटातील असतात. त्यांच्या मध्ये स्थलांतराचा निर्णय घेण्याची क्षमता असते तसेच शहरामध्ये जावून एखादा व्यवसाय करण्याची, नोकरी करण्याची क्षमता वरील वयोगटामध्ये आढळूत येते.

**२) लिंग (स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये अधिक प्रमाण)**

रोजगार किंवा कोणत्या ना कोणत्या प्रकारची नोकरी करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागातील पुरूष शहरामध्ये स्थलांतरीत होतात. विवाह अथवा शिक्षणासाठी ग्रामीण महिला कमी प्रमाणात शहरामध्ये स्थलांतरीत होतात.

**३) शिक्षण**

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारताच्या ग्रामीण भागातील बहुतांशी अशिक्षीत व अप्रशिक्षीत व्यक्ती शहराकडे स्थलांतर करताना आढळून येतात. व्यावसायिक शिक्षणाच्या निमित्ताने बहुतांशी ग्रामीण व्यक्तींचा कल अथवा प्रवाह शहराकडे स्थलांतर करण्याचा दिसून येतो.

**४) रोजगार प्राप्ती किंवा नोकरी**

सध्या मोठ मोठ्या शहरामध्ये व्यावसायिक यांत्रिकीकरण झाल्याने भारताच्या बहुसंख्य खेड्यातील अथवा ग्रामीण भागातील व्यक्ती दिल्ली, चेन्नई, मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक यासारख्या शहरांकडे रोजगार प्राप्तीच्या उद्देशाने स्थलांतर करताना आढळून येतात. अशा शहरांमध्ये नागरी समस्या वेगाने वाढत आहेत.

**स्थलांतर प्रक्रियेचे परिणाम (Effects of Migration)**

जेव्हा ग्रामीण भागातील अथवा खेड्यातील व्यक्ती मोठ्या प्रमाणात खेड्यातून शहरांकडे स्थलांतर करतात (Rural-Urban Migration) तेव्हा अशा शहरांमध्ये स्थलांतर प्रक्रियेचे खालील अनेक दुष्परिणाम किंवा सामाजिक समस्यां निदर्शनास येतात.

समाजशास्त्रीय दृष्ट्या स्थलांतर प्रक्रियेचे परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील –

**१) लोकसंख्येमध्ये वाढ**

ग्राम–नगर स्थलांतर अथवा देश–विदेश स्थलांतर प्रक्रियेने संबंधित शहराच्या अथवा देशाच्या लोकसंख्येमध्ये सातत्याने वाढ होत जाते. भूपृष्ठ मर्यादित आणि लोकसंख्या अमर्यादित यामुळे शहरवासियांना भयंकर विविध सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते. उदा. शहरी वस्ती किंवा झोपडपट्टी वाढ, वाहतूक, दळण–वळण साधनांची कमतरता आणि विविध प्रकारचे प्रदूषण यासारख्या सामाजिक समस्यांत प्रचंड वाढ होत जाते.

**२) बेकारी किंवा नोकरीचा अभाव**

रोजगार संधी अथवा नोकरीची शाश्वती या भूमिकेतून खेड्यातील व्यक्तींचा वाढता ओघ शहराकडे वाढत जातो तेव्हा शहरातील बहुसंख्य व्यक्ती बेकार अथवा नोकरीचा अभाव असे जीवन जगतात. याचा परिणाम म्हणजे अशा बेकार व्यक्ती गुन्हेगारी प्रवृत्तीचा आसरा घेतात. याचाच अर्थ स्थलांतर प्रक्रियेने गुन्हेगारी प्रवृत्तीची वाढ केली जाते असे म्हणता येईल.

**३) समायोजन साधणे शक्य नसते**

स्थलांतर प्रक्रियेमध्ये जेव्हा देशाच्या विविध खेड्यातील व्यक्ती मोठ्या शहरांकडे अथवा महानगरांच्याकडे स्थलांतर करतात तेव्हा खेड्यातील अशा व्यक्तीना शहरी जीवन पद्धतीशी जुळवून घेता येत नाही. साहजिकच मानसिक दृष्ट्या स्थलांतरीत व्यक्ती शहरामध्ये जावून सुद्धा असमाधानी जीवन जगतात. कमी पगारात शहरामध्ये राहणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. थोडक्यात, आपणास असे निदर्शनास येते की, स्थलांतर प्रक्रियेचे ग्रामवासियांच्या दृष्टीने सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि लोकसंख्यात्मक परिणाम आढळून येतात. त्यामुळेच आपणास सदर घटकामध्ये खालील अनेक बाबींचा विस्तारपूर्वक आढावा घेणे गरजेचे आहे.

**४.२.१ स्थलांतर प्रक्रियेचे प्रेषक आणि प्रेरक घटक**

**किंवा**

**(स्थलांतर प्रक्रियेत ओढणारे आणि ढकलणारे घटक)**

**(Pull and Push Factors in Migration)**

स्थलांतराची कारणे आणि परिणाम या चौथ्या घटकामध्ये आपणास स्थलांतर प्रक्रियेचे प्रेषक आणि प्रेरक घटक म्हणजेच या प्रक्रियेत ओढणारे आणि ढकलणारे घटक याचा सविस्तर अभ्यास करणे आवश्यक आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून स्थलांतर प्रक्रियेत ओढणारे घटक (Pull Factors) आणि या प्रक्रियेत ठकलणारे घटक अधिक महत्त्वाची भूमिका पार पाडतात. या दोन्ही घटकांचा सखोल आढावा किंवा स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

### १) प्रशिक्षित किंवा उच्च शिक्षित कामगार वर्ग

समाजशास्त्रज्ञांच्या मते, प्राचीन काळी भारतामध्ये अनेक व्यक्ती गृह उद्योगामध्ये गुंतलेल्या होत्या. त्यांच्याकडून स्वत:च्या उपभोगापुरते शेती उत्पादन घेतले जात होते. यंत्रांच्या अभावाने मर्यादित उत्पादन घेतले जात असल्याने उत्पादीत मालाला बाहेरील बाजारपेठ मिळत नव्हती. दर्जेदार मालाचा अभाव होता.

परंतु, औद्योगिक क्रांतीनंतर शेती व्यवसायांचे यांत्रिकीकरण झाल्याने खेड्यातील व्यवसाय उपजिवीकेचे साधन बनण्यास असमर्थ ठरू लागले. अशावेळी ग्रामीण भागातील अनेक लोक कामधंदा शोधण्यासाठी खेड्यातून शहराकडे स्थलांतर करू लागले. याला ग्राम-नगर स्थलांतर प्रवृत्ती असे म्हटले जाते. शहरातील वेगवेगळ्या व्यवसायाकरिता प्रशिक्षित तसेच शिक्षित कर्मचारी खेड्यातून अथवा शहरामधून ओढले जातात. विशेषत: शहरी भागाकडून अथवा महानगरांच्याकडून सध्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये (आय.टी. क्षेत्र) बाहेरील प्रशिक्षित लोकांना ओढण्याची प्रक्रिया सतत सुरू असल्याचे दिसून येते.

### २) शहरांची मागणी व ग्रामीण भागातील कारागीर वर्गाचा पुरवठा

स्थलांतर प्रक्रियेत मोठ मोठ्या शहरामध्ये ग्रामीण भागातून मजूर अथवा कारागीर वर्गाची मागणी सतत वाढत आहे. शहरांमध्ये खेड्यापेक्षा अधिक सोयी व सुविधा उपलब्ध असतात. इच्छेनुसार कोणताही व्यवसाय करण्याची संधी असते. कामाचा मोबदला पैशामध्ये मिळतो. तसेच जादा कामाचा मेहनताना जादा मिळत असल्याने खेड्यातील अनेक लोक आपणहून शहराकडे आकर्षिले जातात. यामुळे ग्राम-नगर स्थलांतर घडून येते. थोडक्यात, मोठ-मोठ्या शहरांमध्ये शिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याने तसेच शहरामधील जीवन विषयक स्थिती प्रगतीला चालना देणारी असल्याने अनेक ग्रामवासीय शहराकडे ओढले जातात. औद्योगिक, व्यावसायिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक शहरांमध्ये सध्या बाहेरील लोकांना ओढण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे दिसून येते.

### ३) शहरांमधील प्रगतीला चालना देणारी स्थिती

समाजशास्त्रीय दृष्ट्या अनेक विचारवंतांच्या मते, शहरामधील जीवन विषयक स्थिती प्रगतीला अथवा विकासाला चालना देणारी असल्याने भारताच्या विविध खेड्यातील व्यक्ती सातत्याने आज देखील शहरांकडे स्थलांतर करताना आढळून येतात. उदा. मुंबई हे शहर भारताची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. या शहरात दररोज खेड्यातून शहराकडे जाण्यारांचा लोंढा सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते. अर्थात

त्यामुळे या शहरामधील लोकसंख्येची घनता वेगाने वाढत आहे. राहत्या जागेची टंचाई, झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्ती निर्मितीला जबाबदार ठरत आहे. अशावेळी नगरवासीयांना असंख्य गंभीर सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

तरी देखील खेड्याच्या तुलनेत शहरांमधील स्थिती प्रगतीला आणि व्यक्तीमत्त्व विकासाला चालना देणारीच असते असे स्पष्टपणे म्हणता येईल. त्यामुळेच स्थलांतर प्रक्रियेत अशी स्थिती प्रेषक अथवा ठकलणारा घटक म्हणून ओळखली जाते. असे असले तरी अलीकडील काळात ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या मुळ ठिकाणापासून म्हणजेच खेड्याबाहेर ढकलण्याच्या प्रक्रियेत खालील विविध अडथळे आढळून येतात. त्यांचाही अभ्यास करणे उचित ठरेल.

**स्थळांतर प्रक्रियेच्या प्रेरक अथवा ढकलणाऱ्या घटकातील अडथळे**

अनेक अभ्यासकांनी सध्याच्या वास्तव परिस्थितीमध्ये स्थलांतर प्रक्रियेच्या प्रेरक अथवा ठकलणाऱ्या घटकातील म्हणजेच ग्राम-नगर स्थलांतर प्रक्रियेतील प्रमुख अडथळे खालीलप्रमाणे सांगितले आहेत.

**अ) कौटुंबिक बंधन**

खेड्यातील काही व्यक्ती नोकरी, व्यवसाय, मोलमजूरी या विविध कारणासाठी खेड्यातून शहराकडे स्थलांतर करताना आढळून येतात. तरीदेखील त्यांना आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांच्यासह शहरामध्ये स्थलांतर करणे शक्य नसते, भारताच्या पारंपारिक समाज व्यवस्थेत कुटुंबाबद्दल असणारी सहानुभूती, प्रेम, जिव्हाळा आणि आपल्या कुटुंबाबद्दल असणारी ओढ गावापासून दूर शहरात ढकलले जाण्याच्या प्रक्रियेत प्रमुख अडसर अथवा अडथळा ठरत असतो.

**ब) शहरातील धक्का धक्कीचे जीवन व वाढती बेकारी**

खेड्याच्या तुलनेत मोठ्या शहरातील जीवन हे खूपच अडचणीचे अथवा धक्का धक्कीचे असते. इथे सहकार्य प्रवृत्तीचा तसेच आपलेपणाच्या भावनेचा अभाव असतो, त्याच्यातच जोडीला शहरामध्ये दिवसेंदिवस बेकारीचे प्रमाण वाढतच चालले आहे. अनेकांना नोकरीशिवाय भकास जीवन जगावे लागत आहे. त्याचा परिणाम म्हणजे अनेक शहरवासियांच्या जीवनात उपासमारीची वेळ येते. कारखान्यांची टाळेबंदी, यांत्रिकीरकणाने अनेकांच्या गेलेल्या नोकऱ्या आणि स्पर्धात्मक जीवन इत्यादीमुळे शहरातील बेकारीत सातत्याने वाढ होते, अर्थातच गावाबाहेर ढकलले जाण्याचा प्रक्रियेत हा प्रमुख अडथळा ठरतो.

**क) शहराचे भौगोलिक अंतर**

ग्रामीण समाज अथवा खेड्यापासून मोठ्या शहरांचे भौगोलिक अंतर अधिक असल्याने ते ग्रामवासीयाना बाहेर ढकलण्याच्या प्रक्रियेत अडसर ठरते. याचा परिणाम म्हणजे ग्राम-नगर स्थलांतर प्रक्रियेची गती मंद होते. त्यामुळेच खेड्यापासून शहराचे भौगोलिक अंतर हा एक खेड्याबाहेर ढकलण्याच्या प्रक्रियेतील प्रमूख अडथळा असल्याचे मान्य करावे लागते.

### ड) अधिक खर्चिक पद्धत

खेड्यातील व्यक्ती नोकरी, व्यवसाय, शिक्षण यासारख्या अनेक कारणाने शहराकडे स्थलांतर करताना आढळून येतात. परंतू प्रत्यक्षात शहरामध्ये सर्वच स्तरातील लोकांना राहणीमानासाठी खूप खर्च करावा लागतो. उदा. प्रवास खर्च, जागेचे भाडे, स्वयपाकासाठी व स्वयंचलित वाहनासाठी इंधन खर्च, मनोरंजन खर्च, शाळेची भरमसाठ शैक्षणिक फी इत्यादीसाठी अधिक खर्च येतो. याचा विचार करून अनेक ग्रामवासीय व्यक्ती ग्राम-नगर स्थलांतर प्रवृत्ती टाळतात.

### इ) शहरी जीवन पद्धतीशी जुळवून घेण्यामध्ये अडथळा

ग्राम-नगर स्थलांतर प्रवृत्ती स्वीकारलेल्या काही ग्रामवासीयांना सातत्याने वाढत चाललेल्या महागाईच्या शहरी जीवन पद्धतीशी जुळवून घेणे शक्य नसते. शहरातील अपरिचीत व्यक्तींच्या गर्दीत मिसळून जाण्यास ते मानसिकदृष्टीने तयार नसतात. याचाच अर्थ अनेक ग्रामवासीयांना शहरी जीवन पद्धतीशी जुळवून घेता येत नाही. परिणामत: स्थलांतरीत होण्यापासून ग्रामीण व्यक्ती परावृत्त होतात.

वरील पार्श्वभूमी विचारात घेता, असे निदर्शनास येते की, ग्राम-नगर स्थलांतर प्रक्रियेत ढकलणारे आणि या प्रक्रियेत ओढणारे अनेक प्रेषक व प्रेरक घटक अभ्यासल्यानंतर असे निदर्शनास येते की, आधुनिक समाजात प्रत्येक व्यक्तीला 'संचार आणि निवास' स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार प्राप्त झाल्याने ग्राम-नगर स्थलांतर प्रवृत्ती थांबविणे कोणालाही शक्य नाही. खऱ्या अर्थाने सर्वांगिण विकासासाठी अशी स्थलांतर प्रवृत्ती ही काळाचीच गरज बनली आहे. उदा. कोकण रेल्वे प्रकल्प.

### अ) स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न

१. स्थलांतर प्रक्रिया म्हणजे काय?

२. सामान्यत: व्यक्ती कोणते स्थलांतर स्वीकारतात?

३. डॉ. एस.सी. दुबे यांच्या मते, स्थलांतर प्रक्रिया कशी आहे?

४. स्थलांतर प्रवृत्तीचे प्रमूख कारण कोणते?

५. स्थलांतर प्रक्रियेचा कोणताही एक गंभीर परिणाम सांगा.

६. स्थलांतर प्रक्रियेत ओढणारा घटक कोणता?

७. स्थलांतर प्रक्रियेच्या ढकलणाऱ्या घटकातील प्रमूख अडथळा कोणता?

८. आधुनिक समाजात व्यक्तीला कोणता मूलभूत अधिकार प्राप्त झाला आहे?

९. स्थलांतर प्रक्रियेची गती केव्हा मंद होऊ शकते?

१०. महाराष्ट्रातील कोकणाच्या विकासाला (रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हा) केव्हा गती प्राप्त झाली?

## ४.२.२ स्थलांतर आणि सामाजिक परिवर्तन (Migration and Social Change)

स्थलांतर प्रक्रियेचा अर्थ अभ्यासल्यानंतर याठिकाणी आपणास असे निदर्शनास येते की, स्थलांतर म्हणजे एका भौगोलिक ठिकाणापासून दुसऱ्या भौगोलिक ठिकाणी राहण्यासाठी जाण्याची प्रक्रिया होय. साहजिकच यामुळे व्यक्तींची वास्तव्याची जागा, मुळचा व्यवसाय, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे मार्ग इत्यादी मध्ये बदल अथवा परिवर्तन घडून येते. समाजशास्त्रीय दृष्ट्या स्थलांतर प्रक्रिया व्यक्तीच्या जीवनात गतीशिलता घडवून आणते.

थोडक्यात, स्थलांतर प्रक्रियेने व्यक्तीचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक जीवनच बदलून टाकले जाते. या पार्श्वभूमीवर आपणास स्थलांतर प्रक्रिया व्यक्तीच्या जीवनात सामाजिक बदल अथवा सामाजिक परिवर्तन कसे घडवून आणते याचा आढावा घ्यावा लागेल.

**स्थलांतर आणि सामाजिक परिवर्तन**

निसर्गात ज्याप्रमाणे परिवर्तन झाल्याचे आढळून येते त्याचप्रमाणे मानव समाजात देखील परिवर्तन अथवा बदलाची प्रक्रिया अटळ असल्याचे जाणवते. याचा अर्थ कोणताही मानव समाज आज ज्या स्थितीत आहे तसा तो पूर्वी नव्हता आणि भविष्यामध्ये देखील राहणार नाही. भारतीय समाजाला देखील ही वस्तुस्थिती लागू पडणारी आहे. प्राचीन काळी भारतीय समाजाचे जे चित्र होते ते आज नाही. उदा. बलुतेदारी पद्धत, सामाजिक संस्थांचा व्यक्तीजीवनावर पगडा किंवा वर्चस्व, गृह उत्पादन पद्धती, पितृसत्ताक, एकत्र कुटुंब पद्धत, जाती-धर्मात पेच, जीवन साथीदाराची निवड यासारखी बंधने भारतीय व्यक्तींच्याकडून मनापासून स्वीकारली जात होती. या अर्थाने स्वातंत्र्यपूर्व काळी भारतीय व्यक्ती स्थिर व परंपराधिष्ठीत जीवन जगत होत्या. अशा समाजात सामाजिक परिवर्तनाची गती अगदीच मंद होती.

परंतु १९ व्या शतकानंतर आणि अलीकडे २१ व्या शतकामध्ये भारतीय समाजव्यवस्थेत फार मोठ्या प्रमाणात व वेगाने सामाजिक परिवर्तन घडून आले. हॅरी जॉन्सन यांच्या मते, ''सामाजिक परिवर्तन म्हणजे मूलभूत अर्थाने समाज रचनेत घडून आलेला बदल होय.'' स्थलांतर प्रक्रियेचे कोणकोणत्या क्षेत्रात सामाजिक परिवर्तन घडून आले याचा याठिकाणी विस्तृत आढावा घेणे खूप गरजेचे आहे.

**स्थलांतर प्रक्रियेचे विविध क्षेत्रात घडून आलेले सामाजिक परिवर्तन**

स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वी भारतीय व्यक्ती या रूढीप्रिय जीवन जगत होत्या. समाजाने अनेक बाबतीत घातलेली बंधने मनापासून तसेच काटेकोरपणे पालन करीत होत्या परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांच्यामध्ये आपले मूळ राहण्याचे ठिकाण सोडत त्या शहराकडे स्थलांतर करू लागल्या. त्यामुळे विविध क्षेत्रात सामाजिक परिवर्तन घडून आले. ते खालील प्रमाणे सांगता येईल.

१) व्यावसायिक बंधन संपुष्टात येवून व्यवसाय स्वातंत्र्य मिळाले.

२) जातीव्यवस्था आणि धर्मसंस्थेचा पगडा कमी होऊन जातीबाहेर व धर्माबाहेरील जीवन साथीदार निवडणे शक्य झाले.

३) एकत्र कुटुंब पद्धतीची जागा विभक्त कुटुंब पद्धतीने घेतली.

४) स्वकर्तृत्व आणि व्यक्तीमत्व विकास साधणे शक्य झाले.

५) शहरी जीवनातील विशेषीकरण, पाश्चिमात्यीकरण, आधुनिकीकरण, संस्कृतीकरण, जागतिकीकरण इत्यादीमुळे स्वयंप्रयत्नाने सर्वांगिण विकास करणे शक्य झाले.

६) अमर्यादित संतती ही संकल्पना बदलून 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' अशी अभिवृत्ती वाढू लागली. त्यामुळे कुटुंब कल्याण घडून येण्यास मदत झाली.

७) शहरी समाजातील सर्व व्यक्तीना समान अधिकार मिळत असल्याने स्त्री-पुरूषांचा सामाजिक दर्जा उंचावला गेला.

८) दळणवळण व वाहतूक साधनांच्या मध्ये वाढ झाल्याने शहरापासून दुर अंतरावर राहून देखील सुखकर प्रवास करणे शक्य झाले.

९) स्थलांतर प्रक्रियने स्वकर्तुत्वावर कोणतेही शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाल्याने शैक्षणिक विकासाला चालना मिळाली.

अशा रितीने आपणास स्थलांतर प्रक्रिया ही ग्राम-नगर (खेड्यातून शहराकडे) स्वरूपाची असेल तर त्याचे कोणकोणत्या क्षेत्रात चांगले व विकासमय सामाजिक परिवर्तन घडून येते याची वरील मुद्यांच्या आधारे माहिती समजून येते. शेवटी आपणास असा निष्कर्ष काढता येईल की,

ग्राम-नगर स्थलांतर प्रक्रिया ही व्यवसाय स्वातंत्र्य, विचार व मुद्रण स्वातंत्र्य, सर्वांगिण विकास, व्यक्तीमत्व विकास, घातक प्रथा परंपरांचे उच्चाटन, गतीशिल जीवन इत्यादी कारणासाठी आवश्यक असून अशा प्रक्रियेचे रूढीप्रिय समाजात क्रांतीकारक सामाजिक परिवर्तन घडून येण्यास मदत होते.

**ब) स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

१) कोणत्या समाजात बदलाची प्रक्रिया अटळ असल्याचे दिसून येते?

२) स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात परिवर्तनाची प्रक्रिया कशी होती?

३) हॅरी जॉन्सन यांच्या मते, सामाजिक परिवर्तन म्हणजे काय?

४) स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय व्यक्ती कसे जीवन जगत होत्या?

५) भारतातील स्थलांतर प्रक्रिया मूलभूत अर्थाने कशा स्वरूपाची आहे?

६) स्थलांतर प्रक्रियेने मोठ्या प्रमाणात कोणत्या क्षेत्रात सामाजिक परिवर्तन घडून आले?

७) स्वकर्तुत्व आणि व्यक्तीमत्व विकास करणे केव्हा शक्य झाले?

८) ग्राम–नगर स्थलांतर प्रवृत्तीने अमर्यादित संतती ऐवजी कोणती प्रवृत्ती स्वीकारणे गरजेचे वाटू लागले?

९) स्थलांतर प्रक्रियेने कोण–कोणत्या गोष्टी शक्य झाल्या?

१०) विकसनशील भारतात कोणत्या प्रक्रियेने सध्या क्रांतीकारक सामाजिक परिवर्तन घडून येण्यास मदत झाली?

### ४.२.३ स्थलांतर प्रवृत्ती अथवा प्रवाह आणि त्यासंदर्भातील वास्तवता

### (Migration : Trends and Projections)

भारत देशातील व्यक्तींची स्थलांतर प्रवृत्ती अथवा स्थलांतर प्रक्रियेचा प्रवाह आणि त्यासंदर्भातील वास्तवता (योजना) याचा आढावा घेत असताना असे दिसून येते की, भारतात प्राचीन काळापासून स्थलांतर प्रक्रिया आढळून येते. काही वेळा तत्कालीन परिस्थिती अनेक लोकांना स्थलांतरीत होण्यास भाग पाडते. उदा. स्थलांतराचे प्रथम उदाहरण – विदर्भाच्या काही खेड्यामधील अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातींचे लोक स्वातंत्र्यपूर्व काळात जाती व्यवस्थेच्या घातक आणि जाचक प्रथांमुळे होणाऱ्या शोषणाला कंटाळले होते. आपल्या गावात अथवा खेड्यात राहून अन्याय सहन करण्यापेक्षा ''खेडी सोडून शहरात जा'' असा उपदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी दिला होता. त्याचाच परिणाम म्हणून विदर्भाच्या ग्रामीण भागातील अनेक अस्पृश्य जातीच्या लोकांनी जवळच्या शहराकडे स्थलांतर केले.

भारतीयांच्या स्थलांतर प्रवृत्तीचे अथवा प्रवाहाचे दुसरे उदाहरण म्हणजे १९४४ मध्ये महात्मा गांधीजी हत्या झाल्यानंतर अनेक ब्राहम्ण जातींच्या कुटुंबाना आपापल्या खेड्यात अथवा मुळच्या गावामध्ये राहणे अशक्य झाले. अनेक ब्राह्मण कुटुंबांची घरे जाळण्यात आली. यामुळे त्यांनी आपल्या कुटुंबासह खेड्यातून शहराकडे स्थलांतर केले.

स्थलांतर प्रवृत्तीचे तिसरे उदाहरण म्हणजे – दहशतवाद घडवून आणणाऱ्या लोकांच्या त्रासाला कंटाळून काश्मिरमधील अनेक हिंदू पंडीतांनी जम्मू व दिल्लीच्या परिसरात स्थलांतर केले आहे. अशा प्रकारे तत्कालीन अयोग्य परिस्थिती हीच स्थलांतर प्रवृत्तीला अथवा विचार प्रवाहाला जबाबदार असते.

आशिष बोस यांनी भारतीय समाजातील व्यक्तींचे खेड्यातून शहराकडे स्थलांतर करण्याच्या प्रवृत्ती संदर्भात (Migration Trends) खालील अनेक निष्कर्ष मांडले आहेत. उदा.

१) व्यक्ती खेड्यातून शहराकडे लघू अंतरावर म्हणजेच जवळच्या शहरामध्ये अधिक प्रमाणात स्थलांतर करतात.

२) आंतरराज्य तसेच पाश्चात्य देशात स्थलांतर करणाऱ्याची संख्या सर्वात कमी आहे.

३) खेड्यापेक्षा शहरामध्ये अधिक प्रमाणात विकासाला संधी मिळते. तसेच आधुनिक जीवन प्रणालींचा स्वीकार करणाऱ्या व्यक्तीच्यामध्ये स्थलांतर प्रवृत्ती अथवा कल खेड्यातून शहराकडे राहवयास जाणे असा असतो.

४) ग्रामीण भागामध्ये आज देखील मोठ्या प्रमाणात जाती धर्माची कठोर बंधने पालन करावीच लागतात. याउलट शहरामध्ये अशी बंधने झुगारून देण्याची परिस्थिती अथवा वातावरण असल्याने व्यक्तींचा कल खेड्यातून शहराकडे स्थलांतर करण्याचा असतो.

स्थलांतर प्रवृत्ती अथवा प्रवाह यासंदर्भातील वरील सर्व निष्कर्ष वास्तव असले तरी समाजशास्त्रीय दृष्ट्या ते फारसे योग्य नाहीत. अशी मते, अनेक विचारवंतांनी मांडली. असे असले तरी खेड्यापेक्षा शहरामध्ये रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने आज देखील भारताच्या विविध खेड्यातील व्यक्तींच्यामध्ये खेड्यातून जवळच्या शहराकडे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे दिसून येते. हीच स्थलांतर प्रवृत्तीच्या संदर्भातील वास्तवता आहे असे म्हणता येईल.

**क) स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

१) भारतातील व्यक्तींचा स्थलांतर प्रवृत्तीचा कल सामान्यत: कसा आहे?

२) भारतात स्थलांतर प्रवृत्ती केव्हापासून आढळून येते?

३) अनेक लोकांना स्थलांतरीत होण्यास कोणता घटक जबाबदार असतो?

४) आपल्या गावात अथवा खेड्यात राहून अन्याय सहन करण्यापेक्षा ''खेडी सोडून शहरात जा'' असा उपदेश कोणी केला?

५) १९४८ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या हत्येनंतर भारतातील ब्राह्मण कुटुंबानी कोणता मार्ग स्वीकारला?

६) आशिष बोस यांनी स्थलांतर प्रवृत्ती संदर्भात कोणते निष्कर्ष काढले?

७) स्थलांतर प्रवृत्तीच्या संदर्भात शहरातील परिस्थिती कशी असते?

### ४.२.४ स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन (Migration Planning)

व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या सर्वांगिण विकासासाठी ग्राम-नगर, नगर-नगर, नगर-राज्य, राज्य-देश आणि देश-परदेश असे स्थलांतर घडून येणे ही आज काळाचीच गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर आपणास स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन म्हणजेच Migration Planning याचा विचार करावा लागेल.

समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून आपणास स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन यासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्दे मांडता येतील.

**१) स्थलांतर प्रक्रिया ही ग्राम-नगर (खेड्यातून-शहराकडे) स्वरूपाची असावी.**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये बहुसंख्य व्यक्ती खेड्यात राहतात. जिथे असंख्य सुख सुविधांचा अभाव जाणवतो. तसेच रूढीपरंपरांचा अधिक पगडा जाणवतो. याचा परिणाम म्हणजे अशा खेड्यातील व्यक्तींचे जीवन चाकोरीबद्ध बनते. प्रगतीला अडथळा निर्माण होतो.

स्थलांतर प्रक्रियेचे योग्य नियोजन करावयाचे असेल तर व्यक्तीनी खेड्यातून उद्योग, व्यापाराच्या दृष्टीने तसेच व्यावसायिक शिक्षणासाठी ग्राम-नगर स्थलांतर प्रवृत्ती स्वीकारली पाहिजे. शहरामध्ये सर्वप्रकारच्या सुखसुविधा उपलब्ध असतात. व्यवसाय स्वातंत्र्य असते. जाती व्यवस्थेची बंधने शिथील झालेली असतात. त्यामुळे नियोजन करताना नगर-खेडे याऐवजी स्थलांतर प्रक्रिया खेडे-शहर अशीच स्वीकारली पाहिजे.

**२) ग्रामीण भागातून मजूर, कारागीर वर्गाचा पुरवठा**

स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन यासंदर्भात असे निदर्शनास येते की, शहराच्या तुलनेत खेड्यामध्ये बहुतांशी निरक्षर मजूर व कारागीर वर्ग असतो. जर अशा वर्गाला नागरी भागात पाठविण्यात आले अथवा शहराकडे ओढण्याची प्रक्रिया स्वीकारली गेली तर निश्चितच असा निरक्षर मजूर व कारागीर वर्ग साक्षर आणि प्रशिक्षित होईल. त्यांच्यामध्ये आपण आपल्या सर्वांगिण विकासासाठी शहराकडेच स्थलांतर करून शहरी सुख-सुविधांचा वापर करवून घेण्याची प्रवृत्ती वाढत जाईल.

**३) संतुलीत विकासाचे धोरण अंमलात आणणे**

स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन यासंदर्भातील महत्त्वपूर्ण मुद्दा म्हणजे अशा नियोजनाने संतुलीत विकासाचे धोरण अंमलात आणता येते. ग्रामवासीयांच्यामध्ये स्थलांतर प्रक्रियेने आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक एकजिन्सीपणाची भावना वाढत जाते. सध्याच्या मोठमोठ्या शहरांमध्ये संतुलित विकासाचे धोरण अंमलात आणणे शक्य होत आहे. उदा. कोकण रेल्वे प्रकल्पामुळे रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या विकासाला गती प्राप्त झाल्याचे दिसून येते.

**४) शहराबाहेर उद्योगधंद्यांचे विक्रेंद्रिकरण करणे**

सद्य:परिस्थितीत स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन याचा विचार करता, सर्वात महत्त्वपूर्ण शासकीय धोरण कोणते असेल तर एखाद्या मोठ्या शहरातील विविध उद्योगधंद्यांचे अशा शहराबाहेर विक्रेंद्रिकरण करणे खूप गरजेची बाब झाली आहे. उदा. मुंबई शहराचे औद्योगिक विक्रेंद्रिकरण म्हणजे नवी-मुंबई अथवा वाशी शहराबाहेर विशेष आर्थिक क्षेत्राची (SEZ) निर्मिती असे नियोजन करणे गरजेचे आहे.

**५) स्थलांतर विविध प्रकारची बंधने आणण्याचे धोरण स्वीकारणे**

स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन यासंदर्भातील सर्वात महत्तवपूर्ण बाब म्हणजे अशा प्रक्रियेवर विविध स्वरूपात बंधने आणण्याचे धोरण स्वीकारले पाहिजे. उदा. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहरामध्ये महाराष्ट्राच्या विविध खेड्यातील लोकांचा वाढता ओघ ------- मुंबईकडे असा आढळतो. मात्र त्यामुळे मुंबईमध्ये दररोज असंख्य सामाजिक समस्या वाढतच असलेल्या आढळून येतात. यामध्ये राहत्या जागेची टंचाई व झोपडपट्टी, वाहतूक दळणवळणांचा प्रश्न, भयंकर स्वरूपाचे प्रदूषण, वाढती गुन्हेगारी इत्यादी.

या पार्श्वभूमीवर आज अनेक देशांनी वैद्य आणि अवैद्य मार्गाने होणाऱ्या स्थलांतर प्रवृत्तीला विविध प्रकारची बंधने आणण्याचे धोरण स्वीकारले आहे. उदा. अमेरिकेसारख्या देश सहजासहजी बाहेरच्या देशातील लोकांना आपल्या देशाचा व्हिसा देत नाही.

**ड) स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न**

१. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्या सर्वांगिण विकासासाठी कशाची गरज आहे?

२. स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन कसे असावे?

३. संतुलित प्रक्रियेचे नियोजन कसे असावे?

४. कोणत्या प्रकल्पामुळे रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या विकासाला गती प्राप्त झाली?

५. स्थलांतर प्रक्रियेच्या नियोजनात कोणता मार्ग सर्वात प्रभावी म्हणून ओळखला जातो?

६. मोठ्या शहरातील अथवा महानगरामधील प्रचंड लोकसंख्येचा प्रश्न रोखण्यासाठी कोणता मार्ग आवश्यक असतो?

७. कोणता देश सहजासहजी बाहेरच्या देशातील लोकांना आपल्या देशाचा व्हिसा नाकारतो?

### ४.२.५ स्थलांतर आणि शहरीकरण (नागरीकरण) (Migration and Urbanization)

स्थलांतर प्रक्रिया आणि नागरीकरण किंवा शहरीकरण यांचा अतिशय महत्त्वपूर्ण असा संबंध आढळून येतो. जेव्हा खेड्यातील व्यक्ती आपल्या सर्वांगिण विकासासाठी जवळच्या शहराकडे स्थलांतर करतात तेव्हा त्यांची प्रगतीकडे वाटचाल सुरू झाल्याचे दिसून येते.

या पार्श्वभूमीवर आपणास याठिकाणी स्थलांतर आणि नागरीकरण या दोन्ही प्रक्रियांचा परस्परसंबंध जाणून घ्यावा लागेल.

**स्थलांतर प्रक्रियेचा अर्थ :**

डॉ. एस. सी. दुबे यांनी, ''स्थलांतर ही सामाजिक परिवर्तनाची अशी प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे लोकसंख्याचे अंतर्गमन आणि बहिर्गमन होते'' असा अर्थ सांगितला.

तर बर्गल यांनी, ''लोकसंख्येच्या स्थलांतरासाठी दिलेले नाव म्हणजे स्थलांतर होय'' अशी व्याख्या सांगितली.

या प्रमूख व्याख्या विचारात घेता असे स्पष्ट होते की, स्थलांतर प्रक्रियेत खेड्यातून शहराकडे असा विचार प्रवाह आढळतो. स्थलांतर ही सतत सुरू असणारी प्रक्रिया असून विकसनशील देशात स्थलांतराचे प्रमाण अधिक आढळते.

## नागरीकरण अथवा शहरीकरण आणि स्थलांतर यामधील परस्परसंबंध

स्थूल अर्थाने विचार करता ''नागरीकरण (Urbanization) म्हणजे ग्रामीण समाजातील लोकांच्याकडून शहरी समाजात अथवा जवळच्या शहरामध्ये राहवयास जाण्याची स्वीकारलेली प्रवृत्ती होय.'' औद्योगिक क्रांतीनंतर जागतिक पातळीवर विचार करता अनेक देशांतील लोकांनी मोठ्या प्रमाणावर खेड्यातून शहराकडे स्थलांतर केले. थोडक्यात, औद्योगिक क्रांतीमुळे खेड्यातील कुटिरोद्योग बंद पडले. त्यामुळे खेड्यातील बेकार व्यक्ती रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतर करू लागल्या. शहरे ही उद्योगांची, व्यापाराची, शिक्षणाची आणि सुखी व चैनी जीवनाची केंद्रे बनली. त्याचा परिणाम म्हणजे खेड्यातील अनेक लोक शहराकडे अधिकच आकर्षित होऊ लागले. परिणामी अशा शहरांच्यामध्ये अनेक गंभीर सामाजिक समस्यांना आपले रूद्र रूप धारण केले. उदा. राहत्या जागेची टंचाई, झोपडपट्टी, प्रदूषण, वाहतूके, दळणवळण साधनांची कोंडी, गुन्हेगारी प्रवृत्ती, मानसिक ताणतणाव, धक्का धक्कीचे जीवन इत्यादी समस्यांनी नागरी जीवन व्यापून टाकले, तरी देखील विविध खेड्यातील लोकांच्या मध्ये नोकरी व्यवसाय आणि मजुरी मिळविण्याच्या उद्देशाने ग्राम-नगर स्थलांतर प्रवृत्ती वाढत गेली.

स्थलांतर प्रक्रिया आणि त्यासाठी मागील उद्देश अभ्यासल्यानंतर शहरीकरण अथवा नागरीकरण या प्रक्रियेचा आढावा घेतला असता वरील दोन्ही प्रक्रियेतील परस्परसंबंध समजून घेण्यास खूप मदत होईल.

### शहरीकरण किंवा नागरीकरण प्रक्रिया (Urbanization Process)

प्राचीनकाळी शहरीकरण प्रक्रिया प्रचलित नव्हती, खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांतीनंतर पाश्चिमात्य समाजात शहरीकरण प्रक्रियेची सुरूवात झाली. भारत देशात देखील १९ व्या शतकानंतर शहरीकरण प्रक्रिया अस्तीत्वात आली.

### शहरीकरण क्रिया नागरीकरण म्हणजे काय ?

स्थलांतर प्रक्रियेच्या संदर्भात शहरीकरण प्रक्रियेचा अर्थ अनेक विचारवंतांनी आपल्याला खालील व्याख्यांच्यावरून स्पष्ट केले.

**१) क्लाईड मिचेल**

''जेव्हा खेड्यातील व्यक्ती मोठ्या संख्येने शहराकडे स्थलांतर करतात. शेती व्यवसायाऐवजी यंत्र उत्पादन पद्धतीचा स्वीकार करतात आणि शहरातील वातावरणानुसार आपल्या सवयी बदलतात तेव्हा शहरीकरण प्रक्रिया सुरू होते.''

**२) श्री विलबर्ट मूर**

''शहरीकरणाची प्रक्रिया ही दीर्घकाळ चालणारी आणि औद्योगिक क्रांतीमुळे शेतीप्रधान समाजाचे रूप आमूलाग्रपणे बदलून समृद्ध आर्थिक जीवन निर्माण होते.''

### ३) संयुक्त राष्ट्रसंघ अहवाल

''ज्या प्रक्रियेद्वारे लोकसंख्या एका निश्चित, निर्धारित आकाराच्या समूहाकडून मोठ्या आकाराच्या समूहामध्ये एकत्रित होत असते त्या प्रक्रियेला नागरीकरण असे संबोधिले जाते.''

### ४) मार्विन ओलसन

''नागरीकरण प्रक्रियेत सभोवतालच्या ग्रामीण भागातून नागरी समुदायाकडे सतत स्थलांतरित होणाऱ्या असंख्य लोकांचा समावेश होतो.''

शहरीकरण अथवा नागरीकरण प्रक्रियेच्या वरील ठळक व्याख्या विचारात घेता, भारत देशाच्या संदर्भात असे दिसून येते की, औद्योगिक क्रांतीनंतर ग्रामवासीयांचे शेती व्यवसायाचे महत्त्व कमी झाले. लोकांच्या मनामध्ये यंत्र उत्पादन पद्धतीविषयी आकर्षण वाढले. कष्टाचा मोबदला पैशाच्या स्वरूपात मिळविण्यासाठी ग्रामीण भागातील व्यक्ती शहरी समुदायाकडे स्थलांतर करू लागल्या जवळच्या शहरात राहणे आणि तेथील सुखसुविधांचा उपभोग घेणे ही बाब लोकांना अभिमानास्पद वाटू लागली. साहजिकच लोकांचा शहराकडे जाणेचा वाढता कल निर्माण झाला.

मात्र अशा शहरीकरण प्रक्रियेमुळे शहरवासीयांचे जीवन दिवसेंदिवस खालील असंख्य सामाजिक समस्यांनी व्यापून टाकल्याचे दिसून येते.

### शहरीकरणाच्या समस्या

समाजशास्त्रीयदृष्ट्या आपणास अयर्मादित शहरीकरण प्रक्रियेने निर्माण झालेल्या गंभीर सामाजिक समस्या खालील प्रमाणे सांगता येतील. उदाहरणार्थ.

१) झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्त्या.

२) प्रचंड लोकसंख्या वाढ.

३) वाहतूक व दळणवळण समस्या.

४) विविध प्रकारच्या प्रदूषणाच्या समस्या.

५) विद्युत भारनियमन.

६) स्वच्छ पाणी पुरवठा व सांडपाणी समस्या.

७) एकत्र किंवा संयुक्त कुटुंबपद्धतीचा ऱ्हास.

८) स्पर्धा, संघर्ष आणि स्वार्थी प्रवृत्तीत वाढ.

९) सहकार्य, आत्मीयता, एकजिन्सीपणाच्या भावनेचा अभाव.

थोडक्यात, शहरीकरण प्रक्रियेतून असंख्य सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक आणि मानसिक समस्यांचा उदय झाला. कोणत्याही देशातील कोणताही समाज जेव्हा प्राप्त परिस्थितीत समायोजन साधण्यासाठी वाहत्या प्रवाहाबरोबर जावून जीवन जगत असतो तेव्हाच असा समाज विकसित होतो. मात्र प्रमाणापेक्षा अधिक व्यक्ती एखाद्या शहरातील मर्यादित जागेमध्ये गर्दी करून राहतात औद्योगिक शहराकडे स्थलांतर करतात. तेव्हा साहजिकच असे मुंबई, दिल्ली, कलकत्ता, चेन्नई, पुणे, नागपूर यासारखी शहरे वरील असंख्य समस्यांनी वेढल्याचे दिसून येते.

**इ) स्वयंअध्ययनासाठीचे प्रश्न**

१) बर्गल यांनी स्थलांतराची व्याख्या कशी सांगितली?

२) कोणत्या देशात स्थलांतराचे प्रमाण अधिक आढळते?

३) शहरीकरण किंवा नागरीकरण म्हणजे काय?

४) जागतीक पातळीवर विचार करता अनेक देशातील लोकांनी मोठ्या प्रमाणावर खेड्यातून शहराकडे केव्हा स्थलांतर केले?

५) स्थलांतर प्रक्रियेने शहरांच्यामध्ये गंभीर स्वरूप धारण केलेल्या कोणत्या सामाजिक समस्या आढळून येतात?

६) विविध खेड्यातील लोकांच्यामध्ये कोणत्या महत्त्वपूर्ण उद्देशाने ग्राम-नगर स्थलांतर प्रवृत्ती स्वीकारली जाते?

७) भारत देशात खऱ्या अर्थाने शहरीकरणाची प्रक्रिया केव्हा अस्तित्वात आली?

८) क्लाईड मिचेल यांनी शहरीकरण प्रक्रियेची व्याख्या कशी सांगितली?

९) भारत देशाच्या संदर्भात लोकांना जवळच्या शहराकडे जाणेचा कल का निर्माण झाला?

१०) शहरीकरणाच्या गंभीर समस्या कोणत्या आढळून येतात?

## ४.३ सारांश

स्थलांतराचे समाजशास्त्र (Sociology of Migration) या पेपरमधील घटक (युनिट) क्रं. ४ स्थलांतराची कारणे आणि परिणाम यासंदर्भातील वरील सर्व विवेचन विचारात घेता असे निदर्शनास येते की, स्थलांतर करणे म्हणजे आपले मूळ निवास स्थान सोडून जवळच्या शहरामध्ये रहावयास जाणे होय. अर्थात त्यामुळे अशा शहराची लोकसंख्या वाढते, झोपडपट्टी अथवा गलिच्छ वस्ती निर्माण होते. तसेच अशा शहरामध्ये प्रदूषण वाहतूक-दळणवळण, गुन्हेगारी प्रवृत्ती यासारखे असंख्य ज्वलंत प्रश्न सातत्याने वाढत जातात. त्यामुळे सर्वांच्या दृष्टीने नागरी सुविधा कमी पडू लागतात.

समाजशास्त्रीय दृष्ट्या विचार करता १८ ते ४५ या वयोगटातील ग्रामीण व्यक्तीच अधिक प्रमाणात शहराकडे स्थलांतर करतात. स्त्रियांच्यापेक्षा पुरूषांमध्ये स्थलांतराचे प्रमाण अधिक असते. रोजगार प्राप्ती व्यवसाय अथवा नोकरी यासारखी महत्त्वपूर्ण कारणे स्थलांतर प्रवृत्तीला जबाबदार असतात. समाजशास्त्रज्ञांच्या मते, औद्योगिक क्रांतीनंतर शेती व्यवसायांचे यांत्रिकीकरण झाल्याने खेड्यातील मुळचे व्यवसाय उपजिवीकेचे साधन बनण्यास असमर्थ ठरू लागले. यातूनच भारतातील ग्रामवासीयांच्या मध्ये खेड्यातून शहराकडे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. सध्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये (आय.टी.क्षेत्र) बाहेरील प्रशिक्षित लोकांना शहरात ओढण्याची प्रक्रिया सुरू झाली. एका अर्थी अशी प्रक्रिया शहरातील प्रगतीला चालना देणारी म्हणून ओळखली जाते.

थोडक्यात, खेड्याच्या तुलनेत शहरामधील स्थिती प्रगतीला आणि व्यक्तीमत्त्व विकासाला चालना देणारीच असते असे विधान केले तर वावगे ठरणार नाही. अर्थात खेड्यातून शहराकडे स्थलांतर केलेल्या सर्वच ग्रामवासीयांना शहरी जीवन पद्धतीशी जुळवून घेणे शक्य नसते. तरीदेखील सर्वांगिण विकासासाठी स्थलांतर प्रवृत्ती ही काळाचीच गरज बनली आहे. त्यामुळेच आज भारतातील अनेक स्थापत्य शास्त्रज्ञ (इंजिनिअर्स) जादा पॅकेजसाठी मोठ-मोठ्या शहरात, विविध राज्यात तर प्रसंगी पाश्चात्य देशात नोकरीसाठी स्थलांतर करताना दिसून येतात.

निसर्गातील परिवर्तनाप्रमाणेच मानव समाजात देखील सामाजिक परिवर्तन अथवा बदलाची प्रक्रिया अटळ असल्याचे जाणवते. स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी पेक्षा स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय समाजाच्या विविध क्षेत्रामध्ये सामाजिक परिवर्तन घडून आले. उदा. व्यावसायिक बंधने संपुष्टात येवून व्यवसाय स्वातंत्र्य मिळाले. स्वकर्तुत्व आणि व्यक्तीमत्त्व विकास साधणे शक्य झाले. शहरी जीवनाकडे स्थलांतर केल्याने सर्व व्यक्तींना समान अधिकार प्राप्त झाले. स्त्री-पुरूषांचा सामाजिक दर्जा उंचावला गेला. शैक्षणिक विकासाला चालना मिळाली. खेड्यातील अनेक घातक प्रथापरंपराचे उच्चाटन होण्यास मदत झाली. त्यामुळेच भारताच्या खेड्यातील अनेक व्यक्तीनी ''खेडी सोडून शहरात जा'' हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सल्ला अथवा उपदेश मनापासून स्वीकारला.

स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन यासंदर्भात असे म्हंणता येईल की स्थलांतर प्रक्रिया ही खेड्यातून शहराकडे अशीच असावी. यामध्ये संतुलित विकासाचे धोरण याला प्राधान्य देण्यात यावे. तसेच शहराबाहेर उद्योगधंद्याचे विकेंद्रिकरण करणे गरजेचे असते. मात्र सध्या अनेक देशानी वैद्य आणि अवैद्य मार्गाने होणाऱ्या स्थलांतर प्रवृत्तीला विविध प्रकारची बंधने आणण्याचे धोरण स्वीकारले आहे.

स्थलांतर आणि शहरीकरण किंवा नागरीकरण प्रक्रिया यासंदर्भात असे निदर्शनास येते की, शहरीकरण म्हणजे ग्रामीण समाजातील लोकांच्याकडून शहरी समाजात राहवयास जाण्याची स्वीकारलेली प्रवृत्ती होय. शहरे ही उद्योगांची, व्यापाराची, शिक्षणाची आणि विकासाच्या दृष्टीने गतीशिल स्वरूपाची असल्याने खेड्यातील अनेक व्यक्ती शहरांकडे स्थलांतर करू लागल्या. भारत देशात १९ व्या शतकानंतर शहरीकरण प्रक्रिया मोठ्या प्रमाणात अस्तीत्वात आली. क्लाईड मिचेल यांच्या मते, जेव्हा खेड्यातील व्यक्ती शहराकडे स्थलांतर करतात तेव्हा त्यांच्याकडून शेती व्यवसायाऐवजी यंत्र उत्पादन पद्धतीचा स्वीकार केला जातो. तर

विल्बर्ट मूर यांच्या मते, शहरीकरण प्रक्रियेने शेती प्रधान समाजाचे रूप आमूलाग्रपाणे बदलून समृद्ध आर्थिक जीवन निर्माण होते. त्यामुळेच ग्रामवासीयांचा वाढता कल शहराकडे दिसून येतो.

## ४.४ पारिभाषिक संज्ञा

१. ग्राम-नगर स्थलांतर प्रक्रिया : खेड्यातून शहराकडे जाणे.

२. लोकसंख्याचे अंतर्गमन : एका शहरातून दुसऱ्या शहरामध्ये जाणे

३. लोकसंख्येचे बहिर्गमन : एका देशातून दुसऱ्या देशामध्ये जाणे

४. प्रेरक घटक : स्थलांतर प्रक्रियेत ढकलणारे घटक

५. प्रेषक घटक : स्थलांतर प्रक्रियेत ओढणारे घटक

६. लोकसंख्येची घनता : शहरातील प्रचंड लोकसंख्या

७. भौगोलिक अंतर : खेड्यापासून शहराचे भौगोलिक अंतर अथवा क्षेत्रफळ अधिक असते.

८. संचार आणि निवास हक्क : आधुनिक समानता व्यक्तीला सर्व ठिकाणी जाणेचा आणि तिथे राहण्याचा हक्क प्राप्त होतो.

९. खेडी सोडून शहरात जा : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सल्ला खेड्यातून शहराकडे जावून रहा.

१०. स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन : खेड्यातून शहराकडे जाणे, संतुलित विकासाचे धोरण अंमलता आणणे.

११. उद्योगधंद्यांचे विक्रेंद्रिकरण : शहराबाहेर उद्योगधंदे हलविणे

१२. शहरीकरणाची प्रक्रिया : लोकसंख्या एका निश्चित निर्धारित आकाराच्या समूहाकडून मोठ्या आकाराच्या समूहामध्ये एकत्रित होणे.

## ४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

### अ) स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१) आपले मूळ गाव अथवा निवास स्थान सोडून अन्य ठिकाणी शहरात राहण्यासाठी जाणे.

२) स्थलांतर हे खेड्यातून शहराकडे म्हणजेच ग्राम-नगर स्थलांतर स्वीकारले जाते.

३) लोकसंख्येचे अंतर्गत आणि बहिर्गमन.

४) रोजगारा प्राप्ती किंवा नोकरी.

५) लोकसंख्येत वाढ, गलिच्छ वस्ती किंवा झोपडपट्टी, विविध प्रकारचे प्रदूषण, वाहतूक, दळणवळण साधनांची कमतरता.

६) शहरामधील प्रगतीला किंवा विकासाला चालना देणारी स्थिती.

७) स्थलांतर प्रक्रियेच्या ढकलणाऱ्या घटकातील प्रमूख अडथळा म्हणजे कौटुंबिक बंधन तसेच शहरी जीवन पद्धतीशी जुळवून घेता न येणे.

८) 'संचार आणि निवास' स्वातंत्र्य अधिकार.

९) संतुलित विकासाचे धोरण अंमलात आणून गतीमंद करता येते.

१०) कोकण रेल्वे प्रकल्पामुळे.

**ब) स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) मानव समाजात.

२) मंद स्वरूपाची.

३) समाज रचनेतील बदल अथवा परिवर्तन.

४) रूढीप्रिय चाकोरीबद्ध अथवा स्थिर स्वरूपांचे.

५) ग्राम-नगर स्थलांतर प्रक्रिया (खेड्यातून शहरांकडे स्थलांतर).

६) सामाजिक, व्यावसायिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील बदल.

७) व्यक्ती खेड्यातून शहराकडे जातात तेव्हा.

८) ''छोटे कुटुंब - सुखी कुटुंब'' अथवा ''कुटुंब लहान सुख महान''.

९) घातक प्रथापरंपरांचे उच्चाटन आणि गतीशिल जीवनाचा स्वीकार.

१०) ग्राम-नगर स्थलांतर प्रक्रियेने.

**क) स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) खेड्यातून जवळच्या शहराकडे जाणेचा.

२) प्राचीन काळापासून.

३) अयोग्य तत्कालिन परिस्थिती.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी.

५) कुटुंबासह खेड्यातून शहराकडे स्थलांतर हा मार्ग स्वीकारला.

६) जवळच्या शहरात स्थलांतर पाश्चात्य देशात सर्वात कमी स्थलांतर.

७) जाती धर्माची बंधने झुगारून देण्याची परिस्थिती असते तसेच व्यवसाय स्वातंत्र्य, व्यक्ती विकासाला वाव आणि सर्वांना समान कायदेशीर हक्क.

**ड) स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) स्थलांतर प्रक्रियेची.

२) स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन हे उद्योग, व्यापार आणि व्यावसायिक शिक्षणासाठी ग्राम-नगर स्थलांतर प्रवृत्ती.

३) स्थलांतर प्रवृत्ती खेडे-शहर असा असावा.

४) कोकण रेल्वे प्रकल्पामुळे.

५) उद्योगधंद्याचे शहराबाहेर विकेंद्रिकरण.

६) स्थलांतर प्रक्रियेवर विविध प्रकारची बंधने आणणे.

७) अमेरिका.

**इ) स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) लोकसंख्येच्या स्थानांतरासाठी दिलेले नाव म्हणजे स्थलांतर.

२) विकासनशिल देशात.

३) ग्रामीण समाजातील लोकांच्याकडून शहरी समाजात राहवयास जाण्याची स्वीकारलेली प्रवृत्ती.

४) औद्योगिक क्रांतीनंतर.

५) राहत्या जागेची टंचाई, प्रदूषण, वाहतूक, दळणवळण प्रश्न, झोपडपट्टी, मानसिक ताणतणाव इ.

६) नोकरी, व्यवसाय, मजूरी मिळविण्याच्या उद्देशाने.

७) १९ व्या शतकानंतर.

८) खेड्यातील व्यक्ती मोठ्या संख्येने शहराकडे स्थलांतर करतात अथवा शेती व्यवसायाऐवजी यंत्र उत्पादन पद्धतीचा स्वीकार करतात.

९) कष्टाच्या मोबदला पैशाच्या स्वरूपात मिळू लागला तसेच शहरी सुख-सुविधांचा उपभोग घेतल्याने जीवनात गतीशिलता निर्माण झाली.

१०) प्रचंड लोकसंख्या वाढ, विद्युत भार नियमन, विविध प्रकारचे प्रदूषण, सांडपाण्याची समस्या, एकजीन्सीपणाच्या भावनेचा अभाव.

## ४.६ सरावासाठीचे प्रश्न

१) स्थलांतर प्रक्रिया म्हणजे काय ते सांगून स्थलांतराची प्रमूख कारणे किंवा घटक स्पष्ट करा.

२) स्थलांतर प्रक्रियेचे स्वरूप आणि परिणाम विशद करा.

३) स्थलांतर प्रक्रियेत ढकलणारे आणि या प्रक्रियेत ओढणारे (प्रेरक आणि प्रेषक घटक) घटक स्पष्ट करा.

४) स्थलांतर आणि सामाजिक परिवर्तन यावर भाष्य करा.

५) स्थलांतर प्रवृत्ती आणि त्यासंदर्भातील योजना थोडक्यात लिहा.

६) स्थलांतर प्रक्रियेचे नियोजन याची चर्चा करा.

७) स्थलांतर आणि शहरीकरण या प्रक्रियांचा अर्थ सांगून शहरीकरणाच्या ठळक समस्या विशद करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


1. Cherunilam, Francis. 1987 : Migration : Causes, Correlates, Consequences, Trends and Policies, Bombay. Himalaya Publishing.
2. Datta, Amal, 2003. Human Migraton : A Social Phenomenon. New Delhi. Mittal Publications.
3. Jorden and Duvell, 2003 : Migration : Polity Publication, London.
4. Kaul, Ravender Kumar : Migration and Society. Jaipur, Rawat Publication.
5. Lee, Everett. 1968 : A Theory of Migration in Heer D. M. Readings on Population.
6. Mukherji, Shekhar, 1984 : Mechanisms of Underdevelopment Labour, Migration and Planing Strategies in India, Calcutta, prajna.
7. Ravenstein E.G. 1969 : The Law of Migration, Journal of Royal Statistical Society.

8. Rao, M.S.A. 1981 : Some Aspects of Sociology of Migration, Sociological Bulletin.

9. Sivaramkrishnan, K.C.; Kunda Amitabh and Singh. Oxford Handbook of Urbanization in India, New Delhi.

10. Sekhar T.V. : Migration and Social Change.

❑❑❑